सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | गुरुवार, २१ मे २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक १७२ । पाने १२ । किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



स्वदेशीचा अर्थ आहे स्वदेशी संसाधन, स्वदेशी स्वभाव, स्वदेशी प्रतिभा व स्वदेशी आवश्यकता. राष्ट्रीय विकासाची प्रेरणा देशातील सर्व नागरिकांत आपण जागृत केली तर विपरीत परिस्थितीतूनही मार्ग काढून आपण विकास साधू शकतो.

**स्व. कुप्प. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

## महत्त्वाचे

### सुरुवातीला घसरण, अखेर सेन्सेक्स-निफ्टी वधारले

**मुंबई** : देशांतर्गत शेअर बाजारात बुधवारी कमालीचा चढ-उतार पाहायला मिळाला. खनिज तेलाच्या किमती प्रति बॅरल ११० डॉलरच्या खाली आल्याने आणि शेवटच्या सत्रात झालेल्या जोरदार खरेदीमुळे दोन्ही प्रमुख निर्देशांक किरकोळ वाढीसह बंद झाले. रिलायन्स इंडस्ट्रीजसारख्या दिग्गज कंपनीच्या समभागांमध्ये झालेल्या खरेदीमुळे गुंतवणूकदारांचा उत्साह वाढला. सुरुवातीला घसरणीसह सुरुवात झाल्यानंतर निफ्टीने हळूहळू आपली स्थिती सुधारली. हा निर्देशांक दिवसातील उच्चांकी पातळीजवळ पोहचला आणि अखेर ४१ अंकांच्या वाढीसह २३,६५९ वर स्थिरावला. दरम्यान, सेन्सेक्स ११७.५४ अंकांनी म्हणजेच ०.१६ टक्क्यांनी वधारून ७५,३१८.३९ वर बंद झाला. व्यवहारादरम्यान सेन्सेक्स ६७१.४४ अंकांनी घसरून ७४,५२९.४१ पर्यंत खाली आला होता, परंतु त्यानंतर बाजाराने ८०० अंकांची जोरदार झेप घेतली.

### बंगालमध्ये मुस्लिमांना ओबीसी आरक्षणातून वगळले

**कोलकाता** : पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी यांनी राज्यातील ओबीसी आरक्षण १७ टक्क्यांवरून ७ टक्क्यांवर आणले आहे. या निर्णयामुळे मुस्लिम समाजासाठी असलेले ओबीसी आरक्षण पूर्णपणे संपुष्टात आले आहे. सरकारने २०१० ची मूळ ओबीसी यादी पुनर्संचयित केली आहे, ज्यात केवळ ६६ जातींचा समावेश होता. आता या जातींना सात टक्के आरक्षण मिळणार आहे. नवीन सरकारच्या पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आला. यासोबतच, धर्मावर आधारित राज्यातील ओबीसी प्रवर्ग (ओबीसी-ए आणि ओबीसी-बी) पूर्णपणे रद्द करण्यात आले आहेत. सप्टेंबर २०१० मध्ये, विधानसभा निवडणुकांपूर्वी डाव्या आघाडी सरकारने ओबीसी यादीत ४२ नवीन जातींचा समावेश केला आणि आरक्षणाची दोन श्रेणींमध्ये विभागणी केली. श्रेणी अ (अत्यंत मागास) साठी १० आणि श्रेणी ब (मागास) साठी ७ टक्के, अशी मर्यादा निश्चित केली. मे २०१२ मध्ये सत्तेवर आल्यानंतर ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस सरकारने याचा आणखी विस्तार केला.

# सूर्याची सटकली; ओकतोय आग

## वर्धा जिल्ह्यात उष्माघाताचे पाच बळी ● विदर्भासह देशभरात उष्णतेचा कहर


**वर्धा ४७.१**
**नागपूर ४६. ६**

◆ **नागपूर, २० मे**

एप्रिल पाठोपाठ मे महिन्यातही सूर्याचे आग ओकणे सुरूच असून बुधवारी तर विदर्भासह देशभरात कहरच केला. वर्धा जिल्ह्यात ४७.१ तापमानाची नोंद झाल्याने वाढत्या तापमानामुळे नागरिक होरपळले गेले. या जिल्ह्यात एकाच दिवशी उष्माघाताने पाच नागरिकांचा मृत्यू झाला आहे. नागपूर, अमरावती आणि चंद्रपूर या शहरांचाही पार ४६ अंश सेल्सिअसच्या पार झाला. विदर्भासह दिल्ली, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि मध्यप्रदेशात प्रचंड तापमान वाढले होते. उत्तर प्रदेशातील तब्बल २१ शहरांचे तापमान ४६ अंशाच्या पार झाले होते.

हवामान विभागाने २२ मे पर्यंत विदर्भात ऑरेंज अलर्ट दिला आहे. बुधवारी अमरावती, चंद्रपूर आणि नागपूर शहरावर सूर्याने अक्षरशः आग ओकली. सकाळी नऊ वाजल्यापासूनच उन्हाचे चटके लागण्यास सुरूवात झाली होती. तिन्ही शहरांचे तापमान ४६ अंशाच्या पार झाले. त्यापाठोपाठ अकोला, गडचिरोली आणि यवतमाळ या जिल्ह्यांचे तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या पार झाले होते. उष्णतेमुळे वर्धा जिल्ह्यात पाच नागरिकांचा मृत्यू झाला. केळझर ते दहेगाव मार्गावर दिलीप मडावी यांचा मृतदेह आढळला. गणेशपूर येथील रहिवासी असलेले मडावी बहिणीच्या घरी जात असताना त्यांना मृत्यू झाला. तसेच खरांगणा ठाण्यांतर्गत येणाऱ्या डोर्ली येथील देविदास पचारे (७५) हे शेतात त्यांच्या घरच्या शेळ्या चारत असताना तापमानामुळे भोवळ येऊन खाली पडले. यातच त्यांचा मृत्यू झाला.

आर्वी पोलिस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या सावंगी पोळ येथील बेबी निमजे (६५) ही इतर महिलांसोबत रवींद्र सलाम यांच्या पारगोठाण शिवारातील शेतात कचरा वेचण्यासाठी गेली होती. भर उन्हात शेतात काम करताना बेबी निमजे ही भोवळ येऊन खाली पडताच त्यांचा मृत्यू झाला. आर्वी येथील मायबाई वार्डातील गोलू हुमे (३५) याचा उष्माघाताने मृत्यू झाला. ही घटना गुरुनानक चौक येथे मंगळवारी घडली. तक्रारीवरून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. धानोली (मेघे) येथील आशा वांढरे (६५) यांचा राहत्या घरी उष्माघाताने मृत्यू झाला. मुक्या असलेल्या आशा अविवाहित होत्या. तसेच त्या घरात एकट्याच राहत होत्या. त्यांच्या घरावर टिनपत्र्याचे छत असून घरात पंखा किंवा कुलरसारखी कोणतीही सुविधा नव्हती. अशातच तीव्र उन्हाचा फटका बसून त्यांचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. ◂(तभा वृत्तसेवा)




### पशुपक्ष्यांची दैना

**उष्णतेमुळे भटके प्राणी आणि पक्ष्यांची दैना झाली. अनेक ठिकाणी चिमणीसारखे छोटे पक्षी मरूण पडले. रस्त्यांवर भटकणारे श्वान, गायी आणि अन्य पाळीव प्राणी इमारती आणि रस्त्यावर उभी असलेल्या वाहनांच्या सावलीचा आसरा घेताना दिसले.**



# मॉडर्न महाविद्यालयातील मांढरेच्या लॉकरची झडती

**जुन्या प्रश्नपत्रिका, कागदपत्रे हाती ● सीबीआयची पथके पुण्यात तळ ठोकून**

◆ **पुणे, २० मे**

देशभरात गाजत असलेल्या नीट पेपरफूट प्रकरणात सीबीआयने अटक केलेल्या मनीषा मांढरे आणि मनीषा वाघमारे यांना तपासणीसाठी पुण्यात आणले आहे. या तपासणीदरम्यान काही जुन्या प्रश्नपत्रिका तसेच महत्त्वाची कागदपत्रे मिळाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

सीबीआयच्या पथकाने मनीषा मांढरेच्या महाविद्यालयातील वैयक्तिक लॉकरचीही झडती घेतली. या कारवाईत काही महत्त्वाची कागदपत्रे आणि तपासासाठी उपयुक्त माहिती हाती लागल्याचे सूत्रांनी सांगितले.

नीट पेपरफूट प्रकरणाचा तपास सध्या दिल्लीतील सीबीआयकडून केला जात असून, आतापर्यंत ११ जणांना अटक करण्यात आली आहे. पुण्यातून प्रथम ब्युटी पार्लर चालक मनीषा वाघमारेला अटक करण्यात आली. त्यानंतर नीटच्या तज्ज्ञ समितीशी संबंधित असलेल्या मॉडर्न महाविद्यालयातील शिक्षका मनीषा मांढरेला अटक केली आहे.

तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, मनीषा वाघमारे आणि मनीषा मांढरे यांची ओळख ब्युटी पार्लरमधून झाली होती. पुढे ही ओळख नीट पेपरफुटी रॅकेटपर्यंत पोहोचल्याचा संशय तपास यंत्रणेला आहे. विशेष म्हणजे, दोघीही एकाच सोसायटीत राहत असल्याचे तपासात समोर आले आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

### पुण्यात मोठ्या कारवाईची शक्यता

नीट पेपरफूट प्रकरणात पुण्यातील व्याप्ती वाढली आहे. या प्रकरणात यापूर्वीच मुख्य सूत्रधार पी. व्ही. कुलकर्णी, धनंजय लोखंडे यांनाही अटक करण्यात आलेली आहे. अटक करण्यात आलेल्या सर्वांची कसून चौकशी सुरू असून त्यांच्या तपासातून आणखी धागेदोरे उघड होण्याची शक्यता आहे.

# इराण युद्धात अमेरिकेने ४२ लष्करी विमाने गमावली

### काँग्रेसच्या संशोधन संस्थेचा अहवाल, २५ टक्के शस्त्रसाठा वापरला

◆ **वॉशिंग्टन, २० मे**

इराणविरोधात सुरू करण्यात आलेली सैन्य मोहीम ऑपरेशन एपिक फ्युरी दरम्यान अमेरिकेचे ४२ लष्करी विमाने उद्ध्वस्त झाली, तर एकूण २५ टक्के शस्त्रसाठा युद्धात वापरण्यात आला. संघर्षात अमेरिकेने मोठ्या प्रमाणात ड्रोनचा वापर केला. यातील काही ड्रोन असे आहेत की त्यांच्या निर्मितीसाठी अनेक महिन्यांचा कालावधी लागू शकतो, असे अमेरिकी काँग्रेसची संशोधन संस्था असलेल्या काँग्रेस रिसर्च सर्व्हिसच्या (सीआरएस) अधिकृत अहवालात म्हटले आहे.

नुकसान झालेल्यांमध्ये चार एफ-१५ई स्ट्राईक ईगल लढाऊ विमाने, एक एफ-३५ए लाईटनिंग लढाऊ विमान, एक ए-१० थंडरबोल्ट जमिनीवरील हल्ल्याचे विमान, सात केसी-१३५ स्ट्रॅटोटँकर हवाई इंधन भरण्याची विमाने, एक ई-३ सेंट्री एडब्ल्यूएसीएस विमान, दोन एमसी-१३०जे कमांडो विशेष कारवाई विमाने, एक एचएच-६०डब्ल्यू जॉली ग्रीन हेलिकॉप्टर, २४ एमक्यू-९ रीपर ड्रोन आणि एक एमक्यू-४सी ट्रायटन ड्रोन यांचा समावेश होता. विमान नुकसानीचे आणि हानीचे आकडे सुधारित केले जाऊ शकतात. कारण बरीच माहिती गोपनीय म्हणून वर्गीकृत आहे. काही लष्करी कारवाया अजूनही सुरू आहेत आणि नुकसानीचे मूल्यांकन करण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली नसल्याचे अहवालात नमूद करण्यात आले. ही आकडेवारी अमेरिकेच्या संरक्षण विभाग आणि अमेरिकेच्या सेंट्रल कमांडच्या निवेदनांवर, तसेच प्रसारमाध्यमांच्या वृत्तांवर आधारित संकलित केली आहे. ◂(वृत्तसंस्था)

### २९ अब्ज डॉलर्सचा खर्च

अमेरिकेच्या प्रतिनिधिगृहाच्या विनियोग उपसमितीच्या सुनावणीदरम्यान, पेंटागॉनचे कार्यवाहक नियंत्रक ज्युल्स डब्ल्यू. हर्स्ट तिसरे यांनी सांगितले की, इराणमधील लष्करी कारवायांचा अंदाजित खर्च २९ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढला आहे. खर्चातील ही लक्षणीय वाढ प्रामुख्याने लष्करी उपकरणांची दुरुस्ती आणि बदलीच्या सुधारित अंदाजामुळे झाली आहे.

# मनीषा मांढरे 'सेट'च्या पॅनलवर

◆ **पुणे, २० मे**

नीट पेपरफूट प्रकरणी सीबीआयने अटक केलेल्या पुण्यातील प्रा. मनीषा मांढरे यांनी केवळ नीटच्या प्रश्नपत्रिका सेट केल्या नाहीत तर महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या आणि सीईटी सेलच्या प्रश्नपत्रिका सुद्धा सेट केल्याचे समोर आले आहे.

मांढरे यांच्या निवासस्थानी विशेष कोचिंग क्लासेस आयोजित करण्यात आले होते. या वर्गांमध्ये बॉटनी आणि झूओलॉजी विषयातील अनेक प्रश्न विद्यार्थ्यांना सांगण्यात आले, त्यांची चर्चा करण्यात आली तसेच विद्यार्थ्यांना ते प्रश्न वहीत लिहून ठेवण्यास आणि पुस्तकांमध्ये मार्क करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यामुळे मांढरे या विद्यार्थ्यांना परीक्षेचे प्रश्न पुरवत असल्याचे समोर आले आहे. मनीषा मांढरे या अनुभवी प्राध्यापक आहेत. त्यामुळेच त्यांना एनटीएने पेपर सेटिंगच्या पॅनलवर घेतले होते. परंतु, मांढरे यांना राज्य मंडळाच्या प्रश्नपत्रिका सेट करण्यासाठी नियुक्त केले जात होते. त्यामुळे या तपासाची व्याप्ती वाढवून त्याचीही चौकशी करावी, अशी मागणी एनएसयूआयतर्फे करण्यात आली आहे. राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अधिकाऱ्यांना संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही . ◂(तभा वृत्तसेवा)

# ९२ टक्के निर्णयांची अंमलबजावणी

## सरकारचा दमदार प्रगती अहवाल ● मुख्यमंत्र्यांनी मांडली अधिकृत आकडेवारी

◆ **मुंबई, २० मे**

महायुती सरकारने गेल्या दीड वर्षाच्या कार्यकाळात जनतेच्या हितासाठी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांपैकी तब्बल ९२ टक्के निर्णयांची प्रशासकीय पातळीवर प्रत्यक्षात यशस्वी अंमलबजावणी झाली आहे, अशी महत्त्वपूर्ण माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली. राज्य सरकारच्या गतिमान आणि पारदर्शक कारभाराचे हे जिवंत उदाहरण असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

मुंबईत माहिती तंत्रज्ञान (आयटी) आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) विभागाच्या वतीने आयोजित एका विशेष कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (सीएसआर) परिषदेदरम्यान माध्यमांशी बोलताना त्यांनी सरकारच्या या कामगिरीचा अधिकृत अहवाल मांडला.



राज्य सरकारच्या दीड वर्षाच्या कारभाराचा संपूर्ण तपशील आणि सांख्यिकी विदा (डेटा) आता समोर आला आहे. या यशाबाबत माहिती देताना मुख्यमंत्री म्हणाले, आम्ही मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेतला. प्रत्येक कार्यकर्त्याने आणि विभागाने याबाबत सादरीकरण (प्रेझेंटेशन) केले. यामध्ये ९२ टक्के निर्णय पूर्णपणे कार्यान्वित झाल्याचे स्पष्ट झाले आहे. उर्वरित आठ टक्के निर्णयांबाबत वस्तुस्थिती मांडताना त्यांनी सांगितले की, काही निर्णय हे कायद्याच्या चौकटीतील असून ते माननीय राज्यपाल किंवा राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी प्रलंबित आहेत. तसेच काही निर्णयांमध्ये दोन ते तीन सरकारी विभागांचा थेट सहभाग असल्यामुळे त्यांची प्रक्रिया सध्या सुरू आहे. परंतु, एकूणच राज्याची प्रशासकीय प्रगती अतिशय वेगवान आणि आश्वासक आहे. ◂(तभा वृत्तसेवा)



### राज्यात इंधनाचा तुटवडा नाही : फडणवीस

राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा असून, घाबरून न जाता नागरिकांनी पेट्रोलपंपावर गर्दी टाळावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. समाज माध्यमावरील अफवा पसरणाऱ्या माहितीमुळे मराठवाडा, विदर्भात पेट्रोलपंपावर लोक गर्दी करत आहेत. त्यामुळे उपलब्ध असलेल्या साठ्यावर आणि इंधनाच्या पुरवठा साखळीवर त्याचा परिणाम होत असल्याचे फडणवीस यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले. मध्यपूर्वेतील तणावामुळे जगावर इंधन तुटवड्याचे संकट आहे. अशा स्थितीत राज्यातील नागरिकांनी पेट्रोल-डिझेलचा वापर काटकसरीने वापर करण्याची गरज आहे. सध्या देशात इंधनाची पुरवठा साखळी अद्यापही योग्य स्थितीत आहे, असेही ते म्हणाले.

# शरद पवारांच्या भेटीला २२ आमदार; राकाँत खळबळ

◆ **पुणे/मुंबई, २० मे**

महाराष्ट्राच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेसभोवती पुन्हा एकदा मोठ्या राजकीय घडामोडी घडत असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अंतर्गत अस्वस्थता वाढत असल्याची चर्चा असून, तब्बल २२ आमदारांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे.

अजित पवार गटातील काही आमदार सध्या पक्षाच्या भविष्यातील राजकीय रणनीती, स्थानिक पातळीवरील बदलती समीकरणे आणि नेतृत्वशैलीबाबत साशंक असल्याचे बोलले जात आहे. या पृष्ठभूमीवर काही आमदारांनी थेट शरद पवार यांच्याशी संवाद साधल्याची चर्चा आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांनीही शरद पवार यांची भेट घेतल्याची माहिती आहे. पक्षातील वाढती अस्वस्थता आणि आमदारांच्या हालचालींच्या पृष्ठभूमीवर या भेटीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

# सोलापूर जिल्ह्यात आजपासून 'सुराज्य ग्राम मुक्काम' अभियान

### महसूल प्रशासनाचा आगळा-वेगळा उपक्रम, महसूलमंत्र्यांनी या पॅटर्नची राज्यासाठी घेतली दखल

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २० मे-**

राज्यातील सामान्य नागरिक, शेतकरी आणि विद्यार्थ्यांना महसूल विभागाच्या सेवा गतीने मिळाव्यात यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियाना'च्या माध्यमातून विविध सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होत असल्याचे समाधान महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची व्यक्त केले




असतानाच त्याच्याही पुढे जावून याच अभियानांतर्गत सोलापूर जिल्हा प्रशासनाने सुराज्य ग्राम मुक्काम मोहीम अभियान हा नवा सोलापुरी पॅटर्न तयार केला आहे. तो महसूलमंत्र्यांनी राज्यभर राबविण्याच्या सुचना दिल्याची माहिती सुत्राकडून मिळाली.

सोलापूर जिल्ह्यात महसूल विभागाच्या सेवा लोकाभिमुख करण्यासाठी 'सुराज्य ग्राम मुक्काम' ही मोहीम गुरूवारपासून राबवली जात आहे. याअंतर्गत तालुका स्तरावरील अधिकारी म्हणजेच तहसीलदार, गटविकास अधिकारी आठवड्यातून एक दिवस खेड्यांमध्ये मुक्काम करून दिवसभरात किमान तीन गावांना दर आठवड्याच्या बुधवार, गुरूवारी भेटी देतील. नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन निवारण जागेवरच करतील. मुक्कामाच्या स्थळी त्या भागातील मंडलाधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, पोलिस निरीक्षक, तालुका आरोग्याधिकारी, पोलिस निरीक्षक, पशुधन विकास अधिकारी आदींसह स्थानिक लोकप्रतिनिधीही उपस्थित असतील. यासाठी ग्राम पातळीवर समन्वय समितीही स्थापन केली आहे. यामध्ये सरपंच, उपसरपंच आणि ग्रामसेवक, कृषीसेवक, तलाठी, कृषीसेवकांचा समावेश आहे. महिन्यातून एकदा उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी स्वत:ही या गावांना भेटी देवून अभियानाचे आऊटपूट पाहणार आहेत.

अभियानामुळे अनेक वर्षापासून प्रलंबित प्रश्नांचा जागेवरच निपटारा होणार आहे. महसूल प्रशासनाशी संबंधित प्रश्न सुटून दिलासा मिळेल. त्यांना तालुक्याच्या ठिकाणी फेऱ्या माराव्या लागणार नाहीत.ग्रामीण भागातील नागरिकांच्या तक्रारींच्या निवारणासाठी डिजिटल ट्रॅकिंग प्रणालीचा वापर होईल. केवळ संख्यात्मक कामगिरीवर भर न देता, महसूल सेवांची गुणवत्ता सुधारणे आणि लोकांमध्ये विश्वासार्हता निर्माण करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

**सुराज्य ग्राम मुक्काम ही नवसंकल्पना**

रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका हा लोककल्याणाचा उच्च आदर्श छत्रपती शिवरायांनी ठेवला. त्यानुसारच शासनामार्फत 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' राबवत आहे. त्यातील सुराज्य ग्राम मुक्काम मोहीम ही क्रांतीकारी संकल्पना आहे.

### 'प्रशासन जनतेच्या दारी' जाणे ही काळाची गरज

सामान्य नागरिक, विशेषतः दुर्गम आणि ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी यांना आपल्या हक्काच्या कामासाठी वारंवार तालुका किंवा जिल्हा कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागतात. यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा खर्च होतोच, शिवाय प्रशासकीय यंत्रणेबद्दल एक प्रकारची अलिप्तता निर्माण होते. ही दरी सांधण्यासाठी 'प्रशासन जनतेच्या दारी' जाणे ही काळाची गरज आहे. शासन आपल्या दारी' या संकल्पनेतून ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्यांचे स्थानिक पातळीवर निराकरण करण्यासाठी हा उपक्रम आमच्या कार्यालयाकडून नव्याने राबविला जात आहे.

**-अभिजित पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# राष्ट्राध्यक्षांच्या युद्धाधिकारांवर मर्यादा

## अमेरिकेच्या सिनेटमध्ये ठराव मंजूर ● डोनाल्ड ट्रम्प यांना झटका





**वॉशिंग्टन, २० मे**

अमेरिकेच्या सिनेटने विद्यमान राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या युद्धाधिकारांवर मर्यादा घालणारा ठराव ५०-४७ मतांनी मंजूर केला. चार रिपब्लिकन नेत्यांनीही ठरावाच्या बाजूने मतदान केले. काँग्रेसच्या मंजुरीशिवाय इराणवर होणारा हल्ला रोखणे हा या ठरावाचा उद्देश आहे.

सलग सात अयशस्वी प्रयत्नांनंतर सिनेटने ट्रम्प यांच्या युद्धाधिकारांवर मर्यादा घालणारा महत्त्वाचा ठराव मंजूर केला. इराणविरुद्ध कोणतीही लष्करी कारवाई रोखण्यासाठी हा ठराव मांडण्यात आला होता. सिनेटच्या या निर्णयाला ट्रम्प प्रशासनासाठी एक मोठा धक्का मानला जात असला तरी, राष्ट्राध्यक्ष म्हणून देशाच्या रक्षणासाठी आपातकालीन परिस्थितीत त्यांना युद्ध पुकारण्याचा अधिकार अबाधित राहणार आहे. मात्र युद्धाच्या ७२ तासांत त्यांना काँग्रेसची मंजुरी घ्यावी लागणार आहे. सिनेटमध्ये मंगळवारी या ठरावावर मतदान झाले. ५० मते बाजूने आणि ४७ मते विरोधात पडली. विशेष म्हणजे, ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षातील चार सिनेट सदस्यांनी विरोधी पक्षाची (डेमोक्रॅट्स) बाजू घेतली आणि ठरावाच्या बाजूने मतदान केले. हा ठराव मंजूर करण्याचा डेमोक्रॅटिक पक्षाचा हा आठवा प्रयत्न होता, जो आता यशस्वी झाला आहे.

**अमेरिकन सैन्य युद्धासाठी तयार**

व्हान्स म्हणाले, इराण शांतता करार करण्यास अयशस्वी ठरला, तर अमेरिकी सैन्य पुन्हा कारवाई सुरू करण्यास पूर्णपणे तयार आहे. पुढे जाण्यासाठी दोन मार्ग आहेत. पहिला पर्याय वाटाघाटींचा आणि दुसरा कराराचा आहे. इराणने अणुबॉम्ब विकसित केल्यास पश्चिम आशियासह अनेक प्रदेशांमध्ये अस्थिरता वाढेल.अमेरिकेने प्रामाणिकपणे वाटाघाटी केल्या आहेत आणि आता इराणने निर्णय घ्यायचा आहे. (वृत्तसंस्था)

### अण्वस्त्रांची स्पर्धा सुरू होईल : जे.डी. व्हान्स

इराण अण्वस्त्रे मिळविण्यात यशस्वी झाल्यास जगात अण्वस्त्रांची स्पर्धा सुरू होण्याची शक्यता बळावेल. इराणचा अण्वस्त्र कार्यक्रम संपुष्टात आणण्यासाठी अमेरिका संघर्षात उतरली असे अमेरिकेचे उपराष्ट्राध्य जे.डी. व्हान्स यांनी सिनेटमध्ये सांगितले. इराणचा अणुकार्यक्रम संवेदनशील असून, त्यामुळे आखाती प्रदेशात आणि जगभरात अण्वस्त्रांची स्पर्धा सुरू होऊ शकते. सिनेटमध्ये मंजूर झालेला ठराव अमेरिकेच्या संरक्षणासाठी धोकादायक आहे. ■

### ठरावाचा नेमका अर्थ काय?

हा ठराव डेमोक्रॅटिक सिनेटर टिम केन यांनी मांडला होता. या ठरावात स्पष्टपणे म्हटले की, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प काँग्रेसच्या मंजुरीशिवाय इराणवर हल्ला करू शकणार नाहीत. या ठरावात जोपर्यंत काँग्रेस अधिकृतपणे युद्ध घोषित करत नाही किंवा लष्करी बळाचा वापर करण्यासाठी विशेष अधिकृत मान्यता देत नाही, तोपर्यंत इराणविरुद्धच्या कोणत्याही शत्रुत्वाच्या कारवायांमध्ये अमेरिकी सैन्याला सहभागी करता येणार नाही. ठराव मंजूर झाल्यानं डेमोक्रॅटिक सिनेटर ॲडम शिफ यांनी ही माहिती दिली. ■

## वादग्रस्त सिल्व्हर लाईन रेल्वे प्रकल्प रोखला

**तिरुवनंतपुरम, २० मे**

केरळमध्ये सत्ताबदलानंतर नवीन सरकार स्थापन होताच मोठमोठे निर्णय घेण्यात येत आहे. मुख्यमंत्री सतीशन यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर राज्यासाठी अनेक महत्त्वाच्या घोषणा केल्या. आता, नवीन सरकारने वादग्रस्त सिल्व्हर लाईन प्रकल्प पूर्णपणे थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पासाठीची भूसंपादन अधिसूचनाही रद्द करण्यात आली आहे.

सतीशन सरकारने या प्रकल्पाला विरोध करणाऱ्यांनाही सरकारने मोठा दिलासा दिला आहे. आंदोलकांविरुद्ध दाखल केलेले सर्व खटले मागे घेण्याची शिफारस करण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला आहे. याव्यतिरिक्त, तरुणांच्या भविष्याचा विचार करत लोकसेवा आयोगाच्या गुणवत्ता यादीची वैधता ३० नोव्हेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे.

सिल्व्हर लाईन प्रकल्प हा मागील पिनराई विजयन सरकारचा एक महत्त्वाकांक्षी रेल्वे प्रकल्प होता. त्याचा अंदाजित खर्च सुमारे ६४,००० कोटी होता. मागील सरकारने दावा केला होता की, हा प्रकल्प केरळच्या दोन्ही टोकांना (दक्षिण ते उत्तर) जोडेल. (वृत्तसंस्था)

# ड्रोनमधून डागल्या जाणाऱ्या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी

## एकात्मिक भू-नियंत्रण प्रणालीचा वापर

### डीआरडीओचे यश



**नवी दिल्ली, २० मे**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने मानवरहित हवाई वाहन प्रक्षेपित अचूक दिशादर्शक क्षेपणास्त्र (यूएलपीजीएम) व्ही-३ ची यशस्वी चाचणी घेतली. ही यंत्रणा हवेतून हवेत आणि हवेतून जमिनीवर हल्ला करण्यास सक्षम आहे. ही चाचणी भारताच्या स्वदेशी संरक्षण क्षमता आणि आत्मनिर्भर भारताच्या संदर्भात एक मैलाचा दगड ठरली आहे.

दिवसा आणि रात्रीच्या मोहिमांसाठी हाय डेफिनेशन ड्युअल चॅनल सीकर आणि मॉड्युलर स्फोटकांनी सज्ज असलेली ही पूर्णपणे स्वदेशी प्रणाली २०२५ च्या चिलखतभेदी चाचण्यांच्या धर्तीवर कुर्नूलच्या नॅशनल ओपन एरिया रेंजमधील चाचण्यांदरम्यान एका मानवरहित हवाई वाहनावरून प्रक्षेपित करण्यात आली.

कुर्नूलजवळील डीआरडीओच्या चाचणी क्षेत्रात या चाचण्या घेण्यात आल्या. यासाठी क्षेपणास्त्र प्रणालींचे नियंत्रण आणि संचालन करण्याच्या उद्देशाने विकसित करण्यात आलेल्या एकात्मिक भू-नियंत्रण प्रणालीचा (जीसीएस) वापर करण्यात आला. या प्रगत जीसीएसमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे क्षेपणास्त्र प्रक्षेपणाची सज्जता आणि प्रत्यक्ष संचालन प्रक्रिया स्वयंचलित होतात.

डीआरडीओच्या मते यूएलपीजीएम-व्ही३ ने रणगाड्यांसारख्या जमिनीवरील लक्ष्यांवर तसेच ड्रोन, हेलिकॉप्टर्स आणि इतर हवाई मंचांसह हवाई धोक्यांवर हल्ला करण्याची क्षमता प्रदर्शित केली आहे.


संरक्षण संशोधन आणि विकास प्रयोगशाळा, टर्मिनल बॅलिस्टिक्स संशोधन प्रयोगशाला आणि उच्च ऊर्जा सामग्री संशोधन प्रयोगशाळा यासह डीआरडीओच्या इतर अनेक सुविधांच्या सहकार्याने, नोडल प्रयोगशाळा म्हणून संशोधन केंद्र इमारतने ही क्षेपणास्त्र प्रणाली विकसित केली आहे.उत्पादन आणि औद्योगिक सहकार्यासाटी डीआरडीओने भारत डायनॅमिक्स लिमिटेड आणि अदानी डिफेन्स सिस्टिम्स ॲण्ड टेक्नॉलॉजीज यांच्यासोबत भागीदारी केली आहे.सध्याच्या चाचण्यांसाठी, न्यूस्पेस रिसर्च ॲण्ड टेक्नॉलॉजीजने विकसित केलेल्या मानवरहित हवाई वाहनांसोबत ही क्षेपणास्त्र प्रणाली एकत्रित करण्यात आली होती. (वृत्तसंस्था)

### स्वदेशी पुरवठा साखळीचे यश

हे क्षेपणास्त्र अनेक एमएसएमई आणि खाजगी उद्योगांच्या योगदानासह संपूर्णपणे देशांतर्गत संरक्षण प्रणालीद्वारे विकसित करण्यात आले आहे. यशस्वी चाचण्यांनी मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यास सक्षम असलेल्या पूर्णपणे स्वदेशी पुरवठा साखळीच्या सज्जतेला दुजोरा मिळाला आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ■

# इराण-युक्रेन युद्धावर जिनपिंग, पुतिन यांच्यात चर्चा

### चीनच्या दौऱ्यावर रशियाचे राष्ट्राध्यक्ष



**बीजिंग, २० मे**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या दौऱ्यानंतर रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन चीनच्या दौऱ्यावर आहे. चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग आणि पुतिन यांची बुधवारी बीजिंग येथे भेट झाली. दोन्ही नेत्यांनी इराण-युक्रेन युद्धासह अनेक जागतिक मुद्यावर चर्चा केल्याची माहिती चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे.

इराण, युक्रेन युद्ध, व्यापार आणि जागतिक सुरक्षा यांसारख्या मुद्द्यांवर दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. शी आणि पुतिन यांच्यातील ही बैठक जागतिक राजकारणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. बीजिंगमधील ग्रेट हॉल ऑफ द पीपल येथे झालेल्या चर्चेपूर्वी, शी जिनपिंग यांनी पुतिन यांचे औपचारिकपणे स्वागत केले. यानंतर दोन्ही नेत्यांमध्ये द्विपक्षीय बैठक झाली. पुतिन मंगळवारी रात्री चीनमध्ये दाखल झाले, जिथे चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांनी त्यांचे स्वागत केले. चीनला रवाना होण्यापूर्वी जारी केलेल्या व्हिडीओ संदेशात, पुतिन यांनी म्हटले आहे की रशिया आणि चीनमधील संबंध खरोखरच अभूतपूर्व पातळीवर पोहोचले आहेत.

त्यांनी म्हटले की दोन्ही देशांच्या सर्वोच्च नेतृत्वामधील सततचा संपर्क द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्यात आणि प्रचंड क्षमता निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले की दोन्ही नेते द्विपक्षीय सहकार्य, विविध क्षेत्रांतील भागीदारी आणि आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक मुद्द्यांवर विचारांची देवाणघेवाण केली. (वृत्तसंस्था)

## उकाड्यामुळे ट्रेन भट्टीसारख्या तापल्या

**लखनौ, २० मे**

तीव्र उष्णता आणि कडक उन्हामुळे रेल्वे प्रवास करणाऱ्या प्रवाशांना असह्य यातना सहन कराव्या लागत आहे. तांत्रिक बिघाड आणि प्रशासकीय निष्काळजीपणामुळे ट्रेनमधील आजारपण वाढत आहे. असाच काहीसा प्रकार छपरा-गोमतीनगर एक्सप्रेस आणि राप्ती सागर एक्सप्रेसमध्ये समोर आला. बोगीतील एसी कूलिंग सिस्टीम बंद पडल्याने आणि प्रचंड उष्णतेमुळे अनेक प्रवासी आजारी पडले. उलट्या, जुलाब आणि गुदमरल्याच्या तक्रारींनंतर ऐशबाग स्टेशनवर तातडीची वैद्यकीय मदत पुरवण्यात आली.

ट्रेन क्रमांक १५०५३ छपरा-गोमतीनगर एक्सप्रेसच्या दुसऱ्या एसी डब्यातील (ए-१) प्रवाशांनी सांगितले की, एसी युनिट अचानक बंद पडले. बाहेरील उष्णता आणि खेळत्या हवेच्या अभावामुळे काही मिनिटांतच संपूर्ण डबा धगधगत्या भट्टीसारखा गरम झाला.

प्रवासी विनायक द्विवेदी आणि ज्ञानेश्वर पांडे यांनी सोशल मीडियावर रेल्वे प्रशासनाला टॅग करून विनंती केली की, डब्यात हवेच्या कमतरतेमुळे वृद्ध आणि लहान मुले गुदमरत आहेत. परिस्थिती इतकी बिघडली की अनेक लहान मुले आणि वृद्ध लोकांना सतत उलट्या होऊ लागल्या. प्रवाशांनी तात्काळ तांत्रिक आणि वैद्यकीय पथके तैनात करण्याची मागणी केली, त्यानंतर ट्रेनला पुढील प्रमुख स्थानकावर आणण्यात आले. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### देवदत्त नागे दिसणार 'घबाडकुंड'मध्ये




**मुंबई :** अभिनेता देवदत्त नागे पुन्हा एकदा आपल्या हटके भूमिकेत दिसणार आहे. आगामी मराठी चित्रपट 'घबाडकुंड'मधील त्याचा लूक सध्या समाज माध्यमावर व्हायरल झाला आहे. या चित्रपटात तो 'खंग्री' नावाच्या गूढ आणि रांगड्या भूमिकेत दिसणार आहे. त्याचा तीक्ष्ण लूक, गंभीर नजर आणि दमदार स्क्रीन प्रेझेन्स आणि भारदस्त शरीरयष्टीमुळे तो पुन्हा चर्चेत आला आहे. या भूमिकेसाठी देवदत्तने स्वतःच्या लूकमध्ये मोठा बदल केला. दिग्दर्शक प्रितम एस. के. पाटील यांनी कल्पनारम्य आणि थरारक विश्व मोठ्या पडद्यावर साकारण्याचा प्रयत्न केला आहे. नव्या कथानकाला निर्माते डॉ. रसिक कदम यांची साथ लाभली आहे. ■

### कार्तिक आर्यन करतोय काश्मिरात चित्रीकरण



**मुंबई :** अभिनेता कार्तिक आर्यन सध्या त्याच्या आगामी चित्रपटाच्या चित्रीकरणात व्यस्त आहे. 'चंदू चॅम्पियन'नंतर तो पुन्हा एकदा दिग्दर्शक कबीर खानसोबत काम करत आहे. चित्रपटाचे चित्रीकरण सध्या जम्मू आणि काश्मीरमध्ये सुरू आहे. आता सेटवरील कार्तिक आर्यनचा एक व्हिडीओ समोर आला आहे. यामध्ये तो थंडीपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी टोपी आणि काश्मिरी फेरन (ओव्हरकोट) घातलेला दिसत आहे. चित्रपटाबद्दल अधिक तपशील समोर आले नसले तरी, सध्या तो कबीर खानसोबत एका दुसऱ्या स्पोर्ट्स ड्रामाचे चित्रीकरण करत आहे. हा चित्रपट किकबॉक्सिंग चॅम्पियन ताजामुल इस्लामच्या जीवनावर आधारित असल्याचे म्हटले जाते. ■

### 'दृश्य-अदृश्य'चा टीझर प्रदर्शित



**मुंबई :** आपल्या डोळ्यांना दिसते ते सत्य की, आपल्याला होणारे भास खरे या अनाकलनीय कोड्याचे उत्तर शोधणारा दृश्य-अदृश्य हा मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हा चित्रपट १९ जून रोजी प्रदर्शित होणार आहे. ५६ व्या आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट महोत्सव म्हणजेच इफ्फीमध्ये या चित्रपटाने यश मिळविले. नुकताच या चित्रपटाचा टिझर प्रदर्शित झाला आहे. आरएसटी कॅनव्हास निर्मित 'दृश्य-अदृश्य' या सस्पेन्स थ्रिलर चित्रपटात मुख्य भूमिका अभिनेत्री पूजा सावंतने साकारली आहे. पूजाच्या जोडीला अशोक समर्थ, सुव्रत जोशी, हार्दिक जोशी, अक्षया गुरव, विद्याधर जोशी, केया इंगळे कलाकार दिसणार आहेत. ■

# मोदी-मेलनी आणि मेलोडी

## नामसाधर्म्यामुळे भलत्याच 'पार्ले'चे समभाग उसळले



**नवी दिल्ली, २० मे**

इटलीच्या दौऱ्यादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इटलीच्या प्रमुख जॉर्जिया मेलनी यांना मेलोडी टॉफीचे पाकीट भेट दिले अन् इकडे भारतात पार्ले इंडस्ट्रीजचे शेअर्स तब्बल पाच टक्क्यांनी उसळले. मेलोडी हा ट्रेंड ऑनलाईन दिसून आला आणि पार्लेच्या शेअर्समध्ये तेजी आली. मात्र, ही तेजी भलत्याच पार्लेत दिसून आली.

पार्ले इंडस्ट्रीजचा समभाग दिवसभरात पाच टक्क्यांनी वधारून ५.२५ रुपयांवर पोहोचला. मागील आठवड्यात या समभागात जवळपास सात टक्क्यांची वाढ झाली होती. मात्र, यातही एक महत्त्वाची मेख आहे. नोंदणी कंपनी असलेल्या पार्ले इंडस्ट्रीजकडून प्रत्यक्षात मेलोडी टॉफीजचे उत्पादन केले जात नाही. मेलोडी हे उत्पादन पार्ले प्रॉडक्ट्सद्वारे तयार केले जाते. ही पार्ले-जी, मोनॅको, क्रॅकजॅक, मँगो बाईट आणि पॉपिन्स यासारख्या ब्रॅण्ड्समागील एक सुप्रसिद्ध एफएमसीजी कंपनी आहे. पार्ले प्रॉडक्ट ही एक खाजगी कंपनी असून, ती शेअर बाजारातील सूचीबद्ध कंपनी नाही. दुसरीकडे पार्ले इंडस्ट्रीज ही बीएसईमध्ये सूचीबद्ध असलेली कंपनी आहे. मात्र, तिचा मेलोडी किंवा कॅन्डीजचा कोणताही थेट व्यवसाय नाही. मोदींनी मेलनी यांना पार्लेची मेलोडी टॉफी दिल्यानंतर किरकोळ गुंतवणूकदारांनी केवळ नामसाधर्म्यामुळे शेअर बाजारात सूचीबद्ध असलेल्या 'पार्ले'मध्ये गुंतवणूक केली. मोदी-मेलनी यांचा एक व्हिडीओ ऑनलाईन व्हायरल झाल्यानंतर गुंतवणूकदारांनी 'पार्ले'च्या समभागांवर उड्या मारल्या. (वृत्तसंस्था)

# स्पाईसजेटला सर्वोच्च न्यायालयाचा झटका

## १४४ कोटी जमा करण्यासाठी मुदतवाढ देण्यास नकार

**नवी दिल्ली, २० मे**

सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी स्पाईसजेटला जोरदार झटका दिला. स्पाईसजेला १४४ कोटी जमा करण्यास मुदतवाढ हवी असेल तर त्यांनी दिल्ली उच्च न्यायालयात जावे, असे निर्देश न्यायालयाने दिले. हे प्रकरण मीडिया व्यावसायिक कलानिधी मारन आणि कल एअरवेज यांच्यातील सुरू असलेल्या कायदेशीर वादाशी संबंधित आहे.

न्यायमूर्ती पी. एस. नरसिंह आणि आलोक आराधे यांच्या न्यायासनाने स्पाईसजेटचा युक्तिवाद ऐकला. एअरलाइनचे प्रतिनिधित्व करणारे ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी युक्तिवाद केला की, पश्चिम आशियातील सध्याच्या संकटामुळे त्यांच्या कामकाजावर आणि आर्थिक स्थितीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. सरकारच्या ५,००० कोटींच्या बेलआउट कार्यक्रमाचा हवाला देत, त्यांनी पैसे जमा करण्यासाठी तीन महिन्यांची मुदत मागितली. हजारो कर्मचाऱ्यांचे भविष्य लक्षात घेता, जनहिताला प्राधान्य दिले पाहिजे, असा युक्तिवादही त्यांनी केला.

सर्वोच्च न्यायालयाने मुदत देण्यास नकार देत एअरलाईनला उच्च न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला. न्यायालयाने नमूद केले की, मे महिन्यात जाहीर झालेली सरकारी योजना किंवा पश्चिम आशियातील संकट हे मुदतवाढीसाठीचे कारण ठरू शकत नाही. (वृत्तसंस्था)



पश्चिम आशियातील संघर्ष विनाशकारी होण्याची चिन्हे आहेत. अमेरिकेच्या धमक्यांपुढे न झुकण्याची भूमिका इराणने घेतली असून प्रसंगी घराघरातून युद्ध लढण्याची तयारी सुरू केली आहे. यासाठी महिलांना शस्त्रे चालविण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. 'आयआरजीसी'च्या 'बासिज फोर्स' या महिला शाखेची सदस्य युवतीला कलाश्निकोव्ह रायफल चालविण्याचे प्रशिक्षण देताना

## मेटाचा आठ हजार कर्मचाऱ्यांना नारळ

**नवी दिल्ली, २० मे**

मेटाने पुन्हा एकदा कर्मचारी कपातीची प्रक्रिया सुरू केली आहे. यावेळी, कंपनीचा दृष्टिकोन थोडा वेगळा आणि आश्चर्यकारक होता. कर्मचाऱ्यांना आधी घरून काम करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानंतर पहाटे नोकरीतून कमी केल्याचे ईमेल पाठवले. मेटाने अशाप्रकारे सुमारे ८,००० कर्मचाऱ्यांना नारळ दिला आहे.

मेटाने अमेरिका आणि यूकेसह जगभरातील आपल्या कार्यालयांमधील कर्मचाऱ्यांना मंगळवारी अचानक घरून काम करण्याचे निर्देश दिले. कर्मचारी घरी असतानाच अचानक नोकरी कपातीचे ईमेल धडकले.

ब्लूमबर्गच्या अहवालानुसार, ही प्रक्रिया त्यांच्या सिंगापूर कार्यालयात सुरू झाली. प्रभावित कर्मचाऱ्यांना स्थानिक वेळेनुसार पहाटे ४:०० वाजता (भारतीय प्रमाणवेळेनुसार पहाटे १:३० वाजता) नोकरी समाप्तीचे ईमेल मिळाले. (वृत्तसंस्था)

# दिल्लीला वाहतूक कोंडी, प्रदूषणापासून मुक्त करणार

## कचऱ्याचे चार पहाड २०२७ पर्यंत संपविणार : गडकरी



**नवी दिल्ली, २० मे**

राजधानी दिल्लीला जागतिक दर्जाचे शहर बनविताना ते वाहतुकीच्या कोंडीपासून तसेच प्रदूषणापासूनही मुक्त करण्याचा निर्धार केंद्रीय रस्तेवाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.

डीएनडी फरिदाबाद, सोहना या सहा पदरी ॲक्सेस कंट्रोल महामार्गाच्या कामाची नितीन गडकरी यांनी पाहणी केली. त्यानंतर महारानीबाग येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील वाहतूक व्यवस्था अत्याधूनिक तसेच भविष्यातील गरजा लक्षात घेऊन बनवली जात आहे, याकडे लक्ष वेधत गडकरी म्हणाले की, वाहतूक वेगवान, सुरक्षित, प्रदूषणमुक्त तसेच सुरळीत राहील, यादृष्टीने आमचे नियोजन आहे. यासाठी दिल्ली आणि परिसरात एक्स्प्रेसवे, रिंग रोड, बोगदे (टनेल), आणि एलिव्हेटेड कॉरिडॉर मोठ्या प्रमाणात बनवले जात आहे.

राजधानीत जास्तीतजास्त वाहतूक बोगद्यांच्या माध्यमातून करण्याचे आमचे नियोजन असून त्यासाठी अनेक बोगदे बांधण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, असे स्पष्ट करत गडकरी म्हणाले की, दिल्लीत फक्त रस्ते आणि फ्लायओव्हर बांधले जात नाही, तर त्यामागे इज ऑफ लिव्हिंग आणि इज ऑफ मोबिलिटीचाही दृष्टिकोन आहे. दिल्लीसाठी मंत्रालयाने आतापर्यंत दीड लाख कोटी रुपयांच्या महत्वाकांक्षी आणि पायाभूत सुविधा विकसित करण्याच्या योजना आखल्या आहेत, याकडे लक्ष वेधत गडकरी म्हणाले की, ८७ हजार कोटी रुपयांच्या १८५० किमी लांबीच्या योजना पूर्ण झाल्या आहेत.२२५ किमी लांबीच्या १३ हजार कोटी रुपयांच्या योजना प्रगतिपथावर आहे, तर भविष्यात १९० किमी लांबीच्या ३४५०० कोटी रुपयांच्या योजनांचा आराखडा बनवण्यात आला आहे. दिल्लीतील अनेक प्रस्तावित योजनांचा तपशील त्यांनी यावेळी सादर केला. (तभा वृत्तसेवा)

### सहा पदरी ॲक्सेस कंट्रोल महामार्गाच्या पाहणी

राजधानी दिल्ली तसेच राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील संपर्क व्यवस्था आणखी मजबूत करणे, दिल्ली मुंबई एक्स्प्रेसवे तसेच जेवर आंतरराष्ट्रीय विमानतळाशी विनाअडथळा थेट संपर्क व्यवस्था उपलब्ध करुन देणाऱ्या डीएनडी फरिदाबाद, सोहना या सहा पदरी ॲक्सेस कंट्रोल महामार्गाच्या कामाची केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी नुकतीच पाहणी केली. या पाहणी दौऱ्यात गडकरी यांच्यासोबत दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, रस्ते वाहतूक मंत्रालयाचे राज्यमंत्री अजय टम्टा आणि हर्ष मल्होत्रा, केंद्रीय राज्यमंत्री कृष्णपाल गुर्जर, दिल्लीचे सार्वजनिक बांधकाम मंत्री प्रवेश साहिबसिंह वर्मा, हरयाणाचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रणबीरसिंह गंगवा, दक्षिण दिल्लीचे खासदार रामवीरसिंह बिधुरी आणि माजी खासदार रमेश बिधुरी उपस्थित होते. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### हेलिकॉप्टरचे शेतात आपत्कालीन लँडिंग

**टिहरी** : चंबा-अराकोट भागावरून उडत असताना ट्रान्स भारत एव्हिएशनच्या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने त्याला सत्यो-सकलाना परिसरातील शेतात आपत्कालीन लँडिंग करावे लागले. पायलटसह हेलिकॉप्टरमध्ये सहा प्रवासी होते, ते सर्व सुरक्षित आहेत. हे हेलिकॉप्टर बद्रीनाथ धामहून डेहराडूनला जात होते. उड्डाणादरम्यान, उच्च दाबाच्या वीज वाहिनीला धडकल्याने हेलिकॉप्टरच्या शेपटीच्या भागाचे नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच, स्थानिक पोलिस, प्रशासन आणि संबंधित विभागांची पथके घटनास्थळी दाखल झाली आणि त्यांनी बचाव व मदतकार्य सुरू केले. परिसरात आवश्यक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे.

### सोनप्रयाग-गौरीकुंड मार्गावर भूस्खलन

**रुद्रप्रयाग** : केदारनाथ यात्रेदरम्यान मंगळवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे सोनप्रयाग-गौरीकुंड मार्गावर तीन ठिकाणी भूस्खलन झाल्याने यात्रेचा मार्ग बंद झाला. जिल्हा प्रशासन, एनडीआरएफ, एसडीआरएफ, पोलिस आणि इतर मदत पथकांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचत मदत व बचाव कार्य सुरू केले. दरम्यान, जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षकांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घटनास्थळाची पाहणी केली. यात्रेकरूंना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना लवकरात लवकर यात्रेचा मार्ग पूर्ववत करण्याचे निर्देश दिले. कठीण परिस्थिती असूनही प्रशासकीय पथकांनी ३० मिनिटांत पादचाऱ्यांसाठी मार्ग पुन्हा खुला केला आणि यात्रेकरूंना सुरक्षित स्थळी हलवले. रात्रभर चाललेल्या बचावकार्यादरम्यान यात्रेकरूंच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देऊन सतत देखरेख आणि मदतकार्य करण्यात आले.

### कुरुक्षेत्राच्या विद्यार्थ्याचा कॅनडात मृत्यू

**ओटावा** : कुरुक्षेत्र जिल्ह्यातील एका विद्यार्थ्याचा कॅनडात मृत्यू झाला. कुटुंबाने सरकारकडे मुलाचा मृतदेह परत आणण्याची विनंती केली आहे. युवक सुमारे दोन वर्षांपूर्वी स्टडी व्हिसावर कॅनडाला गेला होता. मृत विद्यार्थ्याची ओळख लाडवा येथील गजलना गावातील वीरेन रंगा अशी झाली आहे. वीरेन मार्च २०२४ मध्ये कॅनडाला गेला होता आणि तेथील सरे शहरात शिक्षण घेत होता. वीरेनच्या मृत्यूचे कारण समोर आले नाही. कुटुंबाने त्याला उच्च शिक्षण घेण्यासाठी कॅनडाला पाठविले होते. कुटुंबाच्या म्हणण्यानुसार, वीरेन दररोज रात्रीप्रमाणे आपल्या खोलीत झोपायला गेला होता. सकाळी बराच वेळ तो खोलीतून बाहेर आला नाही. यानंतर सोबत राहणाऱ्या मित्रांनी त्याला उठवण्याचा प्रयत्न केला, पण कोणतीही हालचाल दिसली नाही. जवळ जाऊन पाहिले असता त्याचा मृत्यू झाला होता. यानंतर या घटनेची माहिती स्थानिक पोलिसांना देण्यात आली.

### पूर्व चीन समुद्रात ६.० तीव्रतेचा भूकंप

**नवी दिल्ली** : पूर्व चीन समुद्रात बुधवारी सकाळी ६.० तीव्रतेचा शक्तिशाली भूकंप झाला. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने सांगितले की, भूकंपाचा केंद्रबिंदू २७.५२३ अंश उत्तर अक्षांश आणि १२८.४१८ अंश पूर्व रेखांशावर होता. सध्या कोणतीही हानी झाल्याचे वृत्त नाही. भूकंपाची खोली ३३ किलोमीटर नोंदविली गेली. भूकंपाचा केंद्रबिंदू पूर्व चीन समुद्रात, जपानमधील नागासाकीच्या अंदाजे ५९७ किलोमीटर दक्षिण-नैर्ऋत्य दिशेला होता. भारतीय प्रमाणवेळेनुसार बुधवारी सकाळी ८.१६ वाजता हा भूकंप झाला. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी किंवा त्सुनामीचे वृत्त नाही. परंतु या प्रदेशातील अनेक बेटे आणि किनारपट्टीच्या भागांमुळे स्थानिक प्रशासनाने उच्च सतर्कता बाळगली आहे.

# महामंडळ वाटपाचा ‘फॉर्म्युला’ ठरला?

## भाजपा ४८, शिवसेना २९, राष्ट्रवादी काँग्रेसला २३ टक्के जागा



**मुंबई, २० मे**

राज्यातील महायुती सरकारच्या अंतर्गत गेल्या दीड वर्षांपासून प्रलंबित असलेल्या विविध शासकीय महामंडळांच्या वाटपाचा तिढा अखेर सुटला आहे. महायुतीच्या समन्वय समितीच्या महत्त्वपूर्ण बैठकीत महामंडळ वाटपाचा अंतिम फॉर्म्युला निश्चित करण्यात आला असून, आगामी महिन्याभरात या सर्व जागांचे वाटप पूर्ण करून कार्यकर्त्यांना गोड बातमी दिली जाईल, अशी माहिती खात्रीलायक सूत्रांकडून मिळाली आहे.

महायुती सरकारच्या स्थापनेनंतर पक्षासाठी अहोरात्र कष्ट करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये महामंडळांच्या नियुक्त्या रखडल्यामुळे काहीशी नाराजी पसरली होती. विशेषतः आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेता, या कर्तृत्ववान आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांना योग्य स्थान देऊन त्यांचे समाधान करणे आवश्यक बनले होते. हीच बाब लक्षात घेऊन मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी तात्काळ जागा वाटप पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. महामंडळ वाटपात भारतीय जनता पार्टीचा वाटा सर्वात जास्त असेल. विधानसभेत सर्वात मोठा पक्ष असल्याने वाटाही जास्त असेल. पक्षाकडे राज्यात नेत्यांची आणि लोकप्रतिनिधींची मोठी फौज आहे. महामंडळाच्या माध्यमातून त्यांना जनतेची सेवा करण्याची संधी मिळणार आहे. शिवसेनेतही नाराजीच्या बातम्या अधूनमधून येत असतात. महामंडळावरील नियुक्तीमुळे काही प्रमाणात असंतोष कमी होण्याची शक्यता आहे. भाजपाच्या वाट्याला सर्वाधिक ४८ टक्के महामंडळे जाणार आहेत. त्यापाठोपाठ शिवसेनेला २९ तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला २३ टक्के महामंडळ येणार आहेत. (तभा वृत्तसेवा)

### एसटी, म्हाडा, सिडको कुणाला मिळणार ?

राज्यातील अत्यंत महत्त्वपूर्ण आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम मानल्या जाणाऱ्या म्हाडा, सिडको आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी महामंडळ) यासारख्या प्रमुख महामंडळांच्या अध्यक्षपदांवर कोणत्या पक्षाचा ताबा राहणार, याकडे आता संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. ज्या कार्यकर्त्यांनी स्थानिक पातळीवर पक्षासाठी उत्कृष्ट कामगिरी केली आहे, त्यांना या महामंडळांवर संधी दिली जाणार असल्याचे स्पष्ट संकेत वरिष्ठ नेत्यांनी दिले आहेत.

### महिनाभरात निर्णय

या ठरलेल्या सूत्रानुसार कोणत्या पक्षाला कोणते महामंडळ मिळणार, यावर महिन्याभरात अंतिम शिक्कामोर्तब केले जाणार आहे. महायुतीच्या आगामी बैठकीमध्ये महामंडळातील सदस्य आणि अध्यक्ष पदांच्या वाटपाची प्रक्रिया पार पडेल. यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अंतिम बैठकीत यावर अंतिम मंजुरीची मोहोर उमटवली जाईल.

# जागतिक स्तरावर भारताची प्रतिष्ठा जपण्यासाठी मोदी कार्यरत

### शरद पवारांनी उधळली स्तुतिसुमने



**मुंबई, २० मे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत राजकीय मतभेद असले, तरी पंतप्रधान जागतिक स्तरावर भारताची प्रतिष्ठा जपण्यासाठी सदैव कार्यमग्न आहेत, हे विसरता कामा नये, अशी स्तुतिसुमने राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार गट) प्रमुख शरद पवार यांनी उधळली.

राष्ट्रीय हितासाठी सामूहिकपणे काम करण्याची संधी मिळेल, तेव्हा प्रत्येकाने एका समान उद्देशाने एकत्र यावे आणि देशाची प्रतिष्ठा बळकट करण्यास हातभार लावावा, असे शरद पवार यांनी येथे आयोजित एका कार्यक्रमाला संबोधित करताना सांगितले.

इंदिरा गांधी, पी. व्ही. नरसिंह राव आणि डॉ. मनमोहनसिंह यांच्यासारख्या नेत्यांनी नेहमीच देशाचे भविष्य आणि प्रतिष्ठा नेहमीच नेतृत्वाच्या केंद्रस्थानी ठेवली आहे. भारताची प्रतिष्ठा जपण्यात राजकीय मतभेद आड येऊ नयेत आणि नरेंद्र मोदी विदेशात भारताचा सन्मान उंचावण्याचे कार्य करीत आहेत, असे शरद पवार यांनी सांगितले.

नरेंद्र मोदी भारताची प्रतिष्ठा विदेशात जपण्याचे काम करीत आहेत. आमच्यात राजकीय मतभेद असतील. पण, देशाच्या प्रतिष्ठेचा विषय येतो तेव्हा, त्यात राजकीय मतभेद आड येता कामा नये, असे शरद पवार यांनी पुणे येथील लक्ष्मणराव गुट्टे ग्रामीण प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या राज्य व जिल्हा स्तरावरील माजी पदाधिकाऱ्यांच्या कृतज्ञता व स्नेहमेळाव्याला संबोधित करताना सांगितले.

या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्यांपैकी अनेकांनी आपल्या आयुष्यातील सर्वाधिक जोमदार वर्षे युवक काँग्रेस आणि इतर संघटनांसाठी समर्पित केली होती आणि आता ते विविध राजकीय पक्षांमध्ये कार्यरत आहेत. आज कदाचित काही जण वेगवेगळ्या पक्षांमध्ये असतील. परंतु, तुम्ही सर्वजण सामान्य लोकांमध्येच वावरत राहिला आहात आणि समाजाप्रती असलेली तुमची सामाजिक बांधिलकी तुम्ही जाणीवपूर्वक जपली आहे, असे त्यांनी नमूद केले. (वृत्तसंस्था)

# अशोक खरातला सहा दिवसांची न्यायालयीन कोठडी

**मुंबई, २० मे**

पीएमएलए कोर्टाने आज भोंदू अशोक खरातची सहा दिवसांच्या ईडी कोठडीत रवानगी केली. यावेळी झालेल्या सुनावणीत ईडीच्या वकिलांनी अशोक खरातने पतसंस्थांमधील बोगस खात्यांचा वापर पैशांचे लेअरिंग करण्यासाठी केल्याचा आरोप केला.

खरातने आरोपीच्या पिंजऱ्यात उभे राहून स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला. पण अखेर कोर्टाने त्याला ईडीच्या कोठडीत पाठवले. भोंदू अशोक खरातवर अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. याशिवाय आर्थिक फसवणुकीचेही अनेक आरोप त्याच्यावर आहेत. ईडीने त्याचा ताबा घेतल्यानंतर बुधवारी त्याला मुंबई स्थित पीएमएलए कोर्टापुढे हजर करण्यात आले.



यावेळी झालेल्या सुनावणीत ईडीच्या वकिलांनी काही महत्त्वाच्या गोष्टी कोर्टापुढे मांडल्या. अशोक खरातने समता नागरी क्रेडिट सोसायटीत अनेकांच्या नावाने ६३ खाती उघडली. या सर्व खात्यांना खरातचा नंबर जोडण्यात आला. तसेच या खात्यांचा नॉमिनी म्हणूनही खरातचेच नाव होते. त्याचा लाभार्थीही तोच होता, असा युक्तिवाद ईडीने केला. या खात्यांचा वापर पैशांचे लेअरिंग करण्यासाठी करण्यात आला. या खात्यांत कोट्यवधींची रक्कम रोकडीत भरण्यात आली आणि काढण्यात आली.

एवढे पैसे कुठून आले व कुठे गेले. आम्हाला या प्रकरणी अंतिम लाभार्थ्यापर्यंत पोहोचायचे आहे. या प्रकरणात इतर कुणाचा हात आहे का, याचा शोध घ्यायचा आहे. प्रस्तुत प्रकरणात कोणतीही डिपॉझिट स्लिप न भरता कॅशियरच्या मदतीने थेट खात्यात पैसे जमा करण्यात आले. (वृत्तसंस्था)

# मिनी बांगलादेशावर पालिकेचा हातोडा!

## अनधिकृत घुसखोरांच्या साम्राज्यावर बुलडोझर ● दगडफेकीमुळे पोलिसांचा लाठीचार्ज

**मुंबई, २० मे**

मुंबईतील वांद्रे (पश्चिम) येथील बेहराम पाडा आणि शास्त्रीनगर या भागात मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामांवरील तोडकाम कारवाई दरम्यान आज प्रचंड हायव्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला. पालिकेने

संशयीत बांगलादेशी घुसखोरांच्या अनधिकृत साम्राज्यावर पालिकेने बुलडोझर चालवला. यावेळी संतप्त जमावाने कायदा हातात घेत पोलिसांवर आणि पालिकेच्या कर्मचाऱ्यांवर तुफान दगडफेक केली. या हिंसक हल्ल्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना अखेर कडक लाठीचार्ज करावा लागला.



वांद्रे पश्चिम येथील शास्त्रीनगर आणि बेहराम पाडा हा भाग अनेक वर्षांपासून अनधिकृत बांधकामे आणि संशयीत बांगलादेशी घुसखोरांच्या वास्तव्यामुळे चर्चेत राहिला आहे. या भागातील अनेक बहुमजली बेकायदेशीर झोपड्यांवर निष्कासनाची (तोडकाम) कारवाई करण्यासाठी पालिकेचे पथक चोख पोलीस बंदोबस्तासह घटनास्थळी पोहोचले होते. पालिकेच्या बुलडोझरने जशी कारवाई सुरू केली, तसा शेकडो स्थानिक नागरिकांचा जमाव रस्त्यावर उतरला. सुरुवातीला प्रशासकीय अधिकाऱ्यांना धमकावण्याचा प्रयत्न करणाऱ्या या जमावाने अचानक हिंसक वळण घेत पोलिसांवर दगडफेक सुरू केली. जमावाकडून झालेल्या अचानक दगडफेकीमुळे काही काळ तणाव निर्माण झाला होता. मात्र, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि सरकारी कामात अडथळा आणणाऱ्या हुल्लडबाजांना धडा शिकवण्यासाठी पोलिसांनी लाठ्या सरसावल्या. पोलिसांनी कडक लाठीचार्ज करत दंगलखोरांना गल्लीबोळात पळवून लावले. या राड्यानंतर घटनास्थळी अतिरिक्त पोलीस कुमक आणि राज्य राखीव पोलीस दलाची तुकडी पाचारण करण्यात आली. पोलिसांनी दगडफेक करणाऱ्या आणि दंगल घडवणाऱ्या अनेक संशयितांना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडे वैध भारतीय कागदपत्रे आहेत का, यादृष्टीनेही तपास सुरू आहे. (तभा वृत्तसेवा)

### घुसखोरांना पाठीशी घालणाऱ्यांचे धाबे दणाणले

या कारवाईनंतर काही काळ तणाव असला, तरी पोलीस आणि पालिकेचे प्रशासन कारवाईवर ठाम राहिले. चोख बंदोबस्तात बेकायदेशीर बांधकामे पाडण्याचे काम पुढे सुरूच ठेवण्यात आले. ‘‘सरकारी कामात खोडा घालणाऱ्या आणि पोलिसांवर हात उचलणाऱ्या हुल्लडबाजांची गय केली जाणार नाही. येथील अनधिकृत बांधकामे पूर्णपणे भुईसपाट केली जातील,’’ असा इशारा प्रशासकीय सूत्रांनी दिला आहे. या कारवाईमुळे मुंबईत बेकायदेशीरपणे पाय पसरू पाहणाऱ्या समाजकंटकांचे आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

# रशियन तेलाची भारताकडून खरेदी

## पेट्रोल-डिझेलच्या तुटवड्यामुळे ब्रिटनचा निर्णय

**लंडन, २० मे**

इराण आणि अमेरिका यांच्यातील सुरू असलेल्या युद्धामुळे कच्च्या तेलाचे दर गगनाला भिडले आहे. अनेक देशांमध्ये इंधनाचे संकट निर्माण झाले आहे आणि नवीन जागतिक समीकरणे उदयास येत आहेत.



अशातच जगाला आदर्शांचा उपदेश करणाऱ्या पाश्चात्त्य देशांनाही परिस्थिती पुढे झुकण्याची वेळ आली. रशियावर आगपाखड करणाऱ्या ब्रिटनने भारताकडून प्रक्रिया केलेले रशियन तेल आयात करण्याचा निर्णय घेतला आहे.

तेलाच्या तुटवड्यामुळे आणि दरवाढीमुळे हा निर्णय घेतल्याचे ब्रिटनच्या वाणिज्य विभागाने म्हटले आहे. ब्रिटिश सरकारने रशियावरील कठोर निर्बंध लक्षणीयरीत्या शिथिल केले आहेत. मंगळवारी रात्री उशिरा, ब्रिटनने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, भारत आणि तुर्कीमधील तेल शुद्धीकरण कंपन्यांकडून रशियाचे प्रक्रिया केलेले डिझेल आणि विमानाचे इंधन कोणत्याही कालमर्यादेशिवाय आयात करण्यात येणार आहे. दरम्यान, युक्रेन युद्धानंतर रशियाच्या अर्थव्यवस्थेला धक्का देण्यासाठी ब्रिटनने रशियन तेल उत्पादनांवर संपूर्ण निर्बंध लादले. मात्र होर्मुझ जलमार्गात आलेल्या व्यत्ययामुळे त्यांना रशियावरील निर्बंध शिथिल करावे लागले. पूर्वी, युरोप आपल्या गरजांच्या मोठ्या भागासाठी आखाती देशांतील तेल शुद्धीकरण केंद्रांवर अवलंबून होते, परंतु मध्यपूर्वेतील संघर्षामुळे तेथील उत्पादनात घट झाल्याने या देशांपुढे तेलासाठी पर्यायी मार्ग शोधण्याची वेळ आली. (वृत्तसंस्था)

**ऑनलाईन तभा वाचण्यासाठी www.tarunbharat.net वर भेट द्या!**



जम्मू जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय सीमेजवळ पाकिस्तानातून पाठवण्यात आलेल्या ड्रोनमधून टाकण्यात आलेले मादक पदार्थ सुरक्षा दलाने जप्त केले

# आयोगाने दुपटीने वाढविली फालतातील सुरक्षा

### निवडणूक आज

**कोलकाता, २० मे**

पश्चिम बंगालमधील फालता विधानसभा मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर ईव्हीएममध्ये फेरफार झाल्याच्या आरोपांमुळे मागील महिन्यात रद्द करण्यात आलेले मतदान आता २१ मे रोजी होत आहे. निवडणूक आयोगाने यासाठी सुरक्षा व्यवस्था जवळपास दुप्पट केली, असे आयोगाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने बुधवारी सांगितले.

प्रत्येक मतदान केंद्रावर केंद्रीय सशस्त्र पोलिस दलाचे आठ जवान म्हणजेच एका तुकडीइतके मनुष्यबळ तैनात केले जातील, अशी माहिती राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालयातील एका अधिकाऱ्याने दिली. २९ एप्रिल रोजी झालेले आणि अखेरीस रद्द करण्यात आलेले मतदान पार पडत असताना प्रत्येक मतदान केंद्रावर केवळ चार कर्मचारी किंवा एका तुकडीचा अर्धा भाग तैनात करण्यात आले होते, असे त्यांनी पुढे सांगितले. आयोगाला यावेळी कोणत्याही प्रकारच्या अनियमितेस वाव ठेवायचा नाही. त्यामुळेच सुरक्षा व्यवस्था लक्षणीयरीत्या बळकट करण्यात आली आहे, असे निवडणूक आयोगाच्या एका अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी केंद्रीय दलांच्या सुमारे ३५ तुकड्या तैनात केल्या जातील, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. (वृत्तसंस्था)

# परिषदेच्या १७ जागांसाठी महायुतीत चुरस

## मित्रपक्षांना सोबत घेण्याबाबत मुख्यमंत्री फडणवीस आग्रही

**मुंबई, २० मे**

राज्यात गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील विधान परिषदेच्या १७ जागांसाठी येत्या १८ जून रोजी या जागांसाठी मतदान होणार असून, या घोषणेमुळे राज्यातील राजकीय वातावरण ऐन उन्हाळ्यात चांगलेच तापले आहे. या १७ जागांवर महायुतीमधील तीनही प्रमुख घटक पक्ष भाजपा, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कशा प्रकारे जागावाटपाचा तिढा सोडवून विजयाची घोडदौड कायम राखतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

विशेषतः ठाणे-पालघर, पुणे, छत्रपती संभाजीनगर-जालना, परभणी-हिंगोली, अहिल्यानगर, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग आणि यवतमाळ या ७ महत्त्वाच्या मतदारसंघांत महायुतीच्या मित्रपक्षांमध्ये उमेदवारीसाठी सकारात्मक चुरस पाहायला मिळत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असलेल्या ठाणे-पालघर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात भाजपाकडे सर्वाधिक ४४४ मतांचे तगडे संख्याबळ आहे, तर शिवसेना आणि निलेश सांबरे गटाची मिळून ३४६ मते आहेत.

रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग हा मतदारसंघात एकूण ८३१ मतदारांपैकी एकट्या शिवसेनेकडे २८९ सदस्य आहेत. भाजपा २८५ सदस्यांसह दुसऱ्या क्रमांकावर अगदी काठावर आहे, तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडे १०६ सदस्य आहेत.

### पुण्यात राकाँचे बळ जास्त पण भाजपाचेही तगडे आव्हान

पुणे जिल्ह्यातील सुमारे ८०४ मतदारांपैकी सर्वाधिक ३४७ सदस्य अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडे आहेत. त्याखालोखाल भाजपा ३१९ सदस्यांसह दुसऱ्या स्थानावर आहे. शिवसेनेकडे ६८ मते आहेत. जरी राष्ट्रवादीचे संख्याबळ जास्त असले, तरी दौंड नगरपालिकेतील घडामोडींमुळे भाजपाची ताकद वाढली आहे. त्यामुळे ही जागा मित्रपक्षांमध्ये कोणाकडे जाते, यावर खल सुरू आहे. छत्रपती संभाजीनगर आणि जालना या दोन्ही महापालिकांवर भाजपाचे नियंत्रण असून, जिल्हा परिषद आणि बहुतांश नगरपालिकांवर भाजपाचेच वर्चस्व आहे.

परभणी-हिंगोली ही जागा संख्याबळानुसार अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला मिळण्याची शक्यता असली, तरी भाजपाकडून इच्छुकांची मोठी फौज तयार आहे. त्यातच शिवसेनेने माजी आमदार विप्लव बाजोरिया यांच्या माध्यमातून तयारी सुरू केल्याने इथे त्रिअंकी चर्चा सुरू आहे. अहिल्यानगरमध्ये महायुतीकडून भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे-पाटील आणि महाविकास आघाडीकडून प्राजक्त तनपुरे आमनेसामने येण्याची दाट शक्यता असल्याने ही निवडणूक प्रतिष्ठेची ठरणार आहे. (तभा वृत्तसेवा)

### यवतमाळचा तिढा

**या मतदारसंघात भाजपाकडे १३७ तर शिवसेनेकडे ९३ मते आहेत. विरोधी पक्षांकडेही ११० मते असल्याने महायुतीला इथे अत्यंत विचारपूर्वक उमेदवार द्यावा लागणार आहे. भाजपाकडून मदन येरावार, सुमीत बाजोरिया तर शिवसेनेकडून सलीम खेतानी यांच्या नावांची चर्चा आहे.**

> महायुतीमधील तिन्ही घटक पक्ष भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र बसून जागावाटपाचा अंतिम निर्णय घेतील. वेगवेगळ्या योग्य निकषांवर आधारित चर्चा करून ही निवडणूक एकत्रितपणे लढवण्याचा आणि जिंकण्याचा आमचा दृढ प्रयत्न आहे. कोणत्याही एका पक्षाचा एकतर्फी दावा नसून, आम्ही सर्व जागांवर एकजुटीने सामोरे जाऊ.
>
> **देवेंद्र फडणवीस**
> मुख्यमंत्री

# २३ मे पूर्वी चर्चेला यावे : मनोज जरांगे

## चर्चेसाठी थांबवल्या गावागावांतील बैठका

**मुंबई, २० मे**

मी कधीच स्वतःहून कोणाला चर्चेसाठी निमंत्रण देत नाही. परंतु, भाजपा आमदार प्रसाद लाड यांच्या बोलण्यात एक आपुलकी आणि माया दिसून आली तसेच मुख्यमंत्र्यांकडून १०० टक्के मागण्या मान्य करून घेऊ, असा शब्द त्यांनी दिला. म्हणूनच समाजाने त्यांना चर्चेचे निमंत्रण दिले आहे.



आता त्यांनी याकडे दुर्लक्ष करू नये आणि सरकार किंवा पक्षासाठी मराठा समाजाशी दगाफटका करू नये, असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. प्रसाद लाड यांनी दिलेल्या शब्दावर विश्वास ठेवून आम्ही गावोगावच्या बैठका थांबवल्या आहेत, यामुळे त्यांनी २३ मेपूर्वी चर्चेला यावे, असे आवाहनही जरांगे पाटील यांनी केले. आवडी-निवडीचा कोणताही मंत्री सरकारमध्ये नाही. अनेक मंत्री रोज बोलत असतात, पण आम्ही कोणालाही चर्चेसाठी बोलावत नाही. प्रसाद लाड यांचे शब्द खरे वाटल्यानेच त्यांना आमंत्रित केले आहे. सरकार एखाद्या आमदाराच्या माध्यमातून काय डाव टाकेल, हे सांगता येत नाही. यामुळे आपण पूर्ण विश्वास ठेवू शकत नाही. मला कोणाबद्दलही आकस किंवा द्वेषभावना नाही, पण माझ्या समाजाला आरक्षण मिळाले नाही, तर मी कोणाला सोडणार नाही, असे जरांगे म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी आमच्या सर्व मागण्या मान्य कराव्यात, म्हणजे आम्हाला आंदोलन करण्याची गरजच उरणार नाही, असे ते म्हणाले

प्रसाद लाड चर्चेला येणार म्हणून आम्ही काही दिवस थांबलो आहोत. जर ते आले नाहीत, तर ऐनवेळी आंदोलनाची तयारी करायला कमी दिवस मिळतील. ३० मे रोजी होणारे आंदोलन आम्ही अजिबात थांबवणार नाही. हे आंदोलन कोणत्याही द्वेषातून नसून मुलांच्या हक्कासाठी आहे, असे मनोज जरांगे म्हणाले. (वृत्तसंस्था)

### कोणत्याही पक्षाच्या विरोधात नाही

भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी किंवा काँग्रेस अशा कोणत्याही राजकीय पक्षाच्या विरोधात आहे असा गैरसमज कोणी करून घेऊ नये. मी केवळ एक आंदोलक आहे आणि माझ्या समाजाच्या मुलांच्या भविष्यासाठी लढत आहे, असे भूमिकेविषयी समाजात कोणताही संभ्रम राहू नये यासाठी स्पष्टीकरण देताना मनोज जरांगे पाटील म्हणाले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# बेगडी भूतदयेला चपराक

‘भीक नको पण कुत्रा आवर’ ही म्हण उगाच समाजात प्रचलित झाली नाही. कारण कुणालाही ‘कुत्र्याच्या मौतीने मरणे’ म्हणजे, हाल हाल होऊन मरणे लोकांना अपेक्षित नाही. त्यामुळे श्वानांविषयीचे जेवढे बेगडी प्रेम उच्चभ्रूंना आहे, त्यापेक्षा कितीतरी जास्त दहशत सर्वसामान्य जनतेत आहे. नजीकच्या काळात तर आपल्या गल्लीबोळांतून शांतपणे चालणेदेखील मोठी कसरत होऊन बसली आहे. कधी पाठीमागून येऊन एखादा मोकाट श्वान कुणाच्या पायाचा लचका तोडेल, याचा काही नेम नाही. विशेषतः लहान मुलांवर, ज्येष्ठ नागरिकांवर श्वानांच्या टोळीने थेट जीवघेणे हल्ले केल्याची कितीतरी उदाहरणे आहेत. प्राणी दया आणि मानवी हक्क यांच्यातल्या या लढाईत सामान्य माणसाचा जीव टांगणीला लागला असताना, सर्वोच्च न्यायालयाने दिलेला ऐतिहासिक निर्णय कोट्यवधी भयभीत नागरिकांना दिलासा देणारा आहे. शेवटी न्यायालयानेही नागरिकांचा जीव जास्त महत्त्वाचा आहे, असे मानले. धोकादायक आणि पिसाळलेल्या श्वानांना वेदनारहित मृत्यू दिला जाऊ शकतो, हा निर्णय या समस्येवरील उपाय सर्वोच्च न्यायालयाने सुचविला.

न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संदीप मेहता आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांच्या न्यायासनाने हा अत्यंत महत्त्वाचा निकाल दिला आहे. जे मोकाट श्वान माणसासाठी धोका ठरू शकतात, पिसाळलेले आहेत किंवा असाध्य आजारांनी ग्रस्त आहेत, त्यांना आता वेदनारहित मृत्यू दिला जाऊ शकतो. यात आणखी एक समजून घेतले पाहिजे की, न्यायालयाने अगदी सरसकट सगळ्या भटक्या श्वानांना ‘मौत के घाट उतारों’ असे म्हटलेले नाही. ज्या भागात मोकाट श्वानांची संख्या चिंताजनक व धोक्याच्या पातळीवर पोहोचली आहे, तिथे नागरी प्रशासन त्यांना मृत्यू देण्याचा पर्याय निवडू शकते, असे म्हटले आहे. ही संपूर्ण प्रक्रिया ‘प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायदा-१९६०’ आणि ‘प्राणी जन्म नियंत्रण नियम-२०२३’च्या चौकटीत राहून, पशुवैद्यकीय तज्ज्ञांच्या देखरेखीखाली केली जावी, असेही नमूद केले गेले आहे. त्यामुळे उगाच या निकालाचा बाऊ केला जाऊ नये. आता काही तथाकथित श्वानप्रेमी बेंबीच्या देठापासून ओरडतील. त्यामुळे एक पाऊल पुढे जाऊन न्यायालयाने, या आदेशाची अंमलबजावणी करणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांवर कोणताही ‘एफआयआर’ किंवा कठोर कारवाई केली जाऊ नये, असेही स्पष्ट करीत, प्रशासनाचे हात बळकट केले आहेत.

हा निर्णय न्यायालयाला का घ्यावा लागला यामागे देशातील भीषण परिस्थिती कारणीभूत आहे. मागच्या वर्षभरातील एकट्या महाराष्ट्राच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास अंगावर काटा आल्याशिवाय राहत नाही. राज्यात श्वानांनी चावा घेतल्याच्या तब्बल ४ लाख ३० हजारांहून अधिक घटना आहेत. रेबीजमुळे झालेले मृत्यू ७० पेक्षा जास्त आहेत. एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात एप्रिल २०२० ते २०२५ च्या नोव्हेंबर महिन्यापर्यंत मोकाट श्वानांनी ४४ हजार २९९ लोकांना चावा घेऊन जखमी केले आहे तर दोघांचा मृत्यूही झाला आहे. मुंबई, पुणे, नागपूर आणि ठाण्यासारख्या मोठ्या शहरांतही मोकाट श्वानांची दहशत कमालीची वाढली आहे. रात्रीच्या वेळी दुचाकीस्वारांच्या मागे धावणे, पहाटे फिरायला जाणाऱ्या वृद्धांवर हल्ले करणे आणि झोपडपट्टी किंवा सोसायट्यांच्या आवारात खेळणाऱ्या लहान मुलांना लक्ष्य करणे अशा घटना रोजच्या झाल्या आहेत. रेबीज आजारावर अजूनही शंभर टक्के खात्रीशीर उपचार आहे, असे म्हणता येत नाही. आजही ‘अँण्टी रेबीज व्हॅक्सिन’, ‘अँण्टी रेबीज सिरम’ मोठ्या शहरांमध्येसुद्धा पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाहीत. ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांबाबत तर बोलायलाच नको. अशा स्थितीत जनतेला वाऱ्यावर सोडणे न्यायव्यवस्थेला मान्य नव्हते आणि म्हणून सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा हा अतिशय योग्य आणि काळाची गरज ठरला आहे.

भारतीय संविधानाचे कलम २१ प्रत्येक नागरिकाला सन्मानाने आणि सुरक्षितपणे जगण्याचा अधिकार देते. न्यायालयाने आपल्या निरीक्षणात नेमक्या याच मुद्द्यावर बोट ठेवले आहे. सार्वजनिक ठिकाणी मोकाट फिरणाऱ्या श्वानांच्या भीतीविना मुक्तपणे फिरण्याचा अधिकारदेखील या मूलभूत अधिकारांत समाविष्ट आहे. श्वान चावण्याच्या भीतीने माणसाने स्वतःला घरात कोंडून घ्यायचे का? रात्री-अपरात्री कामावरून घरी येताना हातात काठी घेऊन फिरायचे का? या प्रश्नांची उत्तरे या निकालातून मिळाली आहेत. या समस्येचा दुसरा पैलू म्हणजे, पाळीव प्राण्यांच्या शौकिनांचे काय...? तर ज्यांना श्वान पाळण्याची आवड आहे, त्यांनी ते नक्की करावे. त्यात कुणाला किंतु-परंतु असण्याचे कारण नाही. पण तुम्ही तुमची आवड तुमच्या घरात ठेवा, ती दुसऱ्याच्या जिवावर उठू देऊ नका, हा साधा नियम आहे आणि तो पाळला गेलाच पाहिजे. लोक महागडे श्वान पाळतात, पण त्यांना शौचास बसवण्यासाठी सकाळी सकाळी सार्वजनिक ठिकाणी घेऊन जातात. भूतदयावान असलेला बंगल्याचा मालक आपल्या कुत्र्याचा प्रातर्विधी शेजारच्या घरासमोर उरकतो. शिवाय त्यांचे श्वान इतरांवर भुंकतात, चावण्याचा प्रयत्न करतात. आपल्याकडील पाळीव प्राण्यामुळे शेजाऱ्यांना किंवा पादचाऱ्यांना त्रास होत असेल तर ती भूतदया नसून तो बेजबाबदारपणा आहे. तुम्हाला प्राणी पाळायचा असेल, तर त्याच्या सुरक्षिततेची, खाण्यापिण्याची आणि मलविसर्जनाची संपूर्ण व्यवस्था तुमच्या स्वतःच्या हद्दीत करा. दुसऱ्याला चावण्यासाठी किंवा त्रास देण्यासाठी तुमच्या लाडक्या श्वानांना रस्त्यावर मोकळे सोडू नका. तसे होत असेल तर तो गुन्हाच मानला गेला पाहिजे. समाज माध्यमांवर प्राण्यांच्या हक्कासाठी लांबलचक ‘पोस्ट’ टाकणारे ‘अँनिमल लव्हर्स’ अनेकदा अशा समस्येवरील उपायांचे मुख्य खलनायक ठरतात. जेव्हा महानगरपालिका किंवा नगरपालिका यंत्रणा मोकाट श्वानांना पकडायला येते, तेव्हा हेच लोक ढाल बनून उभे ठाकतात. मोकाट श्वानांना खायला घालणारेही बरेच आहेत. दयाभाव म्हणून ते समजून घेता येते. पण त्यामुळे त्या सार्वजनिक भागात कुत्र्यांचा वावर वाढतो आणि तिकडच्या लोकांची सुरक्षा संकटात येते. श्वान मुलांच्या अंगावर तुटून पडतात, याचे भान या कथित श्वानप्रेमींना असायला हवे. मोकाट श्वानांची टोळी एखाद्या गरिबाच्या चिमुकल्याला ओरबडून टाकते, तेव्हा हे भूतदयेचा शंखनाद करणारे कार्यकर्ते कुठे असतात? त्या मृत बालकाच्या आई-वडिलांचे अश्रू पुसायला ते का येत नाहीत? कारण या लोकांची भूतदया अत्यंत सोयीची आणि पोकळ असते. इतरांच्या लेकरांचे बळी जातानाही त्यांना प्राण्यांचे हक्क आठवतात. स्वतःच्या घरातील सदस्याला श्वानाने चावा घेतला की, यांची तत्त्वे लगेच बदलतात. अशा ढोंगी विचारसरणीवर सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयाद्वारे प्रहार केला आहे.

निसर्गाच्या साखळीत प्रत्येक प्राण्याला स्थान आहे, हे मान्य केले तरी मानवी वस्तीत माणसाचा जीव हाच सर्वोच्च असला पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता स्थानिक प्रशासनाला काम करण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे. तरी ते काम करणार नसतील तर त्यांच्यावरही न्यायालयाच्या अवमानाचा खटला चालवला जावा, असे निकालात स्पष्ट केले आहे. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात प्राण्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण करणे, त्यासाठी ठिकठिकाणी केंद्रे उभारणे, अँण्टी-रेबीज औषधांची पुरेशी उपलब्धता करणे, धोकादायक ठरणाऱ्या श्वानांना हटवणे, गरज पडल्यास त्यांना वेदनारहित मृत्यू देणे हे सारे आता गरजेचे होऊन बसले आहे. अतिरेकी व अविचारी भूतदयेचा पुळका बाजूला सारून वास्तवाचे भान ठेवले पाहिजे. शहरांना आणि गावांना भयमुक्त केले पाहिजे. आता तर जंगल परिसरही या श्वानांपासून जपण्याची वेळ आली आहे. जंगलाच्या आसपासच्या गावांमधील भटक्या श्वानांचा वन्यजीवांना धोका मोठा आहे. या श्वानांनी हरीण, ससा, मोर, कोल्हे आणि छोटे पक्षी यासारख्या प्राण्यांवर हल्ले करून त्यांना ठार केल्याच्या घटना घडत आहेत. त्यांना अर्धवट खाऊन सोडल्यामुळे ‘रेबीज आणि डिस्टेंपर’सारखे घातक रोग वन्यजीवांमध्ये पसरले आहेत. त्यावर उपाय म्हणून व्याघ्र प्रकल्प आणि अभयारण्य प्रशासनाने नजीकच्या गावांमध्ये विशेष मोहीम राबवून भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण आणि लसीकरण करण्यावर भर दिला आहे. आता न्यायालयाच्या या निर्णयानंतर तरी नगर व ग्रामीण प्रशासनाने जागे व्हावे आणि नागरिकांना सुरक्षित जीवन जगू द्यावे, एवढेच.

## विशेष

# भारतीय रेल्वेची धडाकेबाज योजना

**प्रा. सुखदेव बखळे**

दीर्घकाळ भारतीय रेल्वेचा विस्तार मुख्यतः सरकारी निधीवर आधारित होता; मात्र वाढत्या लोकसंख्येचा दबाव, औद्योगिक वाढ आणि पायाभूत सुविधांवरील वाढती मागणी पाहता केवळ सरकारी निधीवर रेल्वेचा विस्तार करणे कठीण होत चालले आहे. केंद्र सरकारसमोर आरोग्य, शिक्षण, संरक्षण, ग्रामीण विकास, सामाजिक कल्याण आणि शहरी पायाभूत सुविधा अशा अनेक क्षेत्रांमध्ये मोठ्या गुंतवणुकीची गरज आहे. अशा परिस्थितीत रेल्वे क्षेत्रात खाजगी गुंतवणूक आकर्षित करण्याचा प्रयत्न अधिक वेगाने सुरू झाला आहे. रेल्वे मंत्रालयाने तत्त्वतः मंजुरी मिळवलेल्या सहा प्रकल्पांमध्ये मुख्यतः मालवाहतुकीसाठीचे रेल्वे कॉरिडॉर उभारले जाणार आहेत. चार कोळसा वाहतूक कॉरिडॉर, एक बॉक्साईट वाहतूक मार्ग आणि एक लोखंड धातू वाहतूक कॉरिडॉर या योजनांमध्ये समाविष्ट आहेत. या सर्व प्रकल्पांची एकत्रित लांबी सुमारे ६४० किलोमीटर असेल. हे मार्ग विशेषतः खाण, ऊर्जा आणि अवजड उद्योग क्षेत्रासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत. भारतातील वीजनिर्मिती मोठ्या प्रमाणात कोळशावर आधारित आहे. देशातील अनेक वीज प्रकल्पांना वेळेवर कोळसा पोहोचवण्यात रेल्वेची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. अनेकदा कोळसा वाहतुकीतील अडचणींमुळे वीजनिर्मितीवर परिणाम होतो. त्यामुळे स्वतंत्र मालवाहतूक कॉरिडॉर उभारल्यास कोळसा वाहतूक अधिक वेगवान आणि कार्यक्षम होऊ शकते. त्याचप्रमाणे बॉक्साईट आणि लोखंड धातू वाहतुकीमुळे स्टील आणि धातू उद्योगालाही मोठा फायदा होणार आहे. या प्रकल्पांची सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे ते सार्वजनिक-खाजगी भागीदारी अर्थात ‘पीपीपी’ मॉडेलवर उभारले जाणार आहेत.

यावेळी रेल्वे मंत्रालयाने काही महत्त्वाचे बदल केले आहेत. सर्वप्रथम, प्रकल्पांचा सवलत कालावधी ५० वर्षांपर्यंत वाढवण्यात आला आहे. म्हणजे खाजगी कंपन्यांना दीर्घकाळ महसूल मिळवण्याची संधी असेल. दुसरे म्हणजे, जमीन अधिग्रहणाची जबाबदारी रेल्वे स्वतः घेणार आहे. भारतात पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये जमीन अधिग्रहण हा सर्वांत मोठा अडथळा मानला जातो. त्यामुळे खाजगी गुंतवणूकदारांवरील धोका कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सरकार ‘व्हायेबिलिटी गॅप फंडिग’ मॉडेलही वापरणार आहे. रेल्वेने ‘मिशन ३०००’ अंतर्गत २०३० पर्यंत वार्षिक मालवाहतूक क्षमता ३००० दशलक्ष टनांपर्यंत नेण्याचे लक्ष्य ठेवले आहे. भारतात रस्ते वाहतुकीच्या तुलनेत रेल्वे मालवाहतूक स्वस्त आणि पर्यावरणपूरक मानली जाते. त्यामुळे लॉजिस्टिक्स खर्च कमी करण्यासाठी रेल्वेचा वापर वाढवणे आवश्यक मानले जात आहे.



भारतामध्ये सध्या उद्योग क्षेत्राला उच्च लॉजिस्टिक्स खर्चाचा सामना करावा लागतो. अनेक विकसित देशांमध्ये लॉजिस्टिक्स खर्च जीडीपीच्या तुलनेत कमी असतो; पण भारतात तो तुलनेने जास्त आहे. याचा परिणाम भारतीय उद्योगांच्या स्पर्धात्मकतेवर होतो. रेल्वे मालवाहतूक अधिक वेगवान आणि कार्यक्षम झाल्यास उद्योगांच्या वाहतूक खर्चात मोठी बचत होऊ शकते. या प्रकल्पांमुळे बंदरे, खाण क्षेत्रे आणि औद्योगिक पट्टे यांना अधिक चांगली रेल्वे जोडणी मिळेल. परिणामी, निर्यातक्षमता वाढण्यास मदत होऊ शकते. ‘मेक इन इंडिया’ आणि उत्पादन क्षेत्राच्या विस्ताराच्या दृष्टीनेही ही गुंतवणूक महत्त्वाची ठरते; मात्र या निर्णयाकडे केवळ सकारात्मक दृष्टीने पाहून चालणार नाही. रेल्वे हा सार्वजनिक सेवाक्षेत्राचा भाग आहे. त्यामुळे खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढल्यास भविष्यात मालवाहतूक दर वाढतील का, नफ्यावर जास्त भर दिला जाईल का, याबाबत प्रश्न उपस्थित होतात. याशिवाय ‘पीपीपी’ मॉडेल भारतात अनेक क्षेत्रांमध्ये मिश्र परिणाम देणारे ठरले आहे. काही प्रकल्प यशस्वी झाले, तर अनेक प्रकल्प आर्थिक अडचणीत अडकले. त्यामुळे रेल्वे क्षेत्रातही पारदर्शक करार, स्पष्ट जबाबदाऱ्या आणि प्रभावी नियमन आवश्यक असेल. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे पर्यावरणीय परिणाम. कोळसा वाहतुकीसाठी स्वतंत्र कॉरिडॉर उभारणे आर्थिकदृष्ट्या आवश्यक असले, तरी भारताने हरित ऊर्जेकडे वाटचाल करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. व्यापक पातळीवर पाहता भारतीय रेल्वे आता मोठ्या संक्रमणाच्या टप्प्यावर आहे. प्रवासी वाहतुकीसोबतच मालवाहतुकीला प्राधान्य देत देशात जागतिक दर्जाची लॉजिस्टिक्स व्यवस्था उभारण्याचा प्रयत्न सुरू आहे. डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर, मल्टी-ट्रॅकिंग प्रकल्प, बुलेट ट्रेन, स्टेशन पुनर्विकास आणि आता खाजगी सहभागातून उभारले जाणारे नवे कॉरिडॉर या सर्व प्रकल्पांमधून रेल्वेचे स्वरूप बदलताना दिसत आहे. आर्थिक वाढ टिकवून ठेवायची असेल, तर मजबूत आणि आधुनिक वाहतूक व्यवस्था अपरिहार्य आहे. रेल्वे हा त्यातील सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढवण्याचा निर्णय गरजेचा मानला जाऊ शकतो; पण त्याच वेळी सार्वजनिक हित, पारदर्शकता आणि दीर्घकालीन राष्ट्रीय गरजा यांचा समतोल राखणेही आवश्यक राहणार आहे. भारतीय अर्थव्यवस्था सध्या जागतिक पटलावर वेगाने विस्तारत आहे. भारतीय रेल्वेने आपल्या मालवाहतूक क्षेत्रात खाजगी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी घेतलेला पुढाकार हा केवळ धोरणात्मक बदल नसून एक क्रांतिकारी टप्पा ठरणार आहे. आज भारताच्या एकूण मालवाहतुकीमध्ये रस्ते वाहतुकीचा वाटा साठ टक्क्यांपेक्षा जास्त आहे, तर रेल्वेचा वाटा २७ ते २८ टक्क्यांच्या आसपास स्थिरावला आहे. विकसित देशांमध्ये हे प्रमाण उलट असते. रेल्वे मालवाहतूक ही रस्ते वाहतुकीपेक्षा पर्यावरणपूरक आणि मोठ्या प्रमाणात मालाची ने-आण करण्यासाठी स्वस्त असते, तरीही पायाभूत सुविधांचा अभाव, मालाच्या चढ-उतारासाठी लागणारा वेळ आणि लवचीकतेचा अभाव यामुळे रेल्वे मागे पडत होती. सरकारी तिजोरीवर असलेला ताण आणि प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील विलंब या मर्यादा ओळखून केंद्र सरकारने ‘पीएम गतिशक्ती’ आणि ‘नॅशनल लॉजिस्टिक पॉलिसी’अंतर्गत खाजगी सहभागाला लाल गालिचा अंथरला आहे. रेल्वेने खाजगी क्षेत्राला आकर्षित करण्यासाठी अनेक महत्त्वाकांक्षी योजना आखल्या आहेत. ‘डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर’मुळे मालवाहतुकीसाठी स्वतंत्र मार्गिका तयार केल्या जात आहेत. यामुळे मालवाहू गाड्यांचा वेग वाढणार असून खाजगी कंपन्यांना स्वतःचे टर्मिनल विकसित करण्याची संधी मिळत आहे. ‘गतिशक्ती कार्गो टर्मिनल्स’ धोरणांतर्गत खाजगी संस्थांना रेल्वेच्या किंवा स्वतःच्या जमिनीवर कार्गो टर्मिनल उभारण्याची परवानगी दिली जात आहे. यामुळे मालाची हाताळणी अधिक वेगाने आणि आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे करणे शक्य होईल. तसेच ‘लिबरलाइज्ड वॅगन इन्व्हेस्टमेंट स्किम’सारख्या योजनांमुळे उद्योजक विशिष्ट प्रकारच्या वॅगन्स खरेदी करू शकतात आणि रेल्वे नेटवर्कचा वापर करू शकतात. खाजगी गुंतवणूक केवळ पैसा आणत नाही, तर कार्यक्षमता आणि तंत्रज्ञानदेखील आणते, हे यातून दिसू शकते.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# गडचिरोली बदलतेय..

गडचिरोली म्हटले की काही वर्षांपूर्वी डोळ्यासमोर उभे राहायचे ते दाट जंगल, दुर्गम भाग, भीतीचे वातावरण आणि माओवादाच्या सावटाखाली जगणारे सामान्य नागरिक. बंदुकीच्या आवाजात अनेक कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले, विकासाची वाट खुंटली आणि भीती हेच जणू दैनंदिन जीवनाचे वास्तव बनले होते. केवळ बंदुकीने किंवा कारवाईने हा प्रश्न सुटणारा नव्हता. यासाठी गरज होती ती लोकांचा विश्वास जिंकण्याची, त्यांच्या मनात पोलिस दलाबद्दल आपलेपणाची भावना निर्माण करण्याची आणि विकासाची नवी दिशा दाखवण्याची. गडचिरोली पोलिस दलाने नेमके हेच काम गेल्या काही वर्षांत सातत्याने करून दाखवले आहे. पोलिस म्हणजे केवळ गुन्हेगारांवर कारवाई करणारी यंत्रणा अशी सर्वसामान्य धारणा असते. गडचिरोलीत मात्र पोलिस दलाने ही पारंपरिक चौकट मोडून काढली. येथे पोलिसांनी फक्त शस्त्र हाती घेतले नाही, तर समाजाच्या जखमांवर फुंकर घालण्याचे काम केले. नक्षलवादाच्या समस्येला सुरक्षा प्रश्न म्हणून न पाहता, ती सामाजिक आणि मानसिक समस्या म्हणून हाताळण्याचा प्रयत्न झाला. यालाच ‘सोशल पोलिसिंग’ असे म्हटले जाते.



गडचिरोलीत आलेल्या अनेक पोलिस अधिकाऱ्यांनी या संकल्पनेवर सातत्याने भर दिला. राजवर्धन, शिरीष जैन, राजेश प्रधान, विदेश प्रभू, संदीप पाटील, नीलोत्पल आणि विद्यमान पोलिस अधीक्षक एम. रमेश यांच्यासह अनेक अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यकाळात लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. त्यांनी गावोगावी जाऊन लोकांचे प्रश्न ऐकले, आदिवासी बांधवांशी संवाद साधला आणि पोलिस दल हे शत्रू नसून तुमचे मित्र आहेत, हा विश्वास निर्माण केला.

गडचिरोली पोलिस दलाने राबविलेल्या दादालोरा खिडकी योजनेने अनेक दुर्गम भागातील आदिवासी कुटुंबांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून दिला. एखाद्या गरीब कुटुंबाला दाखले, शिष्यवृत्ती, आरोग्य सेवा किंवा रोजगार योजनांसाठी सरकारी दारात हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी पोलिस स्वतः पुढाकार घेताना दिसले. एका अर्थाने बंदूक हातात घेणाऱ्या पोलिसांनीच हातात विकासाची फाईल घेत लोकांच्या दारात पोहोचण्याचे काम केले. रोजगार मेळावे, आरोग्य शिबिरे, जनजागृती अभियान, आदिवासी विद्यार्थ्यांच्या सहली, मॅरेथॉन स्पर्धा, सामूहिक विवाह सोहळे यासारखे उपक्रमही या सोशल पोलिसिंगचा महत्त्वाचा भाग ठरले. दुर्गम जंगलात राहणाऱ्या तरुणांना शिक्षण, रोजगार आणि चांगल्या आयुष्याची वाट दाखविण्यासाठी पोलिस दलाने घेतलेली मेहनत उल्लेखनीय आहे. एका तरुणाच्या हातात बंदूक नको तर रोजगाराचे साधन असावे; एका विद्यार्थ्याच्या मनात भीती नको तर मोठी स्वप्ने असावीत या भावनेतून हे उपक्रम राबविले गेले. आदिवासी विद्यार्थ्यांना जिल्ह्याबाहेर, राज्याबाहेर शैक्षणिक सहलींना नेऊन त्यांना बाहेरचे जग दाखविण्याचा प्रयत्न झाला. जंगलाबाहेरही एक वेगळे जग आहे, शिक्षणातून प्रगती करता येते, सरकारी योजनांचा लाभ घेता येतो, ही जाणीव या मुलांच्या मनात निर्माण झाली. अशा अनेक उपक्रमांनी पोलिस दलाची प्रतिमा केवळ सुरक्षा रक्षकांची न राहता, समाज घडविणाऱ्या संस्थेची बनली. आरोग्य मेळाव्यांमुळे दुर्गम भागातील अनेक आदिवासींना प्रथमच तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा मिळाली. मॅरेथॉन आणि क्रीडा स्पर्धांमुळे तरुणाईला सकारात्मक दिशा मिळाली. सामूहिक विवाह सोहळ्यांमुळे गरीब कुटुंबांवरील आर्थिक भार हलका झाला. जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करून अनेक कुटुंबांना आधार देण्यात आला. हे सारे उपक्रम पाहिले की एक गोष्ट स्पष्ट होते - गडचिरोली पोलिस दलाने फक्त कायदा-सुव्यवस्था राखण्याचे काम केले नाही, तर समाजाचे पालकत्व स्वीकारल्यासारखी भूमिका घेतली. माओवाद्यांविरोधातील कठोर कारवाई आणि दुसरीकडे आत्मसमर्पण करणाऱ्यांसाठी पुनर्वसनाची संधी हा पोलिस दलाचा संतुलित दृष्टिकोन आहे. ज्यांनी हिंसेचा मार्ग सोडून मुख्य प्रवाहात येण्याचा निर्णय घेतला, त्यांना नव्याने आयुष्य जगण्याची संधी देण्यात आली. एका माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देण्याची मानवतावादी भूमिका आहे. आज गडचिरोलीत माओवाद संपुष्टात येण्याच्या मार्गावर असल्याचा दावा केला जातो, त्यामागे फक्त बंदुकीची ताकद नाही; त्यामागे लोकांचा विश्वास, पोलिस दलाची सातत्यपूर्ण मेहनत आणि समाजाला सोबत घेऊन चालण्याची कार्यपद्धती आहे. एकेकाळी भीतीने ग्रासलेल्या गावांमध्ये आज विकासाच्या चर्चा होतात, मुलांच्या शिक्षणाची स्वप्ने पाहिली जातात, रोजगाराच्या संधींबद्दल बोलले जाते, हे परिवर्तन सहज घडलेले नाही. आज गडचिरोलीच्या जंगलात शांततेची चाहूल लागते आहे आणि या शांततेमागे केवळ गोळीबार नाही तर पोलिस दलाने वर्षानुवर्षे घाम गाळून उभा केलेला विश्वास, माणुसकी आणि सामाजिक बांधिलकी आहे. हाच गडचिरोली पोलिस दलाचा खरा विजय म्हणावा लागेल.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

# फुटीचा फायदा विजय उचलतील का?

**श्यामकांत जहागीरदार**

तामिळनाडूत टीव्हीकेचे नेते आणि मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांच्या विश्वासदर्शक प्रस्तावावरील मतदानातून अण्णाद्रमुक पक्षात पुन्हा एकदा फूट पडली आहे. या फुटीचा फायदा मुख्यमंत्री विजय घेतील की द्रमुकचे माजी मुख्यमंत्री स्टॅलिन उचलतील, याकडे आता सर्वांचे लक्ष राहणार आहे. अण्णाद्रमुकमधील सी.व्ही. षण्मुगम आणि एस.पी. वेलुमणी यांच्या नेतृत्वातील २५ आमदारांनी विश्वासदर्शक प्रस्तावाच्या बाजूने मतदान केले. विधानसभा निवडणुकीत टीव्हीकेचे नेते विजय यांना सर्वाधिक जागा मिळाल्या. २३४ सदस्यांच्या तामिळनाडू विधानसभेत विजय यांच्या पक्षाने १०८ जागा जिंकल्या; प्रत्यक्षात विजय दोन मतदारसंघातून विजयी झाल्यामुळे पक्षाच्या आमदारांची संख्या मात्र १०७ झाली. बहुमतासाठी विजय यांच्या पक्षाला ११ जागा कमी पडल्या. पाच जागा जिंकणाऱ्या काँग्रेस पक्षाने विजय यांना सरकार बनवण्यासाठी पाठिंबा जाहीर केला. त्यामुळे आघाडीचे संख्याबळ ११२ झाले. तरीही पक्षाला बहुमतासाठी ६ जागा कमी पडत होत्या.

भाकप, माकप, व्हीसीके आणि मुस्लिम लीग या पक्षांचे प्रत्येकी दोन आमदार निवडून आले आहेत. या पक्षांनीही विजय यांना पाठिंबा दिल्यामुळे आघाडीने बहुमतासाठी आवश्यक असलेला आकडा गाठला. त्यामुळे विजय यांना मुख्यमंत्रिपदाची शपथ घेता आली. बहुमत नसल्यामुळे त्या आधी राज्यपालांनी अनेक वेळा विजय यांना ‘वेटिंग’वर ठेवले होते. विश्वासदर्शक प्रस्तावावर विजय यांना १२० मते पडतील, असे अपेक्षित असताना त्यांना अण्णाद्रमुकमधील बंडखोर आमदारांची लॉटरी लागली. २५ आमदारांचा पाठिंबा मिळाल्यामुळे विजय यांच्या सरकारच्या विश्वासदर्शक प्रस्तावाच्या बाजूने १४४ आमदारांनी मतदान केले. बहुमतासाठी वणवण फिरत असलेल्या विजय यांच्या पक्षाचा राजकीय चमत्कार म्हणूनही याकडे पाहात येईल. १६७ जागा लढवणाऱ्या अण्णाद्रमुकला राज्यात ४७ जागा जिंकता आल्या. पलानीस्वामी अण्णाद्रमुक विधिमंडळ पक्षाचे नेते असल्याचा दावा एका गटाने केला, तर दुसऱ्या गटाने वेलुमणी यांना पक्षाचा नेता करण्याची मागणी केली. प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या द्रमुकने मतदानावर बहिष्कार घातला होता. विरोधात पडलेली २२ मते अण्णाद्रमुकमधील पलानीस्वामी गटाच्या आमदारांची होती. यामुळे सध्या तरी काही महिने विजय यांच्या पक्षाला कोणताही धोका नाही. राज्यातील द्रमुक आणि अण्णाद्रमुक या दोन पक्षांची एकाधिकारशाही विजय यांच्या पक्षाने संपवली, हे मान्य करावेच लागेल. जवळपास ६० वर्षे राज्यात हे दोन पक्ष आलटून-पालटून सत्तेवर होते.विजय यांचा टीव्हीके पक्ष बहुमतापासून दूर असताना राज्यात द्रमुक आणि अण्णाद्रमुक यांनी एकत्र येऊन सरकार स्थापन करण्याची चर्चाही सुरू झाली होती. मात्र, त्याला अधिकृतपणे कोणी दुजोरा दिला नव्हता. द्रमुक आणि अण्णाद्रमुक हे एकदुसऱ्याचे कट्टर प्रतिस्पर्धी पक्ष आहेत. साप आणि मुंगूस म्हणूनही त्यांच्याकडे पाहता येईल.



राजकारणात कधी काय होईल, हे सांगता येत नाही. राजकारणात कोणीच कोणाचा कायमचा शत्रू वा मित्र नसतो, असे म्हणतात. उत्तरप्रदेशात काही वर्षांपूर्वी एकदुसऱ्याचे कट्टर विरोधक असलेल्या सपा आणि बसपा यांनी एकत्र येत सरकार बनवलेच होते. त्यामुळे तामिळनाडूत द्रमुक आणि अण्णाद्रमुक सरकार बनवण्यासाठी एकत्र येणार या बातमीने राज्यातील जनता सोडून बाहेर फार कुणाला आश्चर्य वाटले नाही. विजय यांच्या पक्षाच्या उसन्या बहुमतावर द्रमुकचे नेते आणि माजी मुख्यमंत्री स्टॅलिन यांना भरवसा नाही. राज्यातील सरकार कधीही कोसळू शकते, त्यामुळे कार्यकर्त्यांनी मध्यावधी निवडणुकीसाठी तयार राहावे, असे आवाहन त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना केले आहे. कार्यकर्त्यांमध्ये उत्साह टिकविण्यासाठी असे बोलावेच लागते, हा भाग वेगळा. अण्णाद्रमुकमध्ये अजूनपर्यंत औपचारिकपणे फूट पडली नाही. पक्षात फूट पडण्यासाठी दोनतृतीयांश म्हणजे किमान ३२ आमदारांची आवश्यकता आहे. पण बंडखोर गटाकडे सध्या फक्त २५ आमदार आहेत, म्हणजे ७ आमदार कमी आहेत. या २५ आमदारांना अपात्र ठरवण्याची मागणी अण्णाद्रमुकचे नेते पलानीस्वामी करू शकतात. पण ही मागणी विधानसभेच्या सभापतींकडे करावी लागते. सभापती सत्ताधारी टीव्हीके पक्षाचे असल्यामुळे या मागणीची दखल घेतली जाणार नाही, यात शंका नाही. त्यामुळे सध्या तरी या आमदारांना अपात्र होण्याचा कोणताही धोका नाही. कोणतेही सरकार भक्कमपणे चालवायचे असेल तर बहुमतासोबत विधानसभेचा सभापती हा तुमच्या पक्षाचा आणि मुख्यमंत्र्यांच्या विश्वासातील पाहिजे. म्हणजे सरकारला कोणत्याही परिस्थितीत धोका पोहोचत नाही. राज्यातील जनतेने विजय यांना मुख्यमंत्री करण्यासाठी जनादेश दिला होता, त्या जनादेशाचा आदर करण्यासाठी आम्ही विजय यांच्या सरकारवरील विश्वासदर्शक प्रस्तावाला पाठिंबा दिल्याचा दावा, बंडखोर गटाचे नेते वेलुमणी करीत आहेत. सरकार स्थापन करण्यासाठी द्रमुकला पाठिंबा दिला असता तर अण्णाद्रमुकचे अस्तित्वच संपले असते, अशी भीती वेलुमणी यांनी व्यक्त केली, जी निराधार म्हणता येणार नाही. १९७२ मध्ये द्रमुकमधून बाहेर पडत एम.जी. रामचंद्रन यांनी अण्णाद्रमुकची स्थापना केली होती. रामचंद्रन यांच्या निधनानंतर जानकी रामचंद्रन मुख्यमंत्री झाल्यानंतर पक्षात फूट पडली, पण ती अतिशय छोटी होती. जानकी रामचंद्रन यांच्यानंतर अण्णाद्रमुकचे नेतृत्व जयललिता यांच्याकडे आले. जयललिता यांनी अतिशय खंबीरपणे अण्णाद्रमुकचे नेतृत्व केले.

२०१६ मध्ये जयललिता यांच्या निधनानंतर अण्णाद्रमुकचे नेतृत्व पलानीस्वामी यांच्याकडे आले. पण नंतर त्यांच्यात आणि पनीरसेल्वम यांच्यातही मतभेद झाले; परिणामी अण्णाद्रमुकमध्ये दोन गट निर्माण झाले. विधानसभा निवडणुकीच्या आधी पनीरसेल्वम यांनी द्रमुकमध्ये प्रवेश केला. ही पण अण्णाद्रमुकमधील फूटच म्हटली पाहिजे. कारण पनीरसेल्वम यांनीही अण्णाद्रमुकचे नेते तीन वेळा राज्याचे मुख्यमंत्रिपद सांभाळले आहे.

विजय यांच्या सरकारच्या विश्वासदर्शक प्रस्तावावरील मतदानाच्या मुद्द्यावरून पुन्हा एकदा अण्णाद्रमुकमध्ये फूट पडली आहे. वेलुमणी गटाच्या आमदारांची संख्या ३२ होत नाही, तोपर्यंत त्यांना आपला वेगळा गट स्थापन करता येत नाही, असा गट ते स्थापन करत नाही, तोपर्यंत त्यांना विजय यांच्या सरकारला अधिकृतपणे पाठिंबा देता येत नाही आणि सरकारमध्ये सहभागीही होता येत नाही. अण्णाद्रमुकमधील वेलुमणी गट विजय यांच्या सरकारला पाठिंबा देणार नाही, तोपर्यंत त्यांचे सरकार स्थिर आणि मजबूत होणार नाही. असा गुंता तामिळनाडूच्या राजकारणात निर्माण झाला आहे. विजय यांना काहीही करून अण्णाद्रमुकमधील या गटाला सरकारमध्ये सहभागी करून घ्यावे लागेल, तेव्हाच्या त्यांच्या सरकारला स्थिरता मिळणार आहे. अन्यथा छोट्या-मोठ्या मुद्द्यावरून काँग्रेस, भाकप, माकप आणि व्हीसीके हे पक्ष विजय यांच्या पक्षाला वेळोवेळी ब्लॅकमेल केल्याशिवाय राहणार नाही. अण्णाद्रमुकमधील बंडखोर गट सरकारमध्ये सहभागी झाला तर आपले महत्त्व कमी होईल, याची जाणीव काँग्रेस पक्षाला आहे. त्यामुळेच अण्णाद्रमुकमधील बंडखोर गटाला सरकारमध्ये सामील करून घ्यायला काँग्रेस विरोध करीत आहे. विजय लोकप्रिय अभिनेते असले, तरी ते राजकारणात नवखे आहेत. त्यामुळे आपले सरकार आधी स्थिर करणे आणि नंतर ते पाच वर्षे चालवणे हे मोठे आव्हान त्यांच्यासमोर आहे. हे आव्हान ते आता कसे पेलतात, ते पाहायचे.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### राज्यातील तरुणाईला अमली पदार्थांचे व्यसन

देशात एकेकाळी पंजाबसारख्या राज्याला ड्रग्ज माफियांची कीड लागली होती. तीच परिस्थिती आता महाराष्ट्र राज्यातही निर्माण झाली आहे. मागील काही वर्षांपासून राज्यामध्ये विशेषतः मुंबई, नागपूर आणि इतर शहरांमध्ये अमली पदार्थांचे मोठमोठे साठे सापडत आहेत. पोलिसांकडून ते साठे जप्त करण्याची प्रक्रिया पार पडत असली तरी त्यामध्ये सहभागी असलेल्या गुन्हेगारांना किरकोळ शिक्षा देऊन सोडले जात आहे. पुढे त्या अमली पदार्थांचे नेमके काय होते, याची माहिती सामान्य जनतेला कधीच उपलब्ध होत नाही. अमली पदार्थांच्या व्यापारातून अब्जावधी रुपयांची उलाढाल होत असते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ड्रग्जचे व्यसन लावून समाज उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न सुरू आहे. या अनधिकृत व्यवसायात अनेक मोठे उद्योगपती असल्याचा संशय व्यक्त केला जातो. परंतु पोलिस त्यांच्यापर्यंत पोहोचण्यात यशस्वी ठरत नाहीत. राजकीय लोकांचे हितसंबंधही यामध्ये अडकलेले असू शकतात. समुद्रमार्गे असे ड्रग्जचे साठे राज्यात येण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढलेले आहेत. इतकेच नव्हे तर महानगरांमध्ये रेव्ह पार्ट्यांची संख्यादेखील फोफावत आहे. अशा अनधिकृत पार्ट्यांमधून अमली पदार्थांची जोरदार विक्री सुरू असते.

अलिकडेच मुंबईतील गोरेगाव उपनगरात उच्चभ्रू वस्तीत झालेल्या अशाच पार्टीचे प्रकरण पोलिसांनी उघडकीस आणले. अलिकडेच दोन जणांचा अशा पार्टीत अमली पदार्थांच्या अतिसेवनाने बळीसुद्धा गेला आहे. म्हणूनच ड्रग्जच्या धंद्यात मुख्य सूत्रधार शोधून काढणे पोलिसांची महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. गेल्या जानेवारी महिन्यात मुंब्रा परिसरात सत्तावीस कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आले होते. त्यानंतर सातारा जिल्ह्यातील पाचपुतेवाडीतून सहा हजार कोटींचे एमडी ड्रग्ज पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्याचबरोबर साकीनाका आणि इतर ठिकाणाहूनही असेच अमली पदार्थांचे साठे जप्त करण्यात आले होते. सरकारने वेळीच कठोर पावले उचलत ड्रग्ज माफियांचे कंबरडे मोडून त्यांची पाळेमुळे शोधून काढली पाहिजेत.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### शिक्षणाच्या वाटेवरील पाऊल

दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी शासनाने चार हजार वसतिस्थाने घोषित करून वाहतूक सुविधा किंवा भत्ता देण्याची केलेली घोषणा स्वागतार्ह आहे. अनेक विद्यार्थ्यांना आजही डोंगरवाटा, ओढे-नाले पार करून शाळेत जावे लागते. त्यामुळे उपस्थिती कमी होऊन काहींना शिक्षणही सोडावे लागते. अशा परिस्थितीत हा निर्णय विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणारा ठरेल. मात्र, केवळ भत्ता न देता प्रत्यक्ष विविध मार्गाने वाहतूक सुविधा उपलब्ध करणे गरजेचे आहे. योजनेची प्रभावी अंमलबजावणी झाली तर ग्रामीण शिक्षणव्यवस्थेत सकारात्मक बदल घडेल आणि कोणतेही मूल केवळ अंतरामुळे, शाळा मार्गामुळे शिक्षणापासून वंचित राहणार नाही. शाळाबाह्य विद्यार्थिसंख्या निश्चितच कमी होईल.

**विश्वनाथ पंडित**/ठाणे

### तात्यांच्या हाती धुपाटणे?

सोशल मीडियावरील मराठी मिम्स आणि विनोदी व्हिडीओत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना ‘तात्या’ असं संबोधलं जातं. त्यांच्या आक्रमक आणि बिनधास्त स्वभावाला अस्सल गावरणी रूपात दाखवून विनोदनिर्मिती करण्याचा सफल प्रयत्न करण्यात येतो. ट्रम्प यांची भाषणे आणि मुलाखतींना डब करून मोठ्या प्रमाणावर व्हायरल करण्यात येत आहे. ट्रम्प यांची बोलण्याची लकब, हातवारे आणि चेहऱ्यावरील रागीट किंवा मिश्कील भाव गावाकडच्या ‘तात्यां’सारखी वाटतात. नुकताच डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनचा दौरा केला. त्यांची चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासोबत शिखर परिषद बीजिंग येथील ‘ग्रेट हॉल ऑफ द पीपल’ येथे पार पडली. ट्रम्प यांच्यासोबत टेस्लाचे एलन मस्क, ॲपलचे टिम कूक आणि एनव्हिडियाचे जेन्सन हुआंग इत्यादी अमेरिकेचे दिग्गज उद्योगपती देखील चीन दौऱ्यावर गेले होते. ट्रम्प यांनी दिलेल्या माहितीनुसार, चीन अमेरिकेकडून दोनशे बोईंग विमाने खरेदी करणार असून भविष्यात आणखी साडेसातशे विमाने घेण्याचा चीनचा विचार आहे. चीन अमेरिकेकडून अब्जावधी डॉलर्सचं सोयाबीन आणि इतर शेतीमाल आयात करणार आहे. चीन इराणला कुठलीही लष्करी मदत करणार नाही. होर्मुजची सामुद्रधुनी सर्व जहाजांना मोकळी करण्यासाठी चीन सहायता करेल. या सर्व बाबींना चीनने कुठलाही दुजोरा दिलेला नाही किंवा लेखी दस्तावेज उपलब्ध नाहीत. बैठकीत जिनपिंग यांनी तैवानच्या मुद्द्यावर ट्रम्प यांना कडक शब्दांत इशारा दिला. चिनी हेरगिरीच्या शक्यतेमुळे दिलेल्या भेटवस्तू अमेरिकेला परतताना विमानात चढण्यापूर्वी डस्टबिनमध्ये टाकण्यात आल्या. चाळीस तासांच्या चीन दौऱ्यामुळे तात्यांच्या हाती नेमकं काय लागलं हा खरा यक्षप्रश्न आहे.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# अनधिकृत बांधकामांवर दुसऱ्या दिवशीही बुलडोझर

## गुरुवार पेठ, शनिवार पेठेत केले ११ गाळ्यांचे पाडकाम

## पोलीस बंदोबस्तात केली कारवाई



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

शहरातील अनधिकृत बांधकामांविरोधातील मोहीम सोलापूर महानगरपालिकेने अधिक तीव्र केली असून दुसऱ्या दिवशी गुरुवार पेठ आणि शनिवार पेठ परिसरात कारवाईचा बडगा उगारण्यात आला. बोगस बांधकाम परवान्याशी संबंधित ९६ प्रकरणांतील कारवाई मोहिमेअंतर्गत गुरुवारी एकूण ११ अनधिकृत गाळे जमीनदोस्त करण्यात आले.

महापालिकेच्या नगररचना विभागाकडून १९ ते २३ मेदरम्यान विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत गुरुवार पेठ येथील ताहेर बागवान तसेच शनिवार पेठेतील खुदाबक्ष बागवान यांच्या इमारतींमधील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली.

महापालिकेच्या तपासणीत संबंधित इमारतींमधील पार्किंगसाठी राखीव जागेवर व्यावसायिक गाळे उभारण्यात आल्याचे निदर्शनास आले. नियमानुसार पार्किंग क्षेत्राचा व्यावसायिक वापर करता येत नसल्याने ही कारवाई करण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

सकाळपासूनच महापालिकेचे पथक आवश्यक यंत्रसामग्रीसह घटनास्थळी दाखल झाले. कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. जेलरोड पोलीस स्टेशनच्या पथकासह पोलीस निरीक्षक राऊत यांनी विशेष सहकार्य केले.या कारवाईत कार्यकारी अभियंता नीलकंठ मठपती, उपअभियंता आनंद जोशी, सहाय्यक अभियंता शकील शेख, इर्शाद झरतार, कनिष्ठ अभियंता गणेश काकडे, बसवराज बडगा, सलमान मणियार, दयानंद अवताडे, दिपाली मेटकरी, प्रमोद गोविंदवार तसेच अतिक्रमण विभागाचे दीपक कुंभार व अन्य अधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, शहरातील अवैध बांधकामांवर यापुढेही नियमानुसार कठोर कारवाई सुरूच राहणार, असा इशारा महापालिकेच्या नगररचना विभागाने दिला आहे. त्यामुळे अनधिकृत बांधकामधारकांचे धाबे दणाणले आहेत.



# मनसेत संपर्क अध्यक्ष शिंदे यांच्या उपस्थितीत अनेक महिलांचा पक्षप्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना सोलापूर जिल्ह्याचे नूतन संपर्क अध्यक्ष ड किशोर शिंदे व ड सुधीर पाटसकर हे सोलापूर शहर जिल्ह्यातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या उत्तर सोलापूर, अक्कलकोट, मोहोळ, या म तदारसंघातील आढावा घेतला. सोन्या मारुती चौकातील कार्यालयात असंख्य महिलांचा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत पक्षप्रवेश झाला.

यावेळी बोलताना संपर्क अध्यक्ष एडवोकेट किशोर शिंदे यांनी सोलापूर शहर व जिल्ह्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे ताकद वाढविणारा असून आगामी काळातील सर्व निवडणुका जोमाने लढविणार असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, लोकसभा अध्यक्ष प्रशांत इंगळे, शहराध्यक्ष जैनुद्दीन शेख, मनविसे राज्य उपाध्यक्ष अमर कुलकर्णी, मनविसे जिल्हाध्यक्ष अभिषेक रंपुरे, प्रकाश कोळी, प्रसाद कुमठेकर, सुभाष माने, रोहित कलशेट्टी, मल्लिनाथ पाटील, श्रीधर गुड्डेली, जयश्री हिरेमठ, गोविंद बंदपट्टे, करुणा यादव,सागर जिडगी, ओंकार सोंडेकर, अनिकेत उपासे, समर्थ माळगे, अभिषेक इरकल, इरेश करजगी आदी उपस्थित होते.

# विडी कामगारांना किमान वेतन द्या; अन्यथा तीव्र आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० मे-**

विडी कामगारांना महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या निर्णयानुसार फरकासह किमान वेतन तात्काळ लागू करावे, अशी जोरदार मागणी ज्येष्ठ कामगार नेते कॉ. नरसय्या आडम यांनी केली. महाराष्ट्र राज्य कामगार आयुक्तालयात झालेल्या बैठकीत विडी कामगारांना शासन निर्णयानुसार किमान वेतन, थकबाकीचा फरक, कारखान्यात रोख मजुरी आणि किमान दहा हजार रुपये मासिक पेन्शन देण्याची मागणी करण्यात आली. या मागण्यांना विविध कामगार संघटनांनीही पाठिंबा दर्शविला.

बैठकीत बोलताना कॉ. आडम यांनी सांगितले की, पूर्वी विडी उद्योगावर २८ टक्के जीएसटी होता, तो आता १८ टक्क्यांवर आला आहे. तंबाखूवरील जीएसटीही कमी करण्यात आला असून, दर हजार विड्यांमागे पाच टक्के सेसही आकारला जातो. इतक्या सवलती मिळूनही विडी कामगारांना किमान वेतन न देणे संतापजनक असल्याचे त्यांनी म्हटले. २०१४ पासून या प्रश्नासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असून, अनेक बैठका होऊनही प्रत्यक्ष अंमलबजावणी न झाल्याने हजारो विडी कामगार आर्थिक अन्याय सहन करत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.



दरम्यान, मालक संघटनेच्या प्रतिनिधींनी इतर राज्यांत कमी मजुरी दिली जाते तसेच कच्च्या मालाच्या वाढत्या दरामुळे उद्योग चालविणे कठीण होत असल्याचे सांगितले. उत्पादन खर्च वाढल्याने शासनाने वास्तव परिस्थिती लक्षात घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली. यावर राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी महाराष्ट्रात इतर राज्यांच्या तुलनेत कमी मजुरी दिली जात असल्याचे स्पष्ट करत, केंद्र सरकारकडून भविष्यात किमान वेतनात वाढ झाल्यास ती कामगारांना देणे बंधनकारक राहील, असे सांगितले. तसेच विडी कामगारांना दहा हजार रुपये मासिक पेन्शन मिळावी यासाठी पंतप्रधानांकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

कामगार संघटनांनी किमान वेतन कायदा आणि सामाजिक सुरक्षा संहितेनुसार विडी कामगारांना न्याय मिळणे आवश्यक असल्याचे सांगत, शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला. या बैठकीस कामगार संघटनांच्या वतीने ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम, सीटू चे राज्य महासचिव एम. एच. शेख, युसुफ शेख, नसीमा शेख, विल्यम ससाणे, दीपक निकंबे, वसंत पवार, विष्णु कारमपुरी, गोवर्धन संचू आदी उपस्थित होते. तर मालक संघाच्या वतीने जालन्याचे माजी आमदार कैलास गोरंट्याल, ॲड. विजय मराठे, मालक संघाचे अध्यक्ष सुनील छत्रिय, नितीन साबळे, बाळासाहेब जगदाळे आदींचा समावेश होता.

# पेट्रोल दरवाढीने सोलापूरकरांत संताप

**सोलापूर :** तीन दिवसांपुर्वी पेट्रोलियम कंपन्यांनी पेट्रोल व डिझेलच्या दरात ३ रुपयांनी वाढ केली होती. अशातच पुन्हा मंगळवारी पुन्हा पेट्रोल व डिझेलच्या दरात एका रुपयाने वाढ करण्यात आली. सलग दरवाढीने पेट्रोल पंपांवर आपल्या गाडीमध्ये पेट्रोल भरण्यासाठी आलेल्या वाहनचालकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. इंधन दरवाढ झाली की सर्वच वस्तूंच्या दरात वाढ होते. अशातच चार दिवसांत चार रुपयांनी पेट्रोल-डिझल दरात केलेली दरवाढ जाचक असल्याची भावना पंपांवर आलेल्या वाहनधारकांनी व्यक्त केली. काही जणांनी इंधन दरवाढ जगभरातील प्रत्येक देशाने केली असून केंद्र सरकारलाही नाईलाजाने करावी लागत असल्याची भावना व्यक्त केली.

# करजगीत आज श्री रेणुकादेवरू यांचा श्रीगुरू पट्टाधिकार महोत्सव

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि २० मे-**

तालुक्यातील नीलगार करजगी येथील श्रीमद रंभापुरी शाखा मठात श्री रेणुकादेवरू यांचा श्री गुरु पठ्ठाधिकार महोत्सव होत आहे. महोत्सवाचे औचित्य साधून श्री बसवेश्वर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. दयानंद उंबरजेयांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे.

सोहळ्यासाठी श्रीमद रंभापुरी जगद्गुरु डॉ. वीर सोमेश्वर राजदेशीकेंद्र शिवाचार्य भागवतपाद महाराज यांचे शुभाशीर्वाद लाभणार आहेत. त्यांच्याच मंगल उपस्थितीत गुरुवार, दि. २१ मे रोजी सायंकाळी ५:०० वाजता भव्य धर्मसभा पार पडणार आहे. कार्यक्रमाला आमदार सचिन कल्याणशेट्टी, करजगीचे सरपंच विवेकानंद उंबरजे, ॲड. दयानंद उंबरजे, भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य शिवशरण जोजन, अक्कलकोटचे नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, जि.प. व पं.स. सदस्य सरपंच व ग्रामस्थ उपस्थित राहणार आहेत.

सकाळी ७:०० वाजल्यापासून मंगलमय कुंभ-कलश मिरवणूक, धार्मिक विधी. मस्तकाभिषेक सोहळा होईल. दुपारी महाप्रसाद असून सायंकाळी ५:३० वाजता धार्मिक सभा व प्रवचन महामंगल होईल. रक्तदान शिबिरात जास्तीत जास्त जणांनी रक्तदान करावे, असे आवाहन आयोजक ॲड दयानंद उंबरजे व करजगी ग्रामस्थांच्या वतीने केले आहे.

# गावाला जाताना मौल्यवान वस्तू लॉकरमध्ये ठेवा : कांबळे

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.२० मे -**

वेळापूर पोलीस स्टेशन हद्दीतील नागरिकांनी बाहेरगावी जाताना घराची व मौल्यवान वस्तूंची योग्य ती सुरक्षा करावी, असे आवाहन वेळापूर पोलिस स्टेशनचे प्रभारी अधिकारी आशिष कांबळे यांनी केले आहे.



सध्या लग्नसराई, सणांच्या निमित्त अनेक कुटुंबे बाहेरगावी जातात. अशावेळी बंद घरांवर चोरट्यांची नजर असते. त्यामुळे नागरिकांनी दागिने व रोख रक्कम घरात न ठेवता बँकेच्या लॉकरमध्ये सुरक्षित ठेवावी. किती दिवसांसाठी बाहेरगावी जात आहोत याची माहिती विश्वासू शेजारी किंवा नातेवाईकांना द्यावी. घराबाहेरील एखादा दिवा सुरू ठेवल्यास घरात वर्दळ असल्याचा आभास निर्माण होतो, असेही कांबळे यांनी सांगितले आहे. प्रवासादरम्यान लगेच सोशल मीडियावर फोटो किंवा प्रवासाची माहिती पोस्ट करणे टाळावे. त्यामुळे चोरट्यांना घर बंद असल्याची माहिती मिळू शकते. सुरक्षेसाठी पेपर स्प्रे व महत्त्वाचे पोलीस संपर्क क्रमांक जवळ ठेवावेत, असेही त्यांनी नमूद केले.

# आचारसंहितेमुळे जिल्हा नियोजन समितीची बैठक रद्द



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

जिल्हा नियोजन समितीची शुक्रवार, दि. २२ मे २०२६ रोजी सकाळी ११.०० वा. नियोजन भवन, सात रस्ता, विजापूर रोड, सोलापूर येथे आयोजित करण्यात आलेली बैठक रद्द करण्यात आली आहे. ही बैठक पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली होणार होती.

निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीची घोषणा दि. १८ मे २०२६ रोजी केली असून, आदर्श आचारसंहितेमुळे ही बैठक रद्द करण्यात आली आहे. याबाबत सर्व संबंधित कार्यान्वयन यंत्रणांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी केले आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**दूरसंचार मालमत्तेची तरतूद**

सेंट्रल रेल्वे, सोलापूर विभागाचे डीआरएम (एस अँड टी) कार्यालय, भारत सरकारच्या राष्ट्रपतींच्या वतीने सक्षम, नामांकित कंपन्या आणि कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्युर्मेंट संकेतस्थळावर www.ireps.gov.in वर ऑनलाईन ई-निविदा मागवत आहे. या कामाची निविदा नोटीस संख्या SUR-N-T-2026-27-12 असून दिनांक 18/05/2026 आहे. कामाचे नाव आणि ठिकाण मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील एसएसई / टेली / कुर्डुवाडी अंतर्गत वाहतूक सुविधा कामासाठी दूरसंचार मालमत्तेची तरतूद आणि स्थलांतर किंवा पुनर्वसन करणे हे आहे. या कामाची अंदाजीत किंमत 78,93,023.12 रुपये असून फॉर्मची किंमत काहीही नाही. कंत्राटदारांना 1,57,900 रुपये बयाणा रक्कम म्हणून जमा करावी लागेल. हे काम पूर्ण करण्याचा कालावधी 12 महिने असून www.ireps.gov.in वर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ 19/06/2026 रोजी दुपारी 15:30 वाजता आहे. याचा सविस्तर तपशील आयरेप्स (ireps) संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदे संदर्भातील कोणतीही शुद्धीपत्रके किंवा सुधारणा फक्त वरील ई-प्रोक्युर्मेंट संकेतस्थळावरच अपलोड केल्या जातील. केवळ ऑनलाईन निविदाच स्वीकारल्या जातील; मॅन्युअल, टपाल, ई-मेल, फॅक्स किंवा प्रत्यक्ष हाताने दिलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बिडर्सना विनंती आहे की त्यांनी कंपनीच्या नावासह क्लास III डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट प्राप्त करावे आणि त्याची www.ireps.gov.in वर नोंदणी करावी. बयाणा रक्कम (EMD) नेट बँकिंग, पेमेंट गेटवे किंवा बँक गॅरंटीच्या स्वरूपात स्वीकारली जाईल. मूळ बँक गॅरंटी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी (म्हणजेच बिड सबमिट करण्याचा शेवटचा दिवस वगळून) निविदा दस्तऐवजात दर्शविल्याप्रमाणे नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याकडे वैयक्तिकरीत्या सुपूर्द केली पाहिजे. अधिक तपशीलांसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

विभागीय रेल्वे व्यवस्थापक
AK/Sur-31 (एस अँड टी शाखा), मध्य रेल्वे, सोलापूर

रेल्वे लाईन अनधिकृतपणे ओलांडणे हा एक दंडनीय गुन्हा आहे.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender Notice**

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No. 7000040018 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender: 05/2026-27, Particulars:** Work of annual maintenance contract (AMC) for work of repair of ABT PC monitor installation of ABT meter, DCU installation and up gradation of ABT PC CPU along with due wiring and supply of necessary part at various EHV substation under EHV O&M Circle Solapur. **Estimated cost:** Rs. 37,00,000/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost):** Rs. 37,000/- **Tender cost** in Rs. 500/- + GST, **Sale period:** 19.05.2026 to 04.06.2026 **Last Date of Submission:** 04.06.2026 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 05.06.2026 at 12:00 Hrs. (If possible).

**Contact person:** Superintending Engineer - 7447440608 For further details

**Subsequent call intimations (2nd/3rd calls, if any) will not be re-published in newspapers and will only be available on the e-tender portal: please visit.**

**1) https://srmetender.mahatransco.in**
**2) https://mahatransco.in**

**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur**

**जाहीर नोटीस**

जन्म-मृत्यू प्रकरण
अर्ज क्र. ४३/२०२६

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**१. याकुब गफूर शेख,** - **अर्जदार**
रा. बालाजी कॉलनी, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर (असल्यास, तर्फे वकील)
विरुद्ध
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी** - **गैरअर्जदार**
**तथा मुख्याधिकारी न.प. बार्शी**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. बालाजी कॉलनी, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी याठिकाणी दिनांक ०१ जुन १९६९ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३(३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ जुन १९६९ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी याठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ०९ एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का
**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**

**सावधानतेची नोटीस**

बार्शी तालुक्यातील तमाम लोकांना विशेषतः सावरगांव भागातील लोकांना या नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, डि. सोलापूर सब. डि. व तालुका बार्शी पैकी मौजे सावरगांव येथील ग्रामपंचायत हद्दीतील जमीन गट नं १३८ याचे क्षेत्र ०२ हे. २३ आर पो.ख. ०१ आर एकूण ०२ हे. २४ आर यासी चतु:सिमा :- पूर्व - गट नं. १३५, दक्षिण - गट नं. १३१, १३२, पश्चिम - गट नं. १३८ ची उर्वरित जमीन, उत्तर - गट नं. १३९ ही मिळकत आतील तदंगभुत वस्तुसह आमचे अशिलाचे एकत्र हिंदू कुटुंबातील अविभक्त सामायिक मिळकत आहे, सदर मिळकतीचे अद्याप पावेतो सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही.

सदर मिळकतीवर आमचे अशिलांची मालकी कब्जे वहिवाट आहे. तसेच आमचे अशिलाचा हितसंबंध आहे. प्रस्तुत अविभक्त मिळकत संदर्भाने आमचे अशिलाचे वडील पांडुरंग कोळी व आजी मैना कोळी यांनी वादीचे परस्पर धनराज सुरवसे यांचेसी बेकायदेशीर व्यवहार केला असून त्या अनुषंगाने बार्शी येथील दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, बार्शी यांचे न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्र. २०१/२०२६ अन्वये दावा प्रलंबित आहे. अशी कायदेशीर न्यायालयीन प्रलंबित बाब असताना देखील प्र.वादी सदर मिळकत त्रयस्थ व्यक्तीस विकण्याचे प्रयत्नात आहेत.

सबब, सदर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की कोणतीही प्रस्तुत मिळकती संदर्भात खरेदी-विक्री, गहाण, बसीस तत्सम स्वरुपाचे व्यवहार करु नयेत. याउपर केल्यास ते आमचे अशिलाचे अविभक्त हिस्स्यावर बंधनकारक राहणार नाही.

सबब कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही प्रस्तुतची सावधानतेची नोटीस दिली. ता. २१/०५/२०२६.

**सही/-**
**ॲड. अनिरुध्द एस. उत्पात**
**बी.ए., एलएल.एम.**
**अति.जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी,**
**बार्शी, जि. सोलापूर.**
**मो.नं. ७२७६५३८७५८**

**जाहीर नोटीस**

जन्म-मृत्यू प्रकरण
अर्ज क्र. ४४/२०२६

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**१. कौसर हबीब शेख,** - **अर्जदार**
रा. बालाजी कॉलनी बार्शी
ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील)
विरुद्ध
**जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी** - **गैरअर्जदार**
**तथा ग्रामपंचायत अधिकारी ग्रा.प. पांगरी**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. बालाजी कॉलनी, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे पांगरी, ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी दिनांक १५ मे १९७५ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक १५ मे १९७५ रोजी मौजे पांगरी ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही, असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ०९ एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का
**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः मौजे बार्शी व आसपासचे परिसरातील तसेच बार्शी तालुक्यातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी बार्शी शहर हद्दीतील जमीन गट नंबर ३५२/२ याचा चालू गट नंबर ३५२/२ याचे एकूण क्षेत्र १.१९.०० आर आकार ०५ रु. ८५ पैसे या पैकी रतन ऊर्फ कविता मल्लिनाथ बिराजदार यांना कोर्ट वाटपाने आलेली जमीन तिचे क्षेत्र ०० हे ४० आर आकार ०१ रु. ३१ पैसे यांसी चतुःसिमा :- पुर्वेस- गट नं. ३५२ पैकी बिनेशती क्षेत्रातील ओपन स्पेस ९ मी. रुंदीचा रस्ता व प्लॉट नं. ६९, दक्षिणेस- गट नं. ६२७/१/२ पैकी बिनशेती क्षेत्र व ओपन स्पेस, पश्चिमेस - गट नं. ३५२ पैकी उर्वरीत क्षेत्र व उत्तरेस - गट नं. ३९१. येणेप्रमाणे आतील तदंगभुत वस्तु व हक्कासह. वर नमुद जमीन हि रतन ऊर्फ कविता मल्लिनाथ बिराजदार यांची असून त्यांनी त्यांचे प्रापंचिक, कायदेशीर गरजेपोटी आमचे अशिलास विक्री करणेचे ठरविलेले आहे व आमचे अशिलांनी सदरची मिळकत खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे. तसा विक्री संबंधीचा व्यवहारही उभयंतामध्ये ठरलेला असून त्याप्रमाणे आमचे अशिलाकडून त्यांनी इसारा दाखल रक्कम ही स्विकारलेली आहे व सदरची मिळकत हि निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची, स्वतंत्र मालकी व कब्जे वहिवाटीची असल्याची खात्री, ग्वाही प्लॉट मालकांनी आमचे अशिलास दिलेली आहे. या उपर हि वर नमुद मिळकत संदर्भाने कोणाचाही कसलाही गहाण, दान, बक्षीस, साठेखत, मृत्युपत्र, खरेदीखत, वारसा, फेडपत्र, पोटगी, टाच, कर्ज-बोजा, जप्ती, करार, नोटरी, खंडपत्र, बटईपत्र, आग्रहक्क, पोटगीबोजा, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क हितसंबंध तसेच वादविवाद असल्यास त्यांनी खालील नमुद पत्त्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशीही नोटीस प्रसिध्द झालेपासुन १० (दहा) दिवसांचे आत कागदपत्रासह लेखी स्वरुपात आमचे कार्यालयात येऊन समक्ष भेटून खात्री करुन द्यावी. वर नमुद मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत, तक्रार न आलेस वर नमुद मिळकतही निजोखमी व बिनबोजाची, त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा हितसंबंध नसल्याचे समजुन अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वईच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल व प्लॉट मालक आपसात ठरल्याप्रमाणे खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर मागाहुन कोणाचीही, कसलीही, कोणतीही प्रकारची तक्रार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही खरेदीपुर्वी जाहीर नोटीस दिली असे. ता. १९/०५/२०२६

**सही/-**
**ॲड. पल्लवी सुधाकर वाघमारे**
**पत्ता - जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी**
**मो. ८८३०८२३६५६**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

**जाहिर प्रसिध्दीकरण**

**सहकारी संस्था संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणूक कार्यक्रम सन २०२६-२७ ते २०३१-३२**

| अ. क्र. | संस्थेचे नाव | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नाव | नामनिर्देशन पत्रे विक्री व स्विकृती | नामनिर्देशन पत्रे छाननी | वैध नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिध्दी | उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिनांक | प्रत्यक्ष मतदान व मतमोजणी दिनांक | मतदान केंद्राचे स्थळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सांगोला विद्यामंदिर सहकारी विद्यार्थी भांडार संस्था मर्या., सांगोला | ए.एस. पुजारी | २१/०५/२०२६ ते २७/०५/२०२६ | २९/०५/२०२६ | ०१/०६/२०२६ | ०१/०६/२०२६ ते १५/०६/२०२६ | २२/०६/२०२६ | निवडणूक लागलेस मतदान केंद्राचे ठिकाण नंतर जाहिर करण्यात येईल. |
| २ | मोरया महिला अर्बन को.ऑप. क्रेडीट सोसायटी लि., सांगोला | ए.डी. गोसावी | | | | | २२/०६/२०२६ | |
| ३ | लक्ष्मीदेवी ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., भोपसेवाडी | ए.एस. पुजारी | | | | | २३/०६/२०२६ | |
| ४ | सिध्दीविनायक अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि., गौडवाडी | ए.डी. गोसावी | | | | | २३/०६/२०२६ | |
| ५ | इंद्रायणी अर्बन को.ऑप. क्रेडीट सोसायटी लि., सांगोला | ए.डी. गोसावी | | | | | २४/०६/२०२६ | |


टिप :- निवडणूक कार्यक्रम संस्थेच्या नोटीस बोर्डावर, तालुका निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था सांगोला यांच्या नोटीस बोर्डावर, प्रसिध्द करण्यात आलेला आहे. तरी सभासदांनी सविस्तर निवडणूक कार्यक्रम व अधिक माहितीसाठी या कार्यालयाशी संपर्क साधावा.

शिक्का
**सही/-**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी**
**तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था सांगोला**



## महत्त्वाचे

### हॉकी प्रशिक्षक बलदेव सिंग ‘पद्मश्री’ने सन्मानित होणार



**नवी दिल्ली** : राष्ट्रीय महामार्गवर वसलेल्या शहाबाद मारकंडा या छोट्याशा गावाला, हॉकी क्षेत्रातील जागतिक दर्जाचे खेळाडू घडवणारे एक प्रमुख केंद्र बनवणाऱ्या बलदेव सिंग यांना, देशाचा प्रतिष्ठित नागरी सन्मान ‘पद्मश्री’ २५ मे रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान केला जाईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी बुधवारी दिली. ७५ वर्षीय बलदेव सिंग हे १९८२ मध्ये हरयाणा क्रीडा विभागाचे प्रशिक्षक म्हणून शहाबाद मारकंडा येथे आले आणि त्यांनी तिथे चार वर्षे सेवा बजावली. १९९३ मध्ये ते पुन्हा या गावात परतले आणि त्यांनी या हॉकीच्या नर्सरीचे रूपांतर ‘हॉकीतील गुणवान खेळाडू घडवणाऱ्या सर्वात प्रभावी केंद्रांपैकी एकामध्ये’ केले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ऐंशीच्या दशकाच्या सुरुवातीला नामधारी हॉकी संघ, भैणी साहिब येथून आपल्या व्यावसायिक कारकिर्दीची सुरुवात करणारे आणि बंगळुरू येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्समधून हॉकी प्रशिक्षणातील पदविका प्राप्त केलेले बलदेव सिंग यांनी ८० हून अधिक आंतरराष्ट्रीय हॉकीपटू घडविले.

### दुखापतींमुळे फखर, अयुब वन-डेसाठी निवडीतून बाहेर

**लाहोर** : ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या आगामी एकदिवसीय मालिकेपूर्वी पाकिस्तानला मोठा धक्का बसला आहे. त्यांची सलामीची जोडी असलेले खेळाडू, सईम अयुब आणि फखर जमान दुखापतींमुळे या तीन सामन्यांच्या मालिकेसाठीच्या निवडीतून बाहेर पडले आहेत. ३० मे रोजी सुरू होणाऱ्या ऑस्ट्रेलियाच्या पाकिस्तान दौऱ्यातील एकदिवसीय मालिकेसाठीचा संघ यजमान पाकिस्तानने अद्याप जाहीर केलेला नाही. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेसाठी यजमान संघाला आता सलामीच्या फलंदाजांची नवीन जोडी शोधावी लागेल. हे दोन्ही खेळाडू सध्या बोर्डाच्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या कडक देखरेखीखाली पुनर्वसन आणि दुखापतीतून सावरण्याची प्रक्रिया करत आहेत. हे दोन्ही खेळाडू सध्या दुखापतीतून सावरत आहेत आणि त्यांना च्या वैद्यकीय समितीच्या देखरेखीखाली त्यांचे पुनर्वसन कार्यक्रम सुरू ठेवण्याचा सल्ला देण्यात आला आहे. परिणामी, त्यांना एकदिवसीय मालिकेसाठीच्या निवडीतून वगळण्यात आले आहे, असे पीसीबीने म्हटले आहे.

### सूर्यवंशीचा धाक गेलसारखाच असेल

**नवी दिल्ली** : वैभव सूर्यवंशी गोलंदाजांच्या मनात तसाच धाक निर्माण करेल, जसा वेस्ट इंडीजचा आक्रमक



फलंदाज ख्रिस गेलने आपल्या कारकिर्दीच्या शिखरावर असताना निर्माण केला होता, असे मत भारताचा माजी वेगवान गोलंदाज इरफान पठाणने व्यक्त केले. सध्याच्या आयपीएल हंगामात ५३ षटकार ठोकणारा सूर्यवंशी, २०१२ च्या हंगामातील गेलच्या ५९ षटकारांच्या विक्रमाच्या अगदी जवळ पोहोचला आहे. ख्रिस गेलने आपल्या सर्वोत्तम काळात ज्याप्रमाणे गोलंदाजांना भयभीत केले होते, अगदी त्याच प्रकारे वैभव सूर्यवंशी देखील गोलंदाजांच्या मनात भीती निर्माण करेल, असे इरफान पठाण म्हणाला.

### सामन्याच्या परिस्थितीनुसार खेळतो : तिलक वर्मा

**कोलकाता** : आपला फॉर्म खूपच खालावला आहे असे आपल्याला कधीच




वाटले नाही. मी माझ्या खेळाच्या मूलभूत गोष्टींवर व दिनचर्येवर काम केले; त्यात कोणताही बदल केला नाही. माझा खेळ पुन्हा बहरेल याची मला खात्री होती. त्याआधीही मी काही फारसा खराब खेळत नव्हतो. ईश्वराच्या कृपेने, सर्व काही सुरळीत पार पडले. मला असे वाटते की संघाचा माझ्यावर पूर्ण विश्वास आहे. मी गोष्टी साध्या ठेवतो, सामन्याच्या परिस्थितीनुसार खेळतो आणि नेमक्या याच गोष्टींमुळे आम्हाला अपेक्षित परिणाम मिळतात, असे मुंबई इंडियन्सचा फलंदाज तिलक वर्मा याने म्हटले. इंडियन प्रीमियर लीग २०२६ मधील आपल्या दमदार कामगिरीचे श्रेय सातत्यपूर्ण दिनचर्येचे पालन करण्याला दिले आहे. संघाचे व्यवस्थापन आणि चाहत्यांनी आपल्यावर जो विश्वास दाखवला आहे, त्यामुळे दबावाच्या परिस्थितीतही शांत राहण्यास आपल्याला मदत झाली; तसेच वाढलेल्या अपेक्षांमुळे आलेली जबाबदारी स्वीकारणेही आपल्याला शक्य झाले, असे या डावखुऱ्या फलंदाजाने सांगितले.

# गुजरातला हवेय् अव्वल दोनमध्ये स्थान; चेन्नईची अस्तित्वासाठी लढत

**अहमदाबाद, २० मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात गुरुवारी येथील नरेंद्र मोद स्टेडियमवर गुजरात टायटन्स आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्या दरम्यान महत्त्वाचा साखळी सामना खेळला जाणार आहे. या सामन्यात शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील गुजरात संघाचे लक्ष गुणतालिकेत अव्वल दोन स्थानां ध्ये स्थान मिळवून क्वालिफायर १ मधील आपली जागा निश्चित करण्यावर केंद्रित आहे. क्वालिफायर १ मध्ये स्थान निश्चित करण्याच्या उद्देशाने गुणतालिकेत अव्वल दोनमध्ये स्थान मिळवण्याचे लक्ष्य बाळगून असलेल्या गुजरात टायटन्सचा आत्मविश्वास सध्या दुणावलेला असेल. गुरुवारी अहमदाबाद येथे होणाऱ्या २०२६ च्या सामन्यात, त्यांचा सामना सध्या संघर्ष करत असलेल्या आणि निराशाजनक कामगिरीनंतर आपली हरवलेली प्रतिष्ठा पुन्हा मिळविण्याचा प्रयत्न करणाऱ्या चेन्नई सुपर किंग्सशी होईल. साखळी फ ेरीतीच्या शेवटी गुणतालिकेत अव्वल दोनमध्ये स्थान मिळवणाऱ्या संघांना अंतिम फेरीत पोहोचण्याच्या दोन संधी उपलब्ध होतात. सध्या १६ गुणांसह दुसऱ्या स्थानावर असलेल्या टायटन्सचा, गुणतालिकेत अव्वल स्थानी असलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (१८ गुण) आणि सनरायझर्स हैदराबाद (१६ गुण) यांच्याशी अव्वल दोनमध्ये स्थान मिळवण्यासाठी त्रिकोणीय संघर्ष सुरू आहे; अशा परिस्थितीत, चेन्नईविरुद्ध मिळवलेला विजय साखळी फेरीच्या शेवटी अव्वल दोनमध्ये स्थान मिळविण्याच्या त्यांच्या संधीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करेल. नरेंद्र मोदी स्टेडियमवरील, फलंदाजीसाठी अनुकूल मानल्या जाणाऱ्या खेळपट्टीवर होणाऱ्या या सामन्यात उतरताना, टायटन्सचा कर्णधार शुभमन गिल हा उत्कृष्ट फॉ ध्ये आहे; आणि त्याचा सलामीचा जोडीदार साई सुदर्शनही तितक्याच बहारदार फॉंध्ये आहे. चेन्नईच्या गोलंदाजी आक्रमणासमोर, या सलामीच्या जोडीसाठी सुरुवातीच्या टप्प्यातील स्विंगचा सामना करणे आणि पॉवरप्लेवर नियंत्रण मिळवणे अत्यंत महत्त्वाचे ठरेल. गुजरातचा स्टार फिरकी गोलंदाज रशीद खान चेन्नईच्या अनुभवी आणि भक्कम फलंदाजी फळीची कसोटी घेईल.



शुभमन गिल



ऋतुराज गायकवाड

**आजचा सामना**

**गुजरात टायटन्स वि. चेन्नई सुपर किंग्स**
**स्थळ** : नरेंद्र मोदी स्टेडियम, लखनौ
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# साऊथ सोलापूर आपटे ब्ल्यू व बिजापूर क्लबची विजयी घोडदौड

**रेल्वेची ७९वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा**

**आदर्श राठोडचे शतक तर डी. सुमितची हॅटट्रिक**





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

रेल्वेच्या ७९ व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत साऊथ सोलापूर आपटे ब्ल्यू आणि बिजापूर क्रिकेट क्लब या संघांनी आपापल्या सामन्यात शानदार विजय नोंदवले.

रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात बुधवारी झालेल्या पहिल्या सामन्यात साऊथ सोलापूर आपटे ब्ल्यू संघाने एम.एस.आर.टी.सी. संघाचा १० गडी राखून एकतर्फी पराभव केला. साऊथ सोलापूर संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय सार्थ ठरवत त्यांच्या गोलंदाजांनी एम.एस.आर.टी.सी.चा डाव अवघ्या १४ षटकांत ५८ धावांवर गुंडाळला. एम.एस.आर.टी.सी.कडून श्रीपती होटकर याने १६ तर अनिल नागसरे याने ११ धावा केल्या. साऊथ सोलापूरच्या अतुल पवारने २१ धावांत ४ बळी घेत मुख्य खिंडार पाडले. त्याला स्वप्निल हंचाटे आणि बालकृष्ण काशीद यांनी प्रत्येकी २, तर अतुल चौधरीने १ बळी घेत उत्तम साथ दिली. ५९ धावांचे छोटे आव्हान साऊथ सोलापूर आपटे ब्ल्यू संघाने अवघ्या ५ षटकांत एकही गडी न गमावता ६० धावा करत पूर्ण केले. यात निरंजन कदमने नाबाद ३३ आणि मंदार काळेने नाबाद २० धावांची खेळी केली. ४ बळी घेणाऱ्या अतुल संजय पवार याला श्रावण चिट्यालकर, विक्रांत पवार, प्रवीण देशेट्टी आणि सचिन गायकवाड यांच्या हस्ते सामनावीर पुरस्कार देण्यात आला. या सामन्याचे पंच म्हणून अशोक डोंबाळे व सोहेल शेख यांनी काम पाहिले.

दुसऱ्या सामन्यात बिजापूर क्रिकेट क्लबने नॅशनल क्रिकेट क्लबवर ७१ धावांनी दणदणीत विजय मिळवला. नॅशनल क्रिकेट क्लबने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी निवडली. मात्र, बिजापूर क्लबने निर्धारित २० षटकांत ७ बाद १९२ धावांचा डोंगर उभा केला. बिजापूरच्या आदर्श राठोडने अवघ्या काही चेंडूत १०१ धावांचे झंझावाती शतक ठोकले. त्याला प्रभाकर बी. (२०) आणि मुत्तूर मदार (१४) यांनी साथ दिली. नॅशनल क्लबकडून कैफ शेख आणि इरफान गोलंदाज यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. प्रत्युत्तरात नॅशनल क्रिकेट क्लबचा डाव १७ षटकांत सर्वबाद १२१ धावांवर आटोपला. इस्मईल पीरजादे (२६), कैफ शेख (२१) आणि विजय पवार (२०) यांची झुंज अपुरी पडली. बिजापूरच्या डी. सुमितने अप्रतिम गोलंदाजी करत २५ धावांत ४ बळी टिपले, ज्यात त्याने सलग तीन चेंडूंवर तीन बळी घेत शानदार हॅटट्रिकची नोंद केली. शांतेशने २, तर अक्षय, मुथू, विवेकानंद आणि गिरीश यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. शतकवीर आदर्श राठोड याला कुरेशी, सुदेश मालप, विक्रांत पवार, सुनील गादे, राजन म्हेत्रे आणि सचिन गायकवाड यांच्या हस्ते सामनावीर पुरस्कार देण्यात आला. या सामन्याचे पंच चिराग शहा आणि महेश सोनवणे होते. दोन्ही सामन्यांचे गुणलेखन सचिन गायकवाड यांनी केले. या स्पर्धेतील सर्व सामनावीर पुरस्कार सुदेश मालप व सुनील मालप यांच्या वतीने पुरस्कृत करण्यात येत आहेत.

**उद्याचे सामने**

**सकाळी** : परेल मेकॅनिक वर्कशॉप विरुद्ध रॉयल फ्रेंड्स क्रिकेट क्लब

**दुपारी** : जय हिंद कुर्डूवाडी विरुद्ध अंबर क्रिकेट क्लब.

# सोलापूर जिल्हा कुमार व मुलींचे खो-खो संघ जाहीर

**कुमारांचे प्रशिक्षण आजपासून सोलापुरात, मुलींचे वाडीकुरोलीत**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० मे-**

येथील नेहरूनगर शासकीय मैदानावर २ जूनपासून सुरू होणाऱ्या राज्य अजिंक्यपद कुमार व मुलींच्या खो-खो स्पर्धेसाठी सोलापूर जिल्ह्याचे संघ निवड समितीचे सदस्य शिवशंकर राठोड, सोनाली शिंदे, अजित बनकर आणि अर्जुन पवार यांनी निवडलेले संघ सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे सचिव उमाकांत गायकवाड यांनी जाहीर केले. वाडीकुरोली (ता. पंढरपूर) येथे झालेल्या जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेतून हे संघ निवडण्यात आले. दोन्ही संघांचे प्रशिक्षण शिबिर गुरुवार, २१ मे पासून सुरू होणार असून, खेळाडूंना सकाळी ९.०० वाजता सर्व मूळ (ओरिजनल) कागदपत्रांसह शिबिरस्थळी उपस्थित रहावे. मुलींच्या संघाचे प्रशिक्षण शिबिर के. के. स्पोर्ट्स, वाडीकुरोली येथे तर कुमार संघाचे प्रशिक्षण शिबिर किरण स्पोर्ट्सच्या वतीने जुळे सोलापूर येथील वसुंधरा महाविद्यालयाच्या मैदानावर होणार आहे. निवडलेल्या मुलींनी प्रशिक्षक अतुल जाधव (मो. ९०९६६२७३१७) व मुलांनी मोहन राजपूत (मोबाईल: ९१३०८४३०८८) यांच्याशी संपर्क साधावा.

**निवडलेला संघ (कंसात क्लबचे नाव): मुली :** ऋतुजा सुरवसे, स्नेहा लामकाने, श्रेया यलमार, कल्याणी लामकाने, कार्तिकी यलमार (के. के. स्पोर्टस्, वाडीकुरोली), अश्विनी मांडवे, अन्वयी मंडले, प्राजक्ता बनसोडे, समृद्धी सुरवसे, ऋतुजा पासले (अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळ, वेळापूर), अक्षता गंगोंडा, पवित्रा नांगलगाव (समृद्धी स्पोर्ट्स, सोलापूर), खुशी पवार (किरण स्पोर्ट्स, सोलापूर), मयुरी स्वामी (रुक्माई स्पोर्ट्स, सोलापूर), आसिया मुलाणी (दहिगाव).

**कुमार :** सुहान अत्तार, अकबर शेख, सिद्धार्थ मानेदेशमुख, ओम लांडगे, समर्थ जाधव (अर्धनारी नटेश्वर, वेळापूर), रोहन मोरे, अर्जुन जवळेकर, श्री उपासे (शेवते), नामदेव राऊत (डोणज), अभय गवळी (उत्कर्ष), सागर कौलगे (भाळवणी), अथर्व चव्हाण (रुक्माई स्पोर्टस्), ओंकार राजपूत (किरण स्पोर्ट्स), माज पठाण (न्यू गोल्डन), संदेश पवार (दीनबंधू मंद्रूप).

# जय हिंद कुर्डूवाडीची न्यू लाईफवर मात

**विजय ट्रॉफी क्रिकेट स्पर्धा : सस्मित गायकवाड सामनावीर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे -**

विजय ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेत जय हिंद कुर्डूवाडी संघाने उत्कृष्ट सांघिक कामगिरीच्या जोरावर न्यू लाईफ संघाचा ८ गडी राखून धुव्वा उडवला.

न्यू लाईफ संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. न्यू लाईफची सुरुवात अडखळती झाली असली, तरी बबलू नायकवाडीने एका बाजूने किल्ला लढवत ८४ धावांची तडाखेबंद खेळी केली. त्याला अकिबने २९ धावा करत चांगली साथ दिली. मात्र, जय हिंद कुर्डूवाडीच्या अचूक गोलंदाजीसमोर इतर फलंदाज फार काळ टिकू शकले नाहीत. न्यू लाईफचा संपूर्ण संघ ३२.२ षटकांत २०० धावांवर बाद झाला.

जय हिंद कुर्डूवाडी कडून गोलंदाजीत नागेश कोरे याने घातक मारा करत ३ बळी घेतले. त्याला अमरदीप शिंदे आणि सचिन गोडसे यांनी प्रत्येकी २ बळी घेत उत्तम साथ दिली. २०१ धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या जय हिंद कुर्डूवाडी संघाने सुरुवातीपासूनच सामन्यावर आपले वर्चस्व राखले. सलामीवीर सस्मित गायकवाड याने ५७ धावांची उत्कृष्ट अर्धशतकी खेळी केली, तर दिनेश कनसे याने ४७ धावांचे योगदान दिले. या दोघांच्या भक्कम फलंदाजीच्या जोरावर जय हिंद कुर्डूवाडीने अवघ्या २३.१ षटकांत २ गडी गमावून २०१ धावांचे लक्ष्य सहज पार केले आणि ८ गडी राखून दिमाखदार विजय मिळवला. न्यू लाईफ संघाकडून गोलंदाजीत फिरोज पठाण आणि बबलू नायकवाडी यांना प्रत्येकी १ बळी मिळवता आला, परंतु ते आपल्या संघाचा पराभव टाळू शकले नाहीत.



जय हिंद कुर्दवाडीच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सस्मित गायकवाड याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. या सामन्यासाठी पंच म्हणून चंदू मंजेली आणि प्रवीण कुलकर्णी यांनी तर गुणलेखक म्हणून शुभम मुत्तुर यांनी काम पहिले.

# साऊथ सोलापूर आपटे ग्रुपला विजेतेपद; तन्मय वाघमोडे मालिकावीर

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर करंडक १२ वर्षांखालील क्रिकेट**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० मे-**




साऊथ सोलापूर आपटे ग्रुपने डॉ.बाबासाहेब आंबेडकर करंडक १२ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले.

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त साऊथ सोलापूर आपटे ग्रुप क्रिकेट क्लबच्या वतीने एक दिवसीय सामन्यांचे आयोजन येथील दयानंद कॉलेज येथील मैदानावर केले होते. यात जिल्ह्यातीलल आठ संघाने सहभाग नोंदविला होता. ही स्पर्धा साखळी पद्धतीने खेळविण्यात आली.

अंतिम सामन्यात साऊथ सोलापूर आपटे ग्रुप क्रिकेट क्लबने श्री स्वामी समर्थ क्रीडा भारती क्रिकेट ॲकॅडमीवर १६७ धावांनी विजय मिळविला.

यांच्यात झाला प्रथम फलंदाजी करताना साऊथ सोलापूर क्रिकेट संघाने ४५ षटकात ७ बाद ३३२ धावा केल्या. त्यात तन्मय वाघमोडे याने शतकी खेळी करत १०३ धावा तर वेदांत भोसले याने ९६ धावा केल्या. श्री स्वामी समर्थ संघाकडून आदित्य चटके व अर्णव जोशी यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. ३३२ धावांचा पाठलाग करताना श्री स्वामी समर्थ क्रिकेट ॲकॅडमीला हे आवाहन पेलवले नाही. त्यांचा डाव १६५ धावांत रोखला करू शकला. त्यांच्या यशराज शिंदे याने सर्वाधिक ३९ धावा केल्या तर आदित्य चटके याने २२ धावा केल्या. साऊथ सोलापूर संघाकडून तन्मय वाघमोडे यांनी ४ गडी बाद केले. पारितोषिक वितरण साऊथ सोलापूर आपटे ग्रुप क्रिकेट क्लबचे सर्वेसर्वा गुरुवर्य अशोक टिळक यांच्या हस्ते करण्यात आला तर यावेळी माजी ज्येष्ठ क्रिकेटपटू अनिल सांब्रानी, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत बाबर, रणजीपटू प्रवीण देशेट्टी, रोहित जोशी उपस्थित होते.

**वैयक्तिक पारितोषिके**

फलंदाज- तन्मय वाघमोडे, गोलंदाज- आदित्य चटके, क्षेत्ररक्षण- नील कोंडा, मालिकावीर- तन्मय वाघमोडे.

# सोलापूरचे नूतन जिल्हा क्रीडाधिकारी प्रकाश मोहारे यांनी स्वीकारला पदभार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० मे-**

सोलापूरचे नूतन जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश मोहारे यांनी मंगळवार, १९ मे रोजी आपल्या पदाचा अधिकृत कार्यभार स्वीकारला. जिल्हा क्रीडा कार्यालयात पार पडलेल्या एका छोटेखानी कार्यक्रमात त्यांनी ही सूत्रे हाती घेतली.

याप्रसंगी माजी जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी श्री. मोहारे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आणि जिल्हा क्रीडा अधिकारी पदाचा कार्यभार अधिकृतपणे त्यांच्याकडे सोपवला. यावेळी श्री. हरनाळे यांनी मोहारे यांना पुढील यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या, तर नूतन क्रीडा अधिकारी मोहारे यांनी जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी आणि खेळाडूंना चांगल्या सुविधा मिळवून देण्यासाठी कटिबद्ध राहण्याचा मानस व्यक्त केला. याप्रसंगी मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्तात्रय वरकड, माजी तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव, तालुका क्रीडा अधिकारी सचिन रणदिवे, तालुका क्रीडा अधिकारी राहुल गायकवाड, वरिष्ठ लिपिक वालवडकर उपस्थित होते.

**शारीरिक शिक्षण शिक्षक, कराटे व किकबॉक्सिंगच्या वतीने स्वागत**

श्री. मोहारे यांचे शहर, जिल्हा क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाच्या वतीने दशरथ गुरव यांनी स्वागत केले. तसेच सोलापूर जिल्हा कराटे व किकबॉक्सिंग असोसिएशनच्या वतीने भीमराव बाळगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी इक्बाल शेख, धनंजय धेंडे, मनोज बाळगे उपस्थित होते. श्री. मोहारे यांनी सोलापूर शहर व जिल्ह्यातील विविध खेळाच्या खेळाडूंच्या सरावासाठी चांगले मैदान उपलब्ध करून देणे तसेच क्रीडा संघटना व खेळाडूंच्या हितासाठी काम करणार असल्याचे सांगितले शालेय व संघटनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त खेळाडू राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर सहभागी होऊन सोलापूर जिल्ह्याचे नाव उज्वल करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### मोटार कार खरेदीत विश्वासघात केल्याप्रकरणी एकावर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २० मे-**

१५ लाख रुपये किमतीची इनोवा कार स्वतःच्या नावावर खरेदी करायला लावून बँकेचे हप्ते न भरता विश्वासघात केल्याप्रकरणी एकावर जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजेश प्रल्हाद उबाळे (रा. भीम नगर, शेळगी) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून याबाबत श्रीशैल राजशेखर निंबाळकर (वय ४३, रा. रामराज्य नगर, शेळगी) यांनी फिर्याद दिली आहे. यातील आरोपी राजेशने मे २०२३ पासून आजतागायत यातील फिर्यादीचा विश्वास संपादन करून त्यांच्या नावावर १५ लाख रुपये किमतीची इनोवा कार खरेदी केली. मात्र, त्यानंतर बँकेचे हप्ते भरले नाहीत. यामुळे फिर्यादी निंबाळकर यांनी गाडी परत मागितली असता आरोपीने त्यांना शिवीगाळ व दमदाटी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास फौजदार येडे हे करीत आहेत.

### आशा वर्करला शिवीगाळ व दमदाटी; महिला व तिच्या पतीवर गुन्हा

**सोलापूर, दि. २० मे-**

सून अल्पवयीन असल्याची माहिती कुटुंब कल्याण केंद्राला का कळविले असे म्हणून सर्वे करणाऱ्या एका आशा वर्करला शिवीगाळ, दम दाटी करून सरकारी कामात अडथळा केल्याबद्दल एका सासू-सासऱ्या विरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिंटु पवार, त्याची पत्नी, (रा. मोमीन नगर, मूळ गाव रोड, सोलापूर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपी सासरा व सासूचे नावे असून याबाबत आशा वर्कर रामेश्वरी उमेश स्वामी (रा. २२५८, एच ग्रुप विडी घरकुल, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी या आशा वर्कर आहेत. त्या १७ मे रोजी सायंकाळी घरकुल भागात सर्वे करीत होत्या. त्याप्रमाणे त्यावरील आरोपीच्या घराकडे सुनेचे नाव नोंदणी करताना सुनेचा शाळा सोडल्याचा दाखला चेक केले असता ती अल्पवयीन असल्याचे फिर्यादीच्या लक्षात आले. तेव्हा फिर्यादीने सदरची माहिती कुटुंब कल्याण कार्यालयास दिली. दरम्यान फिर्यादी हि त्याच दिवशी घरी असताना आरोपी पिंटू पवार याने फिर्यादीच्या मोबाईलवर शिवीगाळ केली . तसेच दुसऱ्या दिवशी फिर्यादी या कर्तव्यावर असताना वरील आरोपी तेथे येवून तुम्ही आमच्या सुनेची माहिती पोलीस स्टेशनला का कळविली , आमच्यावर गुन्हा दाखल झाला आहे असे म्हणून फिर्यादीला आरोपीने गलिच्छ भाषेत शिवीगाळ व दमदाटी करून सरकारी कामात अडथळा केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सहाय्यक फौजदार ओव्हळ हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

# पिंपळवाडीत मृतदेह रस्त्यावर ठेऊन आंदोलन

## वारंवार होणाऱ्या अपघातांनी ग्रामस्थांच्या संतापाचा उद्रेक

### भरधाव दुचाकीच्या धडकेत वृद्धा ठार

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २० मे -**

बार्शी तालुक्यातील पिंपळवाडी येथील राष्ट्रीय महामार्गावर सतत होणाऱ्या भीषण अपघातांमुळे ग्रामस्थांचा संताप उसळला. आज सकाळी झालेल्या आणखी एका अपघातानंतर संतप्त नागरिकांनी मृतदेह रस्त्यावर ठेवून रास्ता रोको आंदोलन केले. महिलावर्ग व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.



आज सकाळी अविदाबाई चौधरी (वय ६५, रा. पिंपळवाडी) रस्त्याच्या कडेला चालत असताना भरधाव दुचाकीने जोरदार धडक दिली. अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर ग्रामस्थांनी राष्ट्रीय महामार्ग रोखून धरला आणि जोपर्यंत ठोस उपाययोजना होत नाही, तोपर्यंत मृतदेह हलवणार नाही, असा इशारा प्रशासनाला दिला.

आणखी किती बळी पडल्यावर प्रशासन जागे होणार? असा सवाल उपस्थित करत ग्रामस्थांनी तातडीने गतीरोधक, सूचना फलक, स्पीड कंट्रोल उपाययोजना आणि सुरक्षितता व्यवस्था करण्याची मागणी केली आहे.

ग्रामपंचायतीने यापूर्वीच गतीरोधक बसविण्याची मागणी केली होती. मात्र राष्ट्रीय महामार्ग असल्याने जिल्हा रस्ते सुरक्षा समितीची परवानगी आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. प्रस्ताव सोलापूर जिल्हा रस्ते सुरक्षा समितीकडे पाठवणार असल्याचे सांगण्यात आले आहे. परवानगी मिळाल्यानंतरच पुढील कार्यवाही होणार आहे.

#### आठ महिन्यांत अनेक गंभीर अपघात

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गेल्या आठ महिन्यांत या ठिकाणी अनेक गंभीर अपघात झाले आहेत. आठ महिन्यांपूर्वी एक व्यक्ती दुचाकी व चारचाकी वाहनाच्या धडकेत ५०० मीटरपर्यंत फरफटत गेली होती. पाच महिन्यांपूर्वी सुवर्णा चौधरी (वय ६५) यांचा वाहनाच्या धडकेत जागीच मृत्यू झाला. दहा दिवसांपूर्वी रामदास चौधरी (वय ५२) यांना दुचाकीची धडक बसून ते गंभीर जखमी झाले असून, सध्या रुग्णालयात उपचार घेत आहेत.

# कृषि योजनांना 'बूस्टर डोस'ची मागणी

### सात कोटींच्या निधीचा आग्रह; जि.प. सभेत सदस्य आक्रमक



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० मे**

जिल्ह्यातील कृषी योजनांना गती देण्यासाठी जिल्हा परिषद कृषी विभागाचा निधी वाढवण्याची जोरदार मागणी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत झाली. सध्या कृषी विभागाकडे केवळ ३ कोटी रुपयांचा निधी असून तो वाढवून किमान ७ कोटी रुपये मंजूर करण्याचा आग्रह झाला.

खरीप तयारी सुरू असताना बियाणे, खत, सिंचन आदी योजनांची आवश्यकता असते. मात्र निधीअभावी अनेक योजनांच्या लाभार्थ्यांना वेळेत मदत मिळत नसल्याची खंत सदस्यांनी व्यक्त केली. पुरेसा निधी नसल्याने महत्वाच्या उपक्रमांवर मर्यादा येत असल्याचा मुद्दाही चर्चेत आला.

कृषी व पशुसंवर्धन सभापती रामप्पा चिवडशेट्टी यांनी जिल्हा परिषदेत भाजपची सत्ता आल्याने शेतकऱ्यांसाठी विशेष निधी उपलब्ध करून योजना प्रभावी राबविणार आहे. निधीवाढीसाठी अध्यक्ष व उपाध्यक्षांकडे पाठपुरावा करणार असल्याचेही स्पष्ट केले. कृषी विभागासाठी वाढीव निधीबाबत निर्णय घेतला जाईल, असे संकेत उपाध्यक्ष पवारांनी दिले.

#### पशुसंवर्धन विभागातील भरती प्रक्रिया लवकरच

पशुसंवर्धन विभागातील विविध प्रवर्गाच्या जागा रिक्त आहेत. त्या जागा त्वरित भरणे आवश्यक असल्याचे सभेत नमूद केले आहे. त्याअनुषंगाने लवकरच यावर कार्यवाही केली जाईल. संबंधित शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांची भरती प्रक्रिया जाईल, असे संकेतही सभापती रामप्पा चिवडशेट्टी यांनी दिले.

# बार्शी तालुक्यात मेडिकल दुकाने बंद

### फार्मसी बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

### काळ्या फिती लावून नायब तहसीलदारांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. २० मे -**

अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटनेने ऑनलाईन औषध विक्री व इंटरनेट फार्मसीविरोधात पुकारलेल्या देशव्यापी बंदला बार्शी शहर व तालुक्यातील औषध विक्रेत्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. बुधवार दि. २० मे रोजी बार्शी शहर व तालुक्यातील बहुतांश मेडिकल दुकाने बंद ठेवली होती.

आंदोलनात सहभागी बार्शी शहरातील मेडिकल संघटनेचे पदाधिकारी व सदस्यांनी काळ्या फिती लावून शासकीय धोरणाविरोधात निषेध व्यक्त केला. तसेच मागण्यांचे निवेदन नायब तहसीलदार सुभाष बडे यांना दिले. बंदमध्ये बार्शी शहर व तालुक्यातील सर्व औषध विक्रेते सहभागी झाले होते. संघटनेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवेदन पाठवून ऑनलाईन औषध विक्री तात्काळ बंद करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी बार्शीतील मेडिकल संघटनेने अत्यावश्यक सेवा सुरु ठेवण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार शहरातील काही हॉस्पिटलमधील मेडिकल सेवा सुरु ठेवली होती.



#### अत्यावश्यक सेवेसाठी सुरू ठेवलेली मेडिकल

- डॉ. जगदाळे मामा हॉस्पिटल मेडिकल, सुविधा हॉस्पिटल मेडिकल, महालक्ष्मी मेडिकल, डॉ. अंधारे हॉस्पिटल, श्री समर्थ मेडिकल, डॉ. पडवळ हॉस्पिटल, प्रगती मेडिकल, डॉ. सोमाणी हॉस्पिटल, शिवाई मेडिकल, वैराग

#### आपत्कालीन परिस्थितीत संपर्काचे आवाहन

बार्शी मेडिकल संघटनेचे अध्यक्ष सुधीर राऊत, मोईज काझी, प्रशांत बारसकर, हेमंत गांधी, सुनील ललवाणी, राजेश राऊत, अभिजित गाढवे, संजय पाटील यांनी समाज माध्यमांद्वारे संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक प्रसिद्ध करुन नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत संपर्क साधण्याचे आवाहन केले होते.

# श्रीक्षेत्र मार्डीच्या पंचक्रोशीतील स्वच्छतादूत हरपला; भिमा बोराडे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा,**
**मार्डी, दि. २० मे -**

उत्तर सोलापूर तालुक्यातील श्रीक्षेत्र मार्डी येथील श्री यमाई देवी व श्री गुरु नागनाथ महाराज यांचे निःसीम भक्त भिमा बोराडे (वय ८८) यांचे वृद्धापकाळाने मंगळवार दि.१९ रोजी निधन झाले. त्यांच्यावर अण्णाभाऊ साठे नगर जवळील स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले.

बोराडे यांच्या पश्चात एक मुलगा, दोन सुना, दोन मुली, नातवंडे व परतुंडे असा परिवार आहे. ते ग्रामपंचायतीचे कर्मचारी कुंडलिक बोराडे यांचे वडील होत. भिमा बोराडे यांनी संत गाडगेबाबा यांच्या ग्राम स्वच्छतेचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून पन्नास वर्षापासून स्वयंप्रेरणेने अविरतपणे रामप्रहरी ग्रामस्वच्छतेचे कार्य केले. त्यांना प्रांत,जिल्हा व तालुका स्तरावर संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाच्या माध्यमातून



विविध संस्थांच्या वतीने गौरवले होते. पंचक्रोशीत ते आधुनिक काळातील संत गाडगेबाबा म्हणून ओळखले जात होते.

प्रत्येक पौर्णिमेला श्री यमाई देवीच्या छबिन्याच्या निमित्ताने पंचक्रोशीत भाविकांत जनजागृती व्हावी म्हणून हलगीच्या माध्यमातून गावातील पाटील गल्ली ते श्री यमाई देवी मंदिरापर्यंत,गेल्या अनेक वर्षापासून विनामूल्य सेवा बजावत होते. श्री गुरु नागनाथ महाराज यात्रेतील पालखी समोर दिवाबत्तीचेही काम करीत होते. त्यांच्या धर्मपत्नीचेही आठ महिन्यांपूर्वीच अकस्मात निधन झाले आहे.वर्षाच्या आताच दोघांचेही निधन झाल्याने पंचक्रोशीत सर्व नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.




# सांगोला विद्यामंदीरमध्ये ११वी ऑनलाईन प्रवेशाला गती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २० मे-**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी इ.११ वीची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया गतिमान झाली आहे. सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेजमध्ये यंदाची प्रवेश प्रक्रिया संपूर्णपणे ऑनलाइन असून इन-हाउस आणि मॅनेजमेंट कोट्यासाठीची शून्य फेरी काल दि.२० मे रोजी संपली आहे.

सर्वसाधारण प्रवेशांसाठीची पहिली नियमित फेरी आजपासून म्हणजेच दि.२१ मे पासून सुरू होत आहे. ती दि.३० मे पर्यंत चालेल. या पहिल्या फेरीच्या नियोजनानुसार गुरुवारी दि.२१ आणि शुक्रवारी दि.२२ मे रोजी विद्यार्थ्यांना नवीन नोंदणी करता येईल. तसेच अर्जाचा भाग १ आणि भाग २ मध्ये बदल करून पसंतीक्रम भरता येईल. विद्यार्थ्यांनी पसंतीक्रम भरताना गुणवत्तेची परंपरा असलेल्या सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेजचे नाव एक नंबरला नोंदवावे, असे आवाहन महाविद्यालयाने केले आहे. दि.२३ ते २५ मे दरम्यान अर्जांची पडताळणी, २६ मे रोजी सकाळी पहिली गुणवत्ता यादी व कट-ऑफ जाहीर केला जाईल. या यादीतील पात्र विद्यार्थ्यांनी दि.२६ मेच्या सायंकाळपासून दि.२८ मे पर्यंत ऑनलाइन प्रोसीड फॉर ॲडमिशन वर क्लिक करून महाविद्यालयात कागदपत्रांची पडताळणी करून आपला प्रवेश निश्चित करायचा आहे. दि.२९ मे रोजी रिक्त जागांची माहिती दिली जाईल आणि दि.३० मे रोजी दुसऱ्या फेरीचे वेळापत्रक जाहीर होईल.

#### माहिती काळजीपूर्वक तपासून अर्ज करा

११ वी प्रवेशासाठी अर्जाचा भाग १ आणि भाग २ दोन्ही भरणे अनिवार्य असून विद्यार्थ्यांनी स्वतःचे गुण आणि महाविद्यालयांचे गेल्या वर्षीचे कट–ऑफ लक्षात घेऊनच माहिती काळजीपूर्वक तपासून अर्ज सबमिट करावा.

**–प्राचार्य. बिभिषण माने**

# ७५० लिटर हातभट्टी दारूसह टेम्पो जप्त

### बार्शी तालुका पोलिसांचा दणका

### पाणेचार लाख रुपयांचा मुद्देमाल



**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. २० मे -**

बार्शी तालुका ग्रामीण पोलिसांनी अवैधरित्या हातभट्टी दारुची वाहतूक करणाऱ्यांविरोधात मोठी कारवाई केली आहे. तब्बल ७५० लिटर हातभट्टी दारूसह टेम्पो जप्त केला आहे. एकूण ३ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करुन एका आरोपीस अटक केली आहे.

बार्शी तालुका पोलीस ठाण्यातील पोलिस कॉन्स्टेबल राहुल बोंदर यांना पोलीस उपनिरीक्षक बालाजी वळसने यांच्यामार्फत बावी ते बार्शी रोडवरुन एका टेम्पोमधून हातभट्टी दारुची वाहतूक केली जात असल्याची खबर मिळाली. माहितीआधारे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने बार्शी-शेलगाव मार्गावरील दर्शना मिल समोरील गतिरोधकाजवळ सापळा रचून वाहनांची तपासणी सुरु केली. दरम्यान, संशयित राखाडी रंगाचा अशोक लिलँड कंपनीचा टेम्पो क्र. एमएच १३ डीक्यू ४८१३ आला असता पोलिसांनी त्यास थांबवून चौकशी केली.

सुरुवातीला चालकाने वाहनात शेतमाल असल्याचे सांगितले. मात्र वाहनाची पाहणी केली असता टेम्पोच्या हौद्यात काळ्या रंगाच्या रबरी ट्युबामध्ये हातभट्टी दारुचा वास आला. त्यानंतर पंचासमक्ष तपासणी केली असता टेम्पोत प्रत्येकी ५० लिटर क्षमतेच्या एकूण १५ रबरी ट्युबा मिळून आल्या. यामध्ये एकूण ७५० लिटर हातभट्टी दारु आढळून आली. पोलिसांनी ७५ हजार रुपयांची हातभट्टी दारु तसेच ३ लाख रुपयांचा टेम्पो असा ३ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

अविनाश प्रकाश पवार (वय २७, रा. तांबेवाडी यमाई तांडा, ता. बार्शी, जि. सोलापूर) असे चालकाचे नाव आहे. पोलिसांनी मुद्देमाल व नमुना तपासणीसाठी दारुचे सॅम्पलही ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी आरोपी अविनाश पवारविरुद्ध बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. तपास बार्शी तालुका पोलीस करीत आहेत.

ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोसई बालाजी वळसने, पोहेकॉ राजेंद्र मंगरुळे, पोहेकॉ केकाण, पोकॉ राहुल बोंदर, चालक पोकॉ खराडे तसेच मदतीला आलेले पोहेकॉ डी खांडेकर आणि पोकॉ.बागल यांच्या पथकाने केली आहे.

# स्वाती चिटणीस, दिलीप प्रभावळकर यांना अ.भा. मराठी नाट्य परिषदेचे 'जीवनगौरव' पुरस्कार

### सोलापूरच्या सुनंदा शेंडगे विशेष पुरस्काराने गौरविणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मध्यवर्ती (मुंबई) च्या वतीने दिले जाणारे यंदाचे प्रतिष्ठित पुरस्कार जाहीर झाले असून, यामध्ये सोलापूरच्या सांस्कृतिक क्षेत्राचा मान वाढवणारी घोषणा झाली आहे. मराठी रंगभूमीवरील अमूल्य योगदानाबद्दल ज्येष्ठ अभिनेत्री स्वाती चिटणीस आणि ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर यांना यंदाचा सर्वोच्च 'जीवनगौरव पुरस्कार' जाहीर झाला आहे. तर, विशेष अभिमानास्पद बाब म्हणजे, सोलापूरच्या सुनंदा शेंडगे यांना त्यांच्या रंगभूमीव्यतिरिक्त केलेल्या उल्लेखनीय व विधायक कार्यासाठी या वर्षीच्या विशेष पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. नाट्य परिषद सोलापूर



शाखेचे अध्यक्ष आणि माजी आमदार प्रकाश यलगुलवार, नियामक मंडळाचे सदस्य सुमित फुलमामडी, प्रमुख कार्यवाह ज्योतिबा काटे, उपाध्यक्ष अशोक किल्लेदार, विठ्ठल बडगंची, कोशाध्यक्ष विद्या काळे यांच्यासह सर्व कार्यकारी सदस्य, जिल्ह्यातील नाट्यप्रेमी, कलावंत आणि विविध संस्थांकडून सुनंदा शेंडगे यांचे अभिनंदन केले आहे.

हा सोहळा प्रख्यात नाटककार गोविंद बल्लाळ देवल यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून या पुरस्कारांचे वितरण १४ जून रोजी, दुपारी ४:०० वाजता यशवंत नाट्य मंदिर, माटुंगा, मुंबई येथे संपन्न होणार आहे.

## निधन वृत्त...

### ॲड. वसंतराव नागणे



**मंगळवेढा, दि. २० मे-**

सोलापूर जिल्ह्यातील ज्येष्ठ दिवाणी आणि सहकार क्षेत्रातील वकील ॲड. वसंतराव रामचंद्र नागणे (वय ९३) यांचे बुधवारी पुण्यात निधन झाले. नावाजलेले विधीज्ञ म्हणून त्यांनी गेल्या ५० वर्षांहून अधिक काळ वकिली केली. त्यांच्या पश्चात मुलगा, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. गुरूवारी (दि.२१) पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार होणार आहेत. सहकार क्षेत्रातील वकील ॲड. विनायक नागणे यांचे ते वडील होत.

### शशिकला शिंदे

**सोलापूर, दि. २० मे-**

रयत शिक्षण संस्थेचे माजी चेअरमन रावसाहेब शिंदे व प्रख्यात वैद्यकीय डॉक्टर राजीव शिंदे यांच्या मातोश्री शशिकला रावसाहेब शिंदे (वय ८८) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या मध्य विभागाचे कार्याध्यक्ष संजीव पाटील प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे यांनी दुःख व्यक्त केले आहे

# गुणवत्तापूर्ण शिक्षण, सक्षम विद्यार्थी आणि हरित भविष्याचा संकल्प

### चेतनसिंह केदार-सावंत; यंदाच्या आषाढी वारीत जि.प.शिक्षण विभागाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २० मे-**

शिक्षणासोबत पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश देत सोलापूर जिल्हा परिषद शिक्षण विभागाने यंदाच्या आषाढी वारीत एक अभिनव उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

पंढरपूर आणि माळशिरस तालुक्यात तब्बल ५ लाख सीडबॉल तयार करून वारकरी भाविकांना वाटप करण्यात येणार असल्याची माहिती शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांनी दिली.



करमाळा पंचायत समितीच्या बचत भवनात पार पडलेल्या जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या मासिक आढावा बैठकीत हा महत्वाकांक्षी निर्णय जाहीर करण्यात आला. बैठकीस जि.प.सदस्य चंद्रकांत जाधव, श्रुतीताई भोरगुंडे, सुषमाताई नारनवर, पंचायत समिती सभापती दिपाली ताड, पूजा ढेरे यांच्यासह शिक्षणाधिकारी कादर शेख, सचिन जगताप आणि विविध तालुक्यांतील गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख उपस्थित होते. यावेळी जिल्हा परिषद शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी गणित व विज्ञान विषयांवर विशेष भर देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, वसतिगृह सुविधा, क्रीडा विकास आणि डिजिटल शिक्षण यावरही सकारात्मक चर्चा झाली. दरम्यान, अतिरिक्त शिक्षक समायोजन प्रक्रियेला वेग देण्यात आला असून ११६ शिक्षकांचे समायोजन पूर्ण झाले आहे, तर ६७२ रिक्त पदांबाबत कार्यवाही सुरू असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

आषाढी वारीत पर्यावरण संवर्धनाचा संदेश पोहोचविण्यासाठी सीडबॉल वाटपाचा उपक्रम राबविण्यात येणार असून, वारीतून हरित क्रांती घडविण्याचा निर्धार शिक्षण विभागाने व्यक्त केला आहे. शिक्षणाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपणारा हा उपक्रम जिल्हाभर चर्चेचा विषय ठरत आहे.

# ‘बालाजी अमाईन्स’कडून भारतातील पहिला डीएमई उत्पादन प्रकल्प कार्यान्वित

## व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी यांची माहिती

## प्रारंभी 3 जिल्ह्यांसाठी होणार याचा फायदा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

बालाजी अमाईन्स कंपनीने चिंचोळी एम आयडीसी, सोलापूर येथील आपल्या युनिट क्रमांक ४ या प्रकल्पामध्ये डायमिथाईल इथर (DME) उत्पादन प्रकल्प यशस्वीरित्या कार्यान्वित केला असून, २० मे २०२६ पासून व्यावसायिक उत्पादनास प्रारंभ करण्यात आला आहे. या यशामुळे व्यावसायिक स्तरावर डीएमईचे उत्पादन करणारी बालाजी अमाईन्स ही भारतातील एकमेव कंपनी ठरली आहे. दरम्यान, प्रायोगिक तत्वावर सुरू केलेल्या या प्रकल्पाचा सोलापूरसह ३ जिल्ह्याला फायदा होणार असल्याची माहिती व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी यांनी पत्रकार परिषदेत बुधवारी (दि. २०) दिली.

या पत्रकार परिषदेस राम रेड्डी यांच्यासह राजेश्वर रेड्डी (पुर्ण वेळ संचालक), गोविंद मेनचकरे (सिनिअर जनरल मॅनेजर), विनय दुर्गम, सुरेशबाबु आदींची उपस्थिती होती.

डी. राम रेड्डी म्हणाले, , डीएमई हे एलपीजीमध्ये मिश्रण करून वापरता येणारे स्वच्छ व कार्यक्षम पर्यायी इंधन मानले जाते. अनेक पाश्चिमात्य व युरोपीय देशांमध्ये एलपीजीमध्ये २० टक्क्यांपर्यंत डीएमईचे मिश्रण करून त्याचा वापर केला जातो. कंपनीने अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित दरवर्षी १,००,००० मेट्रिक टन उत्पादन क्षमतेचा हा प्रकल्प उभारला असून, डीएमईसाठी आवश्यक मूलभूत अभियांत्रिकी तंत्रज्ञान परदेशी कंपनीकडून प्राप्त करण्यात आले आहे.

हा प्रकल्प भारताच्या ऊर्जा आत्मनिर्भरतेच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. भारतासाठी डीएमई उत्पादन पूर्णपणे नवीन असल्याने बीआयएसने (BIS) नुकताच नवीन आयएस कोड प्रसिद्ध केला असून, त्यानुसार एलपीजीमध्ये ८ टक्क्यांपर्यंत डीएमई मिश्रण करू शकतो. सार्वजनिक क्षेत्रातील ऑइल मार्केटिंग कंपन्यांनी आता डीएमई मिश्रण उपक्रम राबविण्यासाठी पुढाकार घ्यावा.

भारतामधील हा पहिलाच डीएमई उत्पादन प्रकल्प असल्यामुळे उत्पादन साठवण, हाताळणी, वापर, वाहतूक तसेच रोड टँकरद्वारे परिवहन यांसंदर्भातील पुरेशा भारतीय मानकांच्या अभावामुळे PESO परवानग्या व इतर वैधानिक मंजुरी मिळविताना कंपनीला अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. आंतरराष्ट्रीय मानकांचा संदर्भ घेऊन त्यांचे परीक्षण व पडताळणी करत आवश्यक मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याची प्रक्रिया वेळखाऊ ठरल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रारंभी बालाजी अमाईन्स एरोसोल उद्योग तसेच इतर व्यावसायिक क्षेत्रांमध्ये हीटिंगसाठी इंधन म्हणून डीएमईचा पुरवठा करणार आहे.



### पर्यायी इंधन विकास ही काळाची गरज

जागतिक ऊर्जा क्षेत्रातील वाढती अनिश्चितता लक्षात घेता पर्यायी इंधनांचा विकास ही काळाची गरज बनली आहे. डीएमईच्या वापरामुळे भारताची एलपीजी आयातीवरील अवलंबित्व मोठ्या प्रमाणात कमी होऊन परकीय चलनाची बचत होण्यास मदत होईल.

### भविष्यात विविध प्रकल्पांची पुनर्रचना

बालाजी अमाईन्स भारतातील ईव्ही बॅटरी केमिकल्स क्षेत्रात अग्रगण्य भूमिका बजावण्यासाठी वेगाने विस्तार करत आहे. ईव्ही बॅटरी क्षेत्रातील वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी कंपनीने लक्ष केंद्रित केले असून भविष्यात विद्यमान काही प्रकल्पांचे पुनर्रचना करून नव्या पिढीतील ईव्ही बॅटरी केमिकल्स उत्पादनासाठी त्यांचा वापर केला जाणार आहे.

### एन-मिथाईल पायरोलिडोन (NMP): इलेक्ट्रॉनिक ग्रेड

एनएमपीचे उत्पादन बालाजी अमाईन्स गेल्या दोन दशकांपासून करत असून आता कंपनीने ईव्ही बॅटरी ग्रेड सॉल्व्हेंट विकसित केले आहेत. देशभर उभारल्या जाणाऱ्या गिगा वॅट क्षमतेच्या ईव्ही बॅटरी प्रकल्पांना पुरवठा करण्यासाठी कंपनी सज्ज झाली आहे. डीएमसी व एनएमपी या दोन्ही रसायनांचे उत्पादन करणारी बालाजी अमाईन्स ही भारतातील एकमेव कंपनी आहे. या सर्व घडामोडींमुळे विशेष रसायन क्षेत्रातील विविध विभागांमध्ये कंपनी अग्रस्थानी असल्याचे व्यवस्थापनाने स्पष्ट केले.



### डायमिथाईल कार्बोनेट (DMC): इलेक्ट्रॉनिक ग्रेड

डीएमसीचा वापर ईव्ही बॅटरी इलेक्ट्रोलाइट्समध्ये मोठ्या प्रमाणावर केला जातो. भारतात या रसायनाचे उत्पादन करणारी बालाजी अमाईन्स ही एकमेव कंपनी असून कंपनीकडे सध्या वार्षिक १५,००० मे. टन उत्पादन क्षमता उपलब्ध आहे. अत्यल्प अतिरिक्त खर्चात ही क्षमता वाढविण्याची क्षमता कंपनीकडे आहे.



# चार सराईत आंतरजिल्हा चोरटे पुण्यातून जेरबंद

## शहर गुन्हे शाखेची कारवाई

## पाच लाखाचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि २० मे -**

शहर गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने ४ सराईत आंतरजिल्हा चोरट्यांना अटक केली. सोलापूर शहरातील दोन घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणले असून चोरट्यांकडून दागिने, रोख रक्कम आणि गुन्ह्यात वापरलेली कार असा एकूण ५ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. घरफोडीचे दोन गुन्हे उघडकीस आणले आहेत.

दीपक बाळू ढेरंगे (वय ३४, रा. कोरेगाव भिमा, जि. पुणे), दत्ता अरुण कदम (वय ३८, रा. नऱ्हे, ता. हवेली, जि. पुणे), आकाश सूर्यकांत आंग्रे (वय २९, रा. बिबवेवाडी, पुणे), साहेबराव लक्ष्मण बेंडूरे (वय ५३, रा. दहिसर वेस्ट, मुंबई) अशी आरोपींची नावे आहेत. आरोपींपैकी दीपक ढेरंगेवर मारामारी, खुनाचा प्रयत्न, दरोडा आदी गंभीर गुन्हे दाखल आहेत. दत्ता कदमवर फसवणूक, खंडणीसारखे गुन्हे दाखल आहेत. या दोघांवर यापूर्वी अहिल्यानगर आणि पुणे शहर पोलिसांनी मकोका अंतर्गत कारवाई केलेली आहे.

सोलापूर शहरातील न्यू बुधवार पेठ भागात दि. ४ मे रात्री ते ५ मेच्या दरम्यान एकाच रात्री फकीरा चौक येथील दोन बंद घरांचे कडी-कोयंडा उचकटून आणि कुलूप तोडून चोरी झाली होती. दोन्ही घटनांचे गांभीर्य ओळखून गुन्हे शाखेचे शहर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने, सपोनि शैलेश खेडकर, सपोनि जे. व्ही. गळवे व त्यांच्या पथकाने घटनास्थळाला भेट देऊन सी.सी.टी.व्ही फुटेज आणि तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपींची माहिती काढली. माहितीच्या आधारे सपोनि शैलेश खेडकर व पथकाने थेट पुणे शहरात जाऊन सापळा रचला आणि ४ सराईत आरोपींना ताब्यात घेतले. यात दीपक ढेरंगे, दत्ता कदम, आकाश आंग्रे, साहेबराव बेंडूरे यांना अटक केली. त्यांना पोलिसी खाक्या दाखवताच आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपींकडून १५ हजार रोख, ३० हजारांचे सोन्याचे दागिने आणि गुन्ह्यात वापरलेली कार असा एकूण ४ लाख ९५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कामगिरी शहर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने, सपोनि शैलेश खेडकर, सपोनि जे. व्ही. गळवे, पोलीस अंमलदार संदीप जावळे, विनोद राजपूत, इम्रान जमादार, उमेश पवार, दीपक जाधव, मंजुनाथ मुत्तनवार, राजेश मोरे, अजय गुंड, बाळासाहेब काळे, सतीश काटे, प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड व रतिकांत राजमाने यांनी पार पाडली.

# काम करताना शॉक लागून वायरमनचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि २० मे -**

विजेच्या खांबावर चढून काम करत असताना अचानक शॉक बसल्याने खाली कोसळून ३१ वर्षीय वायरमन गंभीर जखमी होऊन उपचारापूर्वी मरण पावला. ही घटना जुळे सोलापूरातील ए.जी. पाटील नगरात आज बुधवारी सायंकाळच्या सुमारास घडली.



इस्माईल सलीम पटेल (वय ३२, रा. होटगीरोड मजरेवाडी, सोलापूर) असे मयत वायरमनचे नाव आहे. तो बुधवारी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास ए.जी. पाटील नगरातील प्लॉट नं. ४२ च्या समोरील विजेच्या खांबावर चढून काम करत होता. त्यावेळी शॉक बसल्याने तो खाली कोसळून बेशुद्ध झाला होता. ज्ञानेश्वर जाधव (मित्र) याने येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले .

मयत इस्माईल पटेल हा सोलापूर महानगरपालिकेत कंत्राटह तत्वावर काम करायचा. तो विवाहित असून एकुलता एक होता. त्याच्या पश्चात आई-वडील, पत्नी, तीन बहिणी असा परिवार असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.

# अतिक्रमण प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांच्या अटकपूर्व जामीनाच्या अर्जावर आज फैसला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि २० मे -**

सोलापूर महापालिकेचे अतिक्रमण विभागप्रमुख जगन्नाथ बनसोडे यांच्यावर भंगार चोरी प्रकरणी गुन्हा दाखल प्रकरणी त्यांच्या अटकपुर्व जामिनावर गुरुवारी दि. २१ मे रोजी निर्णय देण्यात येणार आहे.



भंगार चोरी प्रकरणी बनसोडे यांच्यासह इतरांवर सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. प्रकरणात अटक टाळण्यासाठी जगन्नाथ बनसोडे यांनी ॲड. निलेश जोशी यांच्यामार्फत सोलापूर येथील जिल्हा न्यायालयात अटकपूर्व जामीनासाठी अर्ज दाखल करून अंतरिम जामीनाची मागणी केलेली होती. सदर प्रकरणात युक्तीवाद करताना ॲड. निलेश जोशी यांनी बनसोडे यांना खोटेपणाने या गुन्ह्यात गुंतवले असल्याचे तसेच सदर प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने अर्नेशकुमार या प्रकरणात दिलेल्या तत्त्वांचा पोलिसांकडून भंग होणार असल्याचे सांगितले. तसेच सदर प्रकरणात चोरी झाल्याबाबत कोणतीही कागदपत्रे व वस्तूंची शहानिशा न करता घाईगडबडीने दबावापोटी गुन्हा दाखल केल्याचाही मुद्दा मांडला. सदरचा युक्तिवाद ऐकून सोलापूर येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. व्ही. केंद्रे यांनी अंतरिम जामिनाच्या अर्जावर आदेशासाठी उद्याची तारीख दिली आहे.



# भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश मार्गदर्शन केंद्र सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

केगाव येथील भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय येथे प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले. याचे उद्घाटन अकॅडमिक डीन अझरुद्दीन पेरमपल्ली यांचे हस्ते फीत कापून करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष रवींद्र गायकवाड व प्राचार्य डॉ. अनिल देशमाने व सर्व विभागाचे विभाग प्रमुख सर्व शिक्षक शिक्षकेतर वर्ग उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. देशमाने म्हणाले की विद्यार्थ्यांना योग्य करियर दिशा व प्रवेश प्रक्रिया बाबत अचूक मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने सोलापूर येथील भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय येथे दहावी बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रवेश मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले आहे. विशेष म्हणजे राज्यभर सुरू असलेले प्रवेश प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर अनेक विद्यार्थी व पालकांना योग्य शाखा निवड, सीईटी गुणांनुसार कॉलेज निवड, ऑनलाइन फॉर्म भरणे, ऑप्शन फॉर्म, डॉक्युमेंट वेरिफिकेशन, तसेच करियर संधी याबाबत अडचणी येतात .यासाठी महाविद्यालयाने अनुभवी प्राध्यापकांच्या माध्यमातून अभियांत्रिकी व डिप्लोमा प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन देण्यात येणार आहे.

अध्यक्ष रविंद्र गायकवाड म्हणाले, विद्यार्थ्यांनी या सुविधेचा योग्य लाभ घ्यावा अशी आव्हान त्यांनी केले. तसेच अभियांत्रिकी व डिप्लोमा क्षेत्रात करिअरच्या विविध संधी उपलब्ध असून योग्य मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना उज्वल भवितव्य घडवण्यास मदत होणार आहे.

# सोलापूर जिल्ह्यात पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा; नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये

## जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

जिल्ह्यातील तीन प्रमुख कंपन्या - HPCL, BPCL IOCL यांच्याकडून नियमित पेट्रोल व डिझेल पुरवठा सुरू असून सात दिवसांचा साठा उपलब्ध आहे. नागरिकांनी कोणतीही काळजी करू नये तसेच अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी वरील तेल कंपन्यांच्या डेपो व्यवस्थापक व विक्री अधिकाऱ्यांची व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेतली. या बैठकीत सोलापूर जिल्ह्यातील पेट्रोल-डिझेल साठा व वितरण व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीस अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे तसेच संबंधित कंपन्यांचे अधिकारी उपस्थित होते. पेट्रोलपंप चालकांकडून इंधनाचे पूर्ण देयक प्राप्त झाल्यानंतरच वितरण करावे, काळाबाजार रोखण्यासाठी वाहनाशिवाय प्लास्टिक ड्रम किंवा बाटल्यांमध्ये इंधन मागणाऱ्या ग्राहकांची नोंद ठेवावी, ग्राहकांचे नाव, मोबाईल क्रमांक, ओळखपत्र, वापराचे कारण व छायाचित्र नोंदवहीत ठेवण्याचे निर्देश, कृत्रिम तुटवडा निर्माण होऊ नये यासाठी सूक्ष्म नियोजन करून नियमित पुरवठा सुरू ठेवावा.

**इंधन बचतीचे आवाहन**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद देत प्रशासनाने दररोज किमान १ टक्का इंधन बचत करण्याचे आवाहन केले आहे. एक टक्का इंधन बचत झाल्यास दररोज २४ कोटींची बचत होऊ शकते, असेही आवाहन यावेळी करण्यात आले.




### सध्याच्या साठ्याची स्थिती

✻ HPCL कडे पेट्रोल व डिझेलचा ७ दिवसांचा साठा. ✻ BPCL कडेही पेट्रोल व डिझेलचा सुमारे ७ दिवसांचा साठा. ✻ IOCL कडे मोठ्या प्रमाणात पेट्रोल व डिझेलचा साठा उपलब्ध असून पुरवठा सुरळीत आहे. जिल्ह्यात एकूण ४२० पेट्रोलपंप असून सात दिवसांचा साठा उपलब्ध. पाकणी डेपो येथे मुंबईतील रिफायनरीमधून पाइपलाइनद्वारे सतत पुरवठा सुरू. तर सोलापूर जिल्ह्यास दररोज सुमारे ६२४ KL पेट्रोल व १२४० KL डिझेलची आवश्यकता भासते. त्यानुसार पुरेसा साठा उपलब्ध असल्याने नागरिकांनी घाबरून इंधन साठवणूक करू नये.

### कृत्रिम इंधन टंचाई निर्माण होवू नये याची काळजी घ्यावी

जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी तेल कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत कृत्रिम इंधन टंचाई निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यास सांगितले. पेट्रोल पंपांवर वाहनाशिवाय प्लास्टिक ड्रम, कॅन किंवा बाटल्यांमधून इंधन घेण्यासाठी येणाऱ्या ग्राहकांची सविस्तर नोंद ठेवण्याचे निर्देशही देण्यात आले. संबंधित ग्राहकांचे नाव, मोबाईल क्रमांक, ओळखपत्र, इंधनाचा उपयोग व ते कुठे नेले जाणार याची माहिती नोंदवहीत ठेवण्याबरोबरच मोबाईलद्वारे छायाचित्र जतन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.








**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## महत्वाचे...

### मधुमेहतज्ञ डॉ. जगन्नाथ दीक्षित यांचे रविवारी व्याख्यान

**सोलापूर, दि. २० मे-**

येथील लॅब टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन या संघटनेच्या वतीने दीक्षित जीवनशैलीच्या माध्यमातून मधुमेह मुक्ती व वजन नियंत्रण याबाबत विशेष व्याख्यान रविवार, दि.२४ मे रोजी मधुमेहतज्ञ डॉ. जगन्नाथ दीक्षित यांचे आयोजित केले आहे, अशी माहिती अध्यक्ष स्वप्निल पोतदार यांनी पत्रकार परिषदेत दिली. रविवारी सायंकाळी पाच वाजता येथील शिवछत्रपती रंगभवन या हॉलमध्ये या व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. हे व्याख्यान सर्वांसाठी खुले असून सोलापूरवासीयांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेला उपाध्यक्ष शिवकुमार आहेरवाडीकर, सचिव राहुल जाधव आदी उपस्थित होते.

### फवारणीचे औषध पिलेल्या वृद्धेचा अखेर मृत्यू

**सोलापूर, दि. २० मे-**

घरगुती वादातून फवारणीचे औषध पिलेल्या खुनेश्वर गावच्या एका वृद्ध महिलेचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज बुधवारी सकाळी सात वाजता मृत्यू झाला. उषाबाई ज्ञानदेव साबळे (वय ६८ वर्ष , राहणार खुनेश्वर , तालुका मोहोळ ) असे त्या मयत महिलेचे नाव आहे . त्यांनी १८ मे रोजी सकाळी राहत्या घरात घरगुती वादातून पिकावर फवारणी करण्याचे औषध पिले होते . त्याचा त्रास होऊ लागल्याने त्यांना वडाळा येथील आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून येथील शासकीय रुग्णालयात परमेश्वर यांनी दुपारी दाखल केले असता त्यांचा उपचारादरम्यान आज बुधवारी सकाळी मृत्यू झाला.

### मारहाणीचा जाब विचारल्याने तरुणांना लोखंडी रॉडने मारहाण

**सोलापूर, दि. २० मे-**

आत्याच्या मुलाला का मारला म्हणून विचारण्यास गेलेल्या दोघा तरुणांना आठ ते दहा जणांनी मिळून लोखंडी रॉड व लाकडांनी मारहाण करून जखमी केल्याची घटना सांगोला येथील न्यू इंग्लिश शाळेच्या मैदानावर मंगळवारी घडली . सौरभ सुरेश माने (वय २३ वर्ष )आणि ज्ञानेश्वर अण्णा पार्से (वय २४ वर्ष, दोघे रा. सांगोला) अशी मारहाण झालेल्या त्या तरुणांची नावे असून मंगळवारी सकाळी ते आत्याच्या मुलाला का मारला म्हणून विचारण्यास गेले असता त्यांना अज्ञात तरुणांनी मारहाण केली. यात दोघेजण मार लागून जखमी झाल्याने त्यांना सांगोलाच्या आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून येथील शासकीय रुग्णालयात ते स्वतः सायंकाळी दाखल झाले .

### महापालिकेचे एक लाखाचे कॉपर केबल चोरीस

**सोलापूर, दि. २० मे-**

स्ट्रीट पार्क येथील महानगरपालिका च्या कामाचे एक लाख दहा हजार रुपये किमतीचे चार हजार नऊशे फूट कॉपर केबल चोरीला गेल्याची घटना १६ मे रोजी सकाळी साडेआठ वाजता शांती चौक येथे उघडकीस आली. दरम्यान याप्रकरणी जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पूजा गंगाधर देशमाने (महापालिका कनिष्ठ अभियंता, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील वर्णनाचे व किंमतीचे केबल कोणीतरी अज्ञात चोरट्याने महानगरपालिकेचे अर्बन स्ट्रीट पार्क येथील डेकोरेशन पोल्स ची अंडरग्राऊंड केलेली १ लाख १० हजार रुपये किमतीचे ४ हजार ९०० फुट लांबीचे कॉपर केबल वायर चोरुन नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे . पोलीस हवलदार बाबर हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत .

### 'सोलापूरची काव्यप्रभा' पुस्तकाला स्मृती पुरस्कार

**सोलापूर, दि. २० मे-**

विश्वकर्मा तरुण मंडळ, वडशिवणे (ता. करमाळा, जि. सोलापूर) यांच्या वतीने दिला जाणारा गावगाडा साहित्य पुरस्कार २०२५-२६ अंतर्गत मातोश्री चांगुणाबाई सिद्राम इंगळे स्मृती पुरस्कार यंदा सोलापूरच्या साहित्यिका वंदना कुलकर्णी यांच्या सोलापूरची काव्यप्रभा या पुस्तकाला जाहीर करण्यात आला आहे. वंदना कुलकर्णी यांच्या सोलापूरची काव्यप्रभा या पुस्तकाने साहित्य क्षेत्रात वेगळी छाप निर्माण केल्यामुळे परीक्षकांनी या पुस्तकाची निवड केल्याचे आयोजकांनी सांगितले. परस्काराचे स्वरूप सन्मानपत्र, सन्मानचिन्ह आणि रोख रक्कम असे आहे. पुरस्कार वितरण समारंभ रविवार दि. २४ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता पुणे येथील अक्षरवेल सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. या पुरस्कारामुळे वंदना कुलकर्णी यांच्या साहित्य कार्याचा गौरव झाला असून साहित्य क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## विधान परिषद निवडणूक

# सोलापूरच्या एका जागेसाठी १८ जूनला मतदान

### नियोजन भवनात २२ जूनला मतमोजणी, जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांची माहिती



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

भारत निवडणूक आयोगाच्या पत्रानुसार महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक २०२६ चा कार्यक्रम जाहीर केला असून, यासाठी दि. १८ मे २०२६ पासून जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. दरम्यान, यासाठी जिल्ह्यातील ६ प्रांत कार्यालयात मतदान होणार असून, येथील नियोजन भवनमध्ये मतमोजणी कार्यक्रम पार पडणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी आज (दि. २०) पत्रकार परिषदेत दिली.

दरम्यान, या निवडणुकीच्या आचारसंहितेचे पालन अत्यंत काटेकोरपणे पालन करण्यात येणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले. या निवडणुकीत जिल्हाधिकारी कार्तिकेयन हेच जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील हे काम पाहणार आहेत.

#### जिल्ह्यातून ६१६ जण करणार मतदान

स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक झाली नसल्याने ही निवडणूकही लांबली आहे. या विधानपरिषद निवडणुकीसाठी सोलापूर जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे ७९, सोलापूर महापालिकेचे १०२ नगरसेवक आणि ९ स्वीकृत असे १११, जिल्ह्यातील नगरपालिका आणि नगरपंचायतीचे ४२६ असे एकूण ६१६ जण मतदान करणार आहेत. दरम्यान, यातील ४९ स्वीकृत सदस्यांना मतदान करता येणार की नाही? याबाबत राज्य निवडणूक आयोगाकडून मार्गदर्शन मागविले आहे. त्यानंतर ४९ जणांना विधानपरिषदेसाठी मतदान करता येणार आहे.

#### बॅलेट पेपरवर पसंती क्रमांकानुसार मतदान

या निवडणुकीसाठी ईव्हीएम मशीन वापरण्यात येणार नाही. ही निवडणूक बॅलेट पेपरवर पसंती क्रमांकानुसार मतदारांना मतदान करून ते मतपेटीत टाकावे लागणार आहे. या निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू झाली असून, ती २५ जून पर्यंत लागू राहणार आहे. सोलापूर शहर- जिल्ह्यात या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कठोर आचारसंहितेचे पालन करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. या निवडणुकीसाठी मतदार कोण या संदर्भात जिल्ह्यातील सर्व नगरपालिका, नगरपरिषदा, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर जिल्हा परिषद व जिल्ह्यातील ११ पंचायत समिती येथे मतदार यादी लावण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

#### अशी असणार निवडणूक प्रक्रिया

२५ मे ते १ जून या कालावधीत शासकीय सुट्टीचे दिवस वगळून सकाळी ११ ते दुपारी ३ या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालयात उमेदवारी अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. अर्जाची किंमत शंभर रुपये असून खुल्या प्रवर्गासाठी अनामत रक्कम दहा हजार तर मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी अनामत रक्कम पाच हजार रुपये असणार आहे.

- नामनिर्देशन पत्र दाखल अंतिम तारीख : सोमवार, १ जून
- नामनिर्देशन पत्रांची छाननी मंगळवार, २ जून
- उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची अंतिम तारीख : गुरुवार, ४ जून
- जिल्ह्यातील ६ प्रांत कार्यालयात मतदान : गुरुवार, १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४
- मतमोजणी सोमवार, २२ जून
- निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याची अंतिम तारीख गुरुवार २५ जून.



# महापालिकेची सर्वसाधारण सभा दुखवट्याचा प्रस्ताव मांडून तहकूब

### माजी खा. गंगाधरपंत कुचन यांच्यासह मान्यवरांना श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

सोलापूर महापालिकेचे बुधवारची सर्वसाधारण सभा दुखवटा प्रस्ताव मांडून मान्यवर व्यक्तींना श्रद्धांजली वाहून तहकूब करण्यात आली.

सोलापूर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा बुधवार दि. २० मे रोजी सकाळी ११.३० वाजता कै. यशवंतराव बळवंतराव चव्हाण सभागृहात महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. यावेळी डायसवर उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगरसचिव प्रवीण दंतकाळे आदी उपस्थित होते. प्रारंभी महापौर विनायक कोंड्याल यांनी दुखवट्याचा प्रस्ताव मांडला. महापौर कोंड्याल यांनी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करत दुखवट्याचा प्रस्ताव सभागृहासमोर मांडला.

यावेळी माजी खासदार गंगाधरपंत कुचन, ज्येष्ठ कवी माधव पवार, गायक गोविंद पोवळे, तेलुगु अभिनेते भरत कांत, सांगोला विधानसभा मतदारसंघ आमदार यांचे वडील पोपट गणपतराव देशमुख, मानसोपचार तज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी आदी मान्यवर व्यक्तींना श्रद्धांजली वाहण्यात आली. या सर्व मान्यवरांच्या निधनाबद्दल सभागृहाने तीव्र दुःख व्यक्त करत त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी होत श्रद्धांजली अर्पण केली. यानंतर दोन मिनिटे मौन पाळण्यात आले. त्यानंतर महापौर विनायक कोंड्याल यांनी सर्वसाधारण सभा तहकूब करण्यात येत असल्याचे स्पष्ट केले.

#### नगरसेविका शालन शिंदे यांची कारागृहातून ऑनलाइन उपस्थिती

प्रभाग क्रमांक २च्या नगरसेविका शालन शिंदे या जिल्हा मध्यवर्ती कारागृहातून ऑनलाइन पद्धतीने सभेस उपस्थित होत्या. त्यासाठी सोलापूर महापालिका सभागृह तसेच जिल्हा मध्यवर्ती कारागृह येथे वेब कॅमेऱ्यासह आवश्यक तांत्रिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. महापालिकेत प्रथमच एका नगरसेविकेस कारागृहातून ऑनलाइन माध्यमातून महासभेत सहभागी होण्याची व्यवस्था करण्यात आली होती. नगरसेविका शालन शिंदे या मनसे विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष बाळासाहेब सरवदे यांच्या खुन प्रकरणात सध्या जिल्हा मध्यवर्ती कारागृहात आहेत.

# टँकरमधून येते केमिकलयुक्त घाण पाणी




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

महाराष्ट्रातील सर्वाधिक साखर कारखाने असणारा सोलापूर जिल्हा सध्या कारखानदारांच्या मुजोरीमुळे त्रस्त झाला आहे. शेतकऱ्यांना वरदान असलेले साखर कारखान्याने हे आता नागरिकांच्या आरोग्यासाठी शाप ठरत आहेत. साखर कारखान्याचा बारमाही हंगाम चालावा म्हणून साखर कारखाने इथेनॉल व सीएनजी निर्मीती करत आहेत. या कारखान्यातून निघणारे रसायनमिश्रित केमिकलयुक्त घाण पाणी उघड्यावर सोडल्याने परिसरात दुर्गंधी पसरत आहे. या दुर्गंधीमुळे ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये खळबळ उडाली आहे. कारखान्यात तयार होणाऱ्या मळीपासून ते पाळापाचोळ्यापर्यंत सर्वकाही विकले जाते मग कारखानदारी केमिकलयुक्त घाण पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांवर इतके मेहेरबान कसे आहे. त्यात प्रदूषण नियंत्रण मंडळ डोळेझाकुन गप्प बसले असल्याचा आरोप कोरवली येथील शेतकरी ज्ञानेश्वर हिप्परकर यांनी केला आहे.

रात्रीच्या अंधारात हा काळा धंदा जोरात सुरू असतो. काही ठिकाणी तर दिवसाढवळ्या केमिकलयुक्त पाणी टाकले जाते हराळवाडी, कोरवली, जामगाव, कामती बुद्रूक, वाघोली, वाघोलीवाडी, कुरूल तसेच जिल्ह्यातील विविध तालुक्यात टँकरद्वारे हे विषारी पाणी आणले जाते. ज्या शेतात रात्री कुणी रखवालदार नाही, अशा जागा हेरून रस्त्याकडेला कॅनॉल, माळरानावर माळढोक क्षेत्रात त्याचबरोबर थेट शेतामध्ये हे केमिकलचे पाणी सोडून टँकरचालक पळ काढत आहेत. या प्रकारामुळे आसपासच्या शेतजमिनी मोठ्या प्रमाणावर नापीक होत असून पिकांचे नुकसान होत आहे. तसेच हे विषारी पाणी जमिनीत मुरल्याने भूजल पातळी दूषित होत आहे त्याचबरोबर हवेतील ऑक्सिजन कमी होत आहे. परिणामी ग्रामस्थाबरोबरच जनावरांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे. या परिसरातील नागरिकांना उलट्या, जुलाब, मळमळने आणि त्वचा विकाराला सामोरे जावे लागत आहे. या टँकरमाफियांवर आणि मुजोर कारखानदारांवर आणि संबंधित शेतकऱ्यांवर प्रदूषण नियंत्रण मंडळाने तात्काळ कडक कारवाई करावी अशी मागणी जनतेतून होत आहे.

#### प्रदूषण नियंत्रण मंडळाने परवाना तात्काळ रद्द करावा



जकराया साखर कारखान्यांमधून केमिकलयुक्त घाण पाणी उघड्यावर सोडल्याच्या अनेक शेतकऱ्यांच्या तक्रारी आल्या आहेत. कारखान्यातील रसायनमिश्रित केमिकलयुक्त पाण्यामुळे शेतीबरोबरच नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाने त्याचा परवाना तात्काळ रद्द करावा. अशी मागणी येणाऱ्या विधानसभेच्या अधिवेशनात मी मांडणार आहे. शेतकऱ्यांच्या मुळावर उठणाऱ्या या प्रदूषणाचा जाब सरकारला विचारणार आहे.

– **राजू खरे,** आमदार मोहोळ विधानसभा.

## दोन मालवाहतूक वाहनांची समोरासमोर धडक; आठ प्रवासी जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

दोन मालवाहतूक वाहनांची समोरासमोर धडकून झालेल्या अपघातात कर्नाटक राज्यातील आठ प्रवासी जखमी झाल्याची घटना सोलापूर पुणे महामार्गावर चिखली पाठीजवळ आज बुधवारी सकाळी सहा वाजता घडली.

व्यंकम्मा अंबना बागले (वय ५० वर्ष), सिद्धाराम अंबरनाथ तळवार (वय ७६ वर्ष), दीपा सिद्धाराम पवार (वय १५ वर्ष), साक्षी सिद्धाराम तळवार (वय १२ वर्ष) , अंबाकल बागले (वय ६० वर्षे), अन्नपूर्णा सिद्राम तळवार (वय ४२ वर्ष), पूजा सिद्राम तळवार (वय १७ वर्षे) आणि रघु कोळी (वय ३८ वर्ष, सर्व राहणार कर्नाटक राज्य) अशी जखमी प्रवाशांची नावे आहेत. वरील सर्वजण आज बुधवारी सकाळी पुण्याहून सोलापूर कडे अशोक लेलँड चार चाकी वाहनाने येत असताना वाटेत चिखली पाठीजवळ समोरून येणाऱ्या ट्रकने त्यांना धडक दिली.

यात वरील सर्वजण मार लागून जखमी झाल्याने त्यांना एका रुग्णवाहिकेतून येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी प्रदीप पाटील यांनी सकाळी आठ वाजता दाखल केले.

# ऑनलाइन औषध विक्रीविरोधात सोलापुरातील मेडिकल दुकानदारांचा एल्गार

### चार हजार मेडिकल दुकाने बंद; औषध विक्रेत्यांचा मोर्चा, सरकारकडे कठोर नियंत्रणाची मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० मे-**

ऑनलाइन औषध विक्रीच्या वाढत्या प्रस्थाविरोधात आज सोलापूरसह देशभरातील औषध विक्रेत्यांनी एकदिवसीय बंद पाळत जोरदार आंदोलन छेडले. सोलापुरात जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या नेतृत्वाखाली मोठा मोर्चा काढण्यात आला. शहरातील सुमारे चार हजार मेडिकल दुकाने बंद ठेवून औषध विक्रेत्यांनी आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले.

शहरातील चार हुतात्मा स्मारक येथून मोर्चाला सुरुवात झाली. हातात फलक, घोषणाबाजी आणि ऑनलाइन औषध विक्रीविरोधातील संतप्त भावना व्यक्त करत औषध विक्रेते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मोर्चामध्ये शहर व जिल्ह्यातील मेडिकल व्यावसायिक, फार्मासिस्ट तसेच औषध व्यवसायाशी संबंधित विविध संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले. हा मोर्चा पुढे जिल्हाधिकारी कार्यालया परिसरात सभेत रूपांतरित झाला.

ऑनलाइन औषध विक्रीमुळे स्थानिक मेडिकल व्यवसायावर गंभीर परिणाम होत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर नियमांचे उल्लंघन करून औषधांची विक्री केली जात असल्याने रुग्णांच्या आरोग्यालाही धोका निर्माण होत असल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.



विशेषतः डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधांची विक्री, सवलतीच्या नावाखाली होणारी स्पर्धा आणि ग्रामीण भागातील छोट्या मेडिकल दुकानांवर होणारा आर्थिक परिणाम याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे सचिव बसवराज मनोरे यांनी सांगितले की, ऑनलाइन औषध विक्रीमुळे पारंपरिक मेडिकल व्यवसाय अडचणीत आला आहे. शासनाने यावर तातडीने कठोर नियंत्रण आणणे आवश्यक आहे. औषध हा सामान्य वस्तूंचा विषय नसून तो थेट नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित आहे.

तर असोसिएशनचे अध्यक्ष व्यंकटेश पुजारी यांनी, स्थानिक मेडिकल दुकानदार नागरिकांना २४ तास सेवा देतात. मात्र ऑनलाइन कंपन्या केवळ व्यावसायिक फायद्यासाठी नियम डावलत आहेत. त्यामुळे सरकारने औषध विक्रीसाठी एकसमान नियम लागू करून स्थानिक विक्रेत्यांचे संरक्षण करावे, अशी मागणी केली. दरम्यान, या बंदमुळे शहरातील अनेक नागरिकांना औषधे मिळवताना काही प्रमाणात गैरसोय सहन करावी लागली. मात्र आपला लढा हा व्यवसायाबरोबरच नागरिकांच्या सुरक्षित आरोग्य व्यवस्थेसाठी असल्याचे औषध विक्रेत्यांनी स्पष्ट केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी-१४४७

**देखोनी जीवन जरि जाय तान ।**
**तरि कां सांठवन घरोघरीं ॥**

केल्याशिवाय कांही होत नाही. अर्थात, आपणाला हवे ते प्राप्त होण्यासाठी कांहीतरी करावेच लागते. नुसत्या कल्पनाविश्वात रमून चालत नसते. त्या कल्पनांना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी विशिष्ट ती कृती अनिवार्य असते. हे सत्य असले तरीही अनेक लोक असे आहेत की जे केवळ कल्पना करतात. तसेच कल्पनेच्या, इच्छेच्या पूर्तीची स्वप्ने पाहतात. कृतीच्या बाबतीत मात्र शून्य असतात. शिजलेल्या अन्नाच्या वासाने भूक जात नाही. केवळ वासाने भूक जाणार असती तर घरोघ्ररी स्वयंपाक करण्याची गरज पडली नसती. अर्थात स्वयंपाक किंवा शिजवलेले अन्न खाल्याशिवाय भूक जात नाही. वक्षाची सावली पाहून थंडावा प्राप्त होत नाही, तर प्रत्यक्षात त्या सावलीखाली जावे लागते. केवळ साठवलेले किंवा वाहते पाणी पाहून तहान जाणार असती तर घरोघरी पिण्यासाठी पाणी साठवावे लागले नसते. अर्थात, केवळ कल्पना करून किंवा स्वप्न पाहून चालत नाही तर त्याअनुषंगाने आवश्यक ती कृती करायला हवी. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, **देखोनी जीवन जरि जाय तान । तरि कां सांठवन घ्ररोघरीं ॥**



आळस हा मानवाचा प्रमुख वैरी आहे. या वैऱ्याचा नाश झाल्याशिवाय प्रगती अशक्य असते. आपल्याकडे वडीलोपार्जित मोठ्या प्रमाणावर साधन संपत्ती असेल तरीही ती आपल्या आळसामुळे एके दिवशी नाश पावल्याशिवाय राहत नाही. आपल्याकडे कांहीही संपत्ती नसतांनाही आपण सातत्याने कार्यरत राहिलो तर आपल्यावर उपाशी मरण्याची वेळ येत नाही. अर्थात कष्ट करणाऱ्यांनाच यश मिळते, केवळ कल्पना करणाऱ्यांना किंवा उद्दिष्ट, ध्येयांना दूरवरून पहाणाऱ्यांना यश मिळत नाही. असे अनेक लोक आपणाला पहायला मिळतात की त्यांची स्वत:ची अनेक कार्ये इतरांना करावी लागतात. खरे म्हणजे स्वत:ची कार्ये स्वत: करण्यात लाज वाटण्याचे किंवा आळस असण्याचे कारणच असायला नको. आपल्यासाठी इतरांनी अंथरूण टाकून द्यावे, सकाळी अंथरून पांघरुणाच्या घड्या दुसऱ्यांनी कराव्यात, स्नानासाठी पाणी काढून द्यावे, नाष्टा, जेवण दुसऱ्यांनी वाढून द्यावे, आपली ताटं दुसऱ्यांनी उचलावीत ही अपेक्षा योग्य नव्हे. दुसऱ्यांकडून लहान सहान गोष्टी करून घेण्याची अपेक्षा एके दिवशी आपणाला आळसाचे शिखर गाठायला लावते. आपण आपल्या कर्तव्यात अत्यंत व्यस्त असू तर अशी कामे प्रसंगानुरुप इतरांनी केली तर ठिक आहे. पण आपण व्यस्त नसतांनाही आपली व्यक्तिगत कामे इतरांनी करावीत हे आपल्या दृष्टीकोणातून योग्य नसते. जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : गुरूवार,**
**दि. २१ मे २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - अधिक, शु. तृतीया**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- धनिष्ठा (१३.५७)**
**योग - व्यतिपात (१८.५७)**
**करण - तैतिल (१४.४७)**
**राहू काल : गुरूवार**
**दु. १.३० ते ३.००**

**दिनविशेष :**
**जागतिक चहा दिन :** चहाच्या आरोग्यावरील फायद्यांविषयी आणि जागतिक व्यापाराविषयी जनजागृती करण्यासाठी हा दिवस दरवर्षी पाळला जातो.
**जागतिक ध्यान दिन :** मनाच्या शांतीसाठी आणि ध्यानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.
**१९९१:** भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची तामिळनाडूतील श्रीपेरंबदूर येथे आत्मघातकी हल्ल्यात हत्या झाली.

## राज्यस्तरीय बसवरत्न पुरस्कारांचा शुक्रवारी वितरण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

येथील मध्यवर्ती श्री महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव व समाजसेवा महामंडळातर्फे देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय बसव रत्न पुरस्कारांचे वितरण शुक्रवार २२ मे रोजी होणार आहे, अशी माहिती महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष जगदीश पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शुक्रवारी सायंकाळी साडेपाच वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह, सोलापूर येथे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते हा कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमास डॉ. शिवरत्न शेट्टे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे तसेच आमदार प्रवीण स्वामी यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी महात्मा बसवेश्वर मध्यवर्ती महामंडळाच्या अभिवादन कार्यक्रमात मंगळवेढा येथील नियोजित महात्मा बसवेश्वर स्मारकासाठी कृष्ण तलाव शेजारील पंधरा एकर जमीन व ४०० कोटी निधी व बसवेश्वर सर्कल येथील महात्मा बसवेश्वर पुतळा सुशोभीकरणासाठी एक कोटी निधी मंजूर केल्याबद्दल वीरशैव लिंगायत समाज व मध्यवर्ती महामंडळाच्यावतीने त्यांचा यावेळी जाहीर सत्कार करण्यात येणार आहे.

यंदाच्या कार्यक्रमात अक्षय तृतीयेच्या दिवशी महापालिका दवाखान्यात जन्म झालेल्या नवजात बालकांना मुदत ठेव पावती देऊन अर्थीक मदत देण्यात येईल, अशी माहिती मध्यवर्ती महामंडळाचे उत्सव अध्यक्ष शरणराज केंगनाळकर यांनी दिली. या पत्रकार परिषदेला कार्याध्यक्ष विजय कुलते, रेवणसिध्द आवजे, गणेश चिंचोळी, आनंद मुस्तारे, सचिन शिवशेट्टी, राजाभाऊ आलुरे उपस्थित होते.

### या विविध क्षेत्रातील मान्यवरांचा होणार सन्मान

डॉ. शैलेश पाटील (हृदयरोगतज्ञ), महादेव बुक्कानुरे (समाज सेवक), पंडीत जळकोटे (बांधकाम व्यावसायिक), अनुप्रिता अंदेली (समाज सेवा), सदाशिव पडदुणे (समाज सेवा), सिध्देश्वर पाटील (समाज सेवा),संतोष पाटील (समाजसेवा), डॉ. दिपीका चिंचोळी (वैद्यकीय सेवा), राजेश्री मल्लिनाथ थळंगे (समाजसेवा), प्रा. गायत्री बिराजदार (शैक्षणिक क्षेत्र), रुपा स्वामी (समाज सेवा)

# अंगणवाड्यांसाठी सरकारचा 'पॉवर' निर्णय; दरमहा ५०० रुपये वीज शुल्क मंजूर

### वीज सुविधा असलेल्या केंद्रांना वार्षिक ८ हजारांचा प्रशासकीय निधी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

राज्यातील वीज सुविधा असलेल्या अंगणवाडी केंद्रांसाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला असून, आता प्रत्येक पात्र अंगणवाडी केंद्राला दरमहा ५०० रुपये वीज शुल्कासाठी देण्यात येणार आहेत. केंद्र शासनाच्या मंजुरीनंतर राज्य शासनानेही या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास हिरवा कंदील दिला आहे. त्यामुळे अंगणवाडी केंद्रांच्या दैनंदिन कामकाजाला मोठा आधार मिळणार आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ज्या अंगणवाडी केंद्रांमध्ये वीज सुविधा उपलब्ध आहे आणि त्याची नोंद 'पोषण ट्रॅकर' ॲपवर करण्यात आलेली आहे, अशा केंद्रांना हे अनुदान लागू राहणार आहे. या निर्णयामुळे राज्यातील हजारो अंगणवाडी केंद्रांचा प्रशासकीय खर्च हलका होणार असून, बालकांना अधिक चांगल्या सुविधा देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.




शासन निर्णयानुसार, संबंधित अंगणवाडी केंद्रांना नियमित प्रशासकीय खर्चासाठी वार्षिक २००० रुपये आणि वीज शुल्कासाठी वार्षिक ६००० रुपये असे एकूण ८००० रुपये देण्यात येणार आहेत. या खर्चात केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा अनुक्रमे ६०:४० असा राहणार आहे.विशेष म्हणजे, ज्या अंगणवाडी केंद्रांमध्ये सध्या वीज सुविधा नाही, मात्र पुढील काळात वीज जोडणी घेऊन त्याची नोंद पोषण ट्रॅकरवर केली जाईल, अशा केंद्रांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे.

तसेच ग्रामीण भागातील केंद्रांची खातरजमा जिल्हा कार्यक्रम अधिकारी तर नागरी भागातील केंद्रांची तपासणी बाल विकास प्रकल्प अधिकारी करणार आहेत. दरमहा ५०० रुपयांपेक्षा अधिक वीज बिल आल्यास अतिरिक्त खर्च स्थानिक स्वराज्य संस्था, सी.एस.आर.निधी किंवा इतर स्थानिक स्रोतांतून भागवावा लागणार असल्याचेही शासनाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, राज्यातील ज्या स्वमालकीच्या अंगणवाडी केंद्रांमध्ये अद्याप वीज सुविधा उपलब्ध नाही, त्या केंद्रांना जिल्हा वार्षिक योजना, सी.एस. आर निधी, महिला व बाल विकास निधी किंवा सेस फंडाच्या माध्यमातून वीज जोडणी देण्याचे निर्देशही शासनाने दिले आहेत. या निर्णयामुळे ग्रामीण व शहरी भागातील अंगणवाडी केंद्रांमध्ये प्रकाश, पंखे, डिजिटल साधने आणि बालकांसाठी आवश्यक सुविधा अधिक सक्षमपणे उपलब्ध होण्यास मदत होणार असल्याची भावना महिला व बाल विकास विभागाकडून व्यक्त करण्यात येत आहे.

### अंगणवाड्यांना वीज जोडणी

राज्यातील स्वमालकीच्या ज्या अंगणवाडी केंद्रांना वीज सुविधा उपलब्ध नाही, अशा अंगणवाडी केंद्रांकरिता जिल्हा वार्षिक योजना, सी.एस.आर, स्थानिक स्वराज्य संस्थांकडील म हिला बाल विकास करिताचा निधी, सेस फंड इ. निधीमधून वीज जोडणी करून घेण्यात यावी.

**प्रसाद मिरकले,** जिल्हा महिला व बालकल्याण कार्यक्रम अधिकारी

- पोषण ट्रॅकर ॲपवरील नोंद असलेल्या केंद्रांनाच लाभ
- वार्षिक ६ हजार रुपये वीज शुल्कासाठी मंजूर
- नियमित प्रशासकीय खर्चासह एकूण ८ हजारांचा निधी
- केंद्र व राज्य शासनाचा निधी वाटा ६०:४० प्रमाणात
- ग्रामीण भागात जिल्हा कार्यक्रम अधिकारी करणार पडताळणी
- नागरी भागात बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांकडे जबाबदारी
- नवीन वीज जोडणी झालेल्या केंद्रांनाही योजनेचा लाभ
- ५०० रुपयांपेक्षा जास्त बिल स्थानिक निधीतून भागवावे लागणार
- वीज नसलेल्या अंगणवाड्यांना सी.एस. आर व स्थानिक निधीतून जोडणीचे निर्देश

## गुरसाळे येथील अवैध वाळू उपशावर कारवाई; जेसीबी, टिपर, ट्रॅक्टरसह दुचाकी जप्त

### दोघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २० मे-**

तालुक्यातील गुरसाळे पुलाजवळ बुधवारी पहाटे उपविभागीय पोलीसअधिकारी प्रशांत डगळे यांच्या टीमने कारवाई केली. या कारवाईमध्ये अवैध वाळू उपसा करीत असल्याचे आढळूनआल्याने पोलिसांनी जेसीबी, टिपर, ट्रॅक्टर, दुचाकी तसेच २५ ब्रास वाळू जप्त केली आहे. याप्रकरणी दोघांविरूद्ध गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे अवैध वाळू उपसा करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

पंढरपूर शहर व तालुक्यातून मोठ्या प्रमाणात अवैध वाळूचा उपसा केला जातो. मात्र याकडे महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांचे अर्थपूर्ण संबंध असल्यामुळे वाळू उपश्याला चाप लावला जात नाही. पंढरपूर तालुक्यातील गुरसाळे येथील पुलाजवळून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा केला जातो, अशी माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांना मिळाली. त्यानंतर बुधवारी (दि.२०)पहाटे आपले सहकारी पोलीस हेड कॉन्स्टेबल सुरज हेंबाडे, शिवानंद हुलजंती, निलेश रोंगेयांना बरोबर घेतले व त्या ठिकाणी कारवाई केली. या कारवाई वेळी अवैधवाळू उपसा सुरु असल्याचे दिसून आले. त्यामुळे पोलिसांनी जेसीबी, टिपर, ट्रॅक्टर सह २५ ब्रास वाळू, दुचाकी वाहन असा लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी दोघांविरूद्ध तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे अवैध वाळू उपसा करणाऱ्यांचे धाबे दणाणले असल्याचे दिसून येत आहे.

## डब्ल्यूआयटीच्या 'सोनलगी' टीमचा राष्ट्रीयस्तरावर झेंडा

### ३५ हजारांच्या पारितोषिकासह प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (डब्ल्यूआयटी)च्या विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सोलापूरच्या सांस्कृतिक वारशाला राष्ट्रीय स्तरावर नवी ओळख मिळवून देत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. राष्ट्रीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था (एनआयएसईआर) तसेच होमी भाभा राष्ट्रीय संस्था (एचबीएनआय) यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्रोजेक्ट तीर्थ' अंतर्गत आयोजित प्रतिष्ठित 'इकोज ऑफ द पास्ट चॅलेंज' स्पर्धेत डब्ल्यूआयटीच्या 'सोनलगी' टीमने ३५ हजार रुपयांच्या पारितोषिकासह प्रथम क्रमांक पटकावला आहे.



देशभरातील नामांकित शैक्षणिक संस्था आणि संशोधन गटांच्या सहभागातून पार पडलेल्या या स्पर्धेत 'सोनलगी' टीमने श्री रेवणसिद्धेश्वर मंदिराचा त्रिमितीय (३) डिजिटल वारसा प्रकल्प सादर केला. अचूकता, सखोल अभ्यास आणि प्रभावी सादरीकरणाच्या जोरावर या प्रकल्पाने परीक्षकांची विशेष दाद मिळवली.

आदित्य बांगर, शुभम वर्मा, साईराम कटकम, पद्मराज कासार आणि समृद्ध बगले या मेकॅनिकल अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी मंदिराचे अत्यंत बारकाईने डिजिटल दस्तऐवजीकरण केले. फोटोग्रामेट्री, ३ स्कॅनिंग आणि डिजिटल मॉडेलिंगसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मंदिराच्या स्थापत्यशैलीतील सूक्ष्म तपशील अचूकपणे साकारण्यात आले.

या प्रकल्पाला प्रा. डॉ. नरेंद्र काटीकर यांचे मार्गदर्शन लाभले, तर प्रा. योगेश जंगले आणि प्रा. वैभव कुलकर्णी यांनी सहकार्य केले. तसेच इंटॅक सोलापूर आणि छायाचित्रकार भरत छेडा यांचेही मोलाचे योगदान लाभले. प्रकल्पाची गुणवत्ता, संशोधननिष्ठ मांडणी आणि तांत्रिक अचूकतेचे परीक्षकांनी विशेष कौतुक केले.

या उल्लेखनीय यशाबद्दल वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, प्राचार्य डॉ. सचिन गेंगजे आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## शिष्यवृत्ती परीक्षेत सुयश विद्यालयाचे यश




**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० मे-**

फेब्रुवारी २०२६ मध्ये झालेल्या इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत सुयश विद्यालय, बार्शीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. या परीक्षेसाठी विद्यालयाचे १२२ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ११६ विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

यामध्ये शौर्य शामसुंदर गवळी व उर्वीच सचिन दराडे यांनी ३०० पैकी २८८ गुण मिळवून यश संपादन केले.

तसेच २०० पेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ८६ आहे. इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना श्रीमती विजयालक्ष्मी सुरवसे, माने, शेटे, बोंगाळे यांनी मार्गदर्शन केले.

तसेच इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेतही विद्यालयाने यश संपादन केले असून १४४ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. यापैकी २०० पेक्षा अधिक गुण मिळवणारे ७९ विद्यार्थी आहेत. श्रुती साठे हिने ३०० पैकी २७२ गुण मिळवून यश संपादन केले.

इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना श्रीमती गाडे, बोधले, घोलप, बोंगाळे यांनी मार्गदर्शन केले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक शिवदास नलावडे, मार्गदर्शिका प्रतिभा नलावडे, मार्गदर्शक प्रसाद नलावडे, संस्थेच्या सचिव प्रियंका नलावडे, मुख्याध्यापिका अलका जगताप, उपमुख्याध्यापक येवले तसेच सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.




## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वॉकाथॉन रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने १५ मे ते ५ जून या कालावधीत हवामान बदल या संकल्पनेवर आधारित जागतिक पर्यावरण दिन २०२६ ची एक सर्वसमावेशक मोहीम सुरू केली आहे.

विभागव्यापी असलेल्या या मोहिमेमध्ये सोलापूर विभागातील प्रमुख स्थानके आणि रेल्वे वसाहतींमध्ये विविध जनजागृती कार्यक्रम, रॅली, स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण उपक्रम, चर्चासत्रे आणि लोकसहभागावर आधारित उपक्रमांची मालिका समाविष्ट आहे. सोलापूर, कलाबुरागी (गुलबर्गा), वाडी, शहाबाद, पंढरपूर, कुर्डुवाडी, लातूर इत्यादी विभागातील विविध स्थानकांवर हे उपक्रम राबवले जात असून, विभागातील विविध खात्यांचा यात सक्रिय सहभाग आहे.

या मोहिमेचा शुभारंभ करण्यासाठी, पर्यावरण आणि गृहव्यवस्थापन पथकाने सोलापूर विभागाच्या नागरी संरक्षण पथकाच्या सहयोगाने, विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयापासून सोलापूर रेल्वे स्थानकापर्यंत एका वॉकाथॉनचे आयोजन केले होते.

सोलापूर विभागाचे अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक अंशुमाली कुमार यांनी सर्व सहभागींना पर्यावरण संरक्षण प्रतिज्ञा दिली आणि वॉकाथॉनला हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ केला.

## 'तो' भोंगा महापालिकेत पुन्हा वाजणार : महापौर कोंड्याल

### जून महिन्यापासून महापालिका कर्मचारी गणवेशात येणार
### मान्सून पूर्व कामांचा आढावा घेण्यासाठी लवकरच बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

येत्या जून महिन्यापासून सोलापूर महापालिकेतील सर्व कर्मचारी -अधिकारी हे गणवेशात ( ड्रेस कोड) येणार आहेत. या संदर्भात कार्यवाही सुरू आहे. साधारणता: गडद गुलाबी म्हणजेच डार्क पिंक रंगाचा हा ड्रेस कोड लागू करण्यात येत आहे. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये एक शिस्तबद्धता दिसून येणार आहे, अशी माहिती महापौर विनायक कोंड्याल यांनी दिली.

सोलापूर महापालिकेतील सर्व नगरसेवक नगरसेविकांना ओळखपत्र आणि बॅच बिल्ले दिल्यानंतर आता महापौर विनायक कोंड्याल यांनी महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांना आता ड्रेस कोड लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, सोलापूर महापालिकेत यापूर्वी सन २०१४ दरम्यान कर्मचाऱ्यांना ड्रेस कोड लागू करण्यात आला होता त्याचबरोबर महापालिकेतील कर्मचाऱ्यांना व नागरिकांना महापालिकेत कर्मचारी आगमन, जेवणाची सुट्टी आणि ड्युटी समाप्तची वेळेची सूचना देण्याबाबत भोंगा वाजविण्यात येत होता. तो पुन्हा सुरू करण्यात येणार असल्याचे महापौर कोंड्याल यांनी स्पष्ट केले.



सोलापूर महापालिका प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांच्यात शिस्तबद्धता आणि एकात्मता यावी यासाठी येत्या जून पासून ड्रेस कोड लागू करण्यात येणार आहे. गडद गुलाबी रंगाचा हा गणवेश राहणार आहे. कर्मचाऱ्यांच्या वेतनातून गणवेशाचा खर्च कपात न करता महापालिकेच्या माध्यमातून हा खर्च करण्यात येणार आहे, असे महापौरांनी स्पष्ट केले. मान्सूनपूर्व कामांचा आढावा घेण्यासाठी २५ मे रोजी महापालिकेत संबंधित विभागांची बैठक घेण्यात येणार आहे. यामध्ये आवश्यक माहिती घेऊन उर्वरित कामे पूर्ण करण्याचे आदेश देण्यात येतील. नाले सफाई करण्यात आली परंतु कडेला टाकलेला गाळ जैसे ते आहे तो उचलण्याच्या सूचनाही देण्यात येणार आहेत. सोलापूर शहरातील नागरिकांना पावसाळ्यात कोणत्याही प्रकारचा त्रास अथवा समस्या उद्भवणार नाही. याकडे प्राधान्याने लक्ष देण्यात येणार असल्याचे महापौर विनायक कोंड्याल यांनी यावेळी सांगितले.

### सोलापूर महापालिकेतील सुमारे ४३०० कर्मचारी- अधिकारी

सोलापूर महापालिका प्रशासनात आस्थापनेवरील सुमारे ३ हजार ३०० कर्मचारी व अधिकारी कार्यरत आहेत. त्याचबरोबर कंत्राटी पद्धतीने सुमारे १ हजार कर्मचारी काम करीत आहेत असे सुमारे ४ हजार ३०० कर्मचारी व अधिकारी यांना आता येत्या जून म हिन्यापासून ड्रेस कोड लागू होणार आहे. या ड्रेस कोडमुळे सर्वांना एक शिस्त लागून एकोपा निर्माण होणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# तिऱ्हे येथील प्राथमिक आरोग्य केंद्र डोणगावला स्थलांतरित

## आरोग्य केंद्राचा मार्ग मोकळा; ७ ते ८ गावांना मिळणार नवसंजीवनी




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० मे-**

जागेअभावी रखडलेले तिऱ्हे येथील प्राथमिक आरोग्य केंद्र अखेर डोणगाव येथे स्थलांतरित करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत याप्रस्तावाला नुकतीच मान्यता मिळाल्याने परिसरातील ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला नवे बळ मिळणार आहे. विशेष म्हणजे, डोणगावसह आसपासच्या सात ते आठ गावांतील नागरिकांना याचा थेट फायदा होणार असल्याने हा निर्णय आरोग्य सुविधांच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे.

तिऱ्हे गावात प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी आवश्यक जागा उपलब्ध नसल्यामुळे हे केंद्र डोणगाव ग्रामपंचायत हद्दीत स्थलांतरित करण्याचा प्रस्ताव यापूर्वी १३ फेब्रुवारी २०२० रोजी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक ३३७ अन्वये मंजूर करण्यात आला होता. त्यानंतर जिल्हा नियोजन समितीची २३ जानेवारी २०२१ रोजी मान्यता घेऊन प्रस्ताव उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आला होता.

यानंतर २६ मे २०२३ रोजी हा प्रस्ताव अपर मुख्य सचिवांकडे सादर करण्यात आला; मात्र लोकसंख्या व अंतर निकषांच्या त्रुटी दाखवत शासनाने तो मंजूर करण्यास नकार दिला होता. त्यामुळे हा विषय पुन्हा चर्चेत आला होता.

दरम्यान, डोणगावची वाढती लोकसंख्या आणि परिसरातील गावांची आरोग्य गरज लक्षात घेऊन प्रस्ताव नव्याने तयार करण्यात आला. सन २०११ च्या जनगणनेनुसार डोणगावची लोकसंख्या २ हजार ८२३ इतकी होती. मात्र सध्या ती चार हजारांच्या घरात पोहोचल्याचे सांगण्यात येत आहे. याशिवाय तेलगाव, कवठे, भोजप्पा तांडा, गोविंद तांडा, नंदूर-समशापूर, भाटेवाडी आदी गावांतील नागरिकांनाही उपचारासाठी डोणगाव अधिक सोयीचे ठरणार आहे.

डोणगाव ग्रामपंचायतीने आरोग्य केंद्रासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देत त्याचा उताराही प्रशासनाला सादर केला आहे. त्यामुळे प्रस्तावाला गती मिळाली.

१५ मे २०२६ रोजी झालेल्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत हा प्रस्ताव पुन्हा मंजुरीसाठी ठेवण्यात आला होता. सभेने त्यास हिरवा कंदील दिल्याने आता आरोग्य केंद्र स्थलांतर प्रक्रियेला वेग येणार आहे. जिल्हा परिषद सदस्य डॉ. पृथ्वीराज माने यांनी यानिर्णयासाठी पाठपुरावा केला असून, ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार व सहज उपलब्ध आरोग्य सुविधा देण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे सांगितले जात आहे.

# महत्वाचे...

## पिलीव येथील सर्व औषध विक्रेते संपात सहभागी

**पिलीव, दि. २० मे-**

माळशिरस तालुक्यात पिलीव परीसरातील सर्वच औषध विक्रेते आज आपल्या विविध मागण्यासाठी देशव्यापी संपात सहभागी झाले होते. आज सकाळपासून पिलीव येथील सर्व जवळपास २७ औषध विक्रेत्यांनी केंद्र शासनाकडुन प्रलंबित मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे. यामुळेच आज एकदिवसीय संप पुकारला होता याला पिलीव परीसरात उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. २०१३ या वर्षी डिपीओ अंतर्गत जीवनावश्यक औषधावर होलसेलवर व रिटेलवर नफा निश्चित करण्यात आला होता परंतू कंपन्यांकडून २० ते ४० टक्क्यांपर्यंत मोठ्या सवलती दिल्याने औषध विक्रेते अडचणीत आले आहेत. डॉकटरांनी लिहुन दिलेल्या औषधाऐवजी औषध विक्रेत्यांना ब्रॅड सबटीटयुट औषधे देण्याचा अधिकार देण्यात यावा यासह इतर मागण्यांसाठी पिलीव परीसरातील सर्वच औषध विक्रेत्यांनी आजच्या संपात सहभागी झाले होते. यामुळे आज नागरिकांची मोठी गैरसोय झाली.



## संभाजी आरमारचा उद्या वज्रमुठ मेळावा; पालकमंत्री गोरे यांची हस्ते होणार उद्घाटन

**सोलापूर, दि. २० मे-**

छत्रपती संभाजी महाराज जयंती आणि संभाजी आरमार संघटनेच्या १८ व्या वर्धापन दिनानिमित्त ओरोनोको प्रशाला मैदान येथे शुक्रवार दि. २२ मे रोजी सायंकाळी ५ वा. वज्रमूठ मेळावा आयोजित करण्यात आला आहे. राज्याचे ग्रामविकासमंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री ना. जयकुमार गोरे यांच्या हस्ते या मेळाव्याचे उदघाटन होणार आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. सोलापूर शहर-जिल्ह्याचा लौकिक जगभरामध्ये निर्माण करणाऱ्यांचा यावेळी सन्मान केला जाणार आहे. यामध्ये अन्नछत्र मंडळ अक्कलकोटच्या माध्यमातून सोलापूरला नावलौकिक मिळवून देणारे जन्मेजेय महाराज भोसले यांना सन्मानित केले जाणार आहे. सध्या सोलापूर शहर युनिफॉर्म हब म्हणून संपूर्ण देशभरात नावारूपास आलेलं आहे. ही ओळख मिळवून देणाऱ्या गारमेंट उत्पादक संघटनेचा तसेच सोलापूरची पारंपरिक ओळख असणाऱ्या चादर, टर्किश टॉवेल उत्पादक सोलापूर जिल्हा यंत्रमागधारक संघाचा सन्मान होणार आहे. सोलापुरी शिक-कबाबला जगभर प्रसिद्ध करणाऱ्या खाटीक समाज बांधवांचा देखील गौरव होणार आहे. सांगोला तालुक्यातील अजनाळे या गावातील शेतकऱ्यांनी शेततळ्यांच्या माध्यमातून क्रांती घडवत वार्षिक १५० कोटी रुपयांच्या डाळिंब उत्पादनाचा विक्रम घडविला आहे.. त्यांच्या या विक्रमी कामगिरीचा देखील सन्मान होणार आहे. तसेच झी मराठी स्वराज्यरक्षक संभाजी मालिका फेम शाहीर महाराष्ट्रचा संतोष साळुंके यांचा छत्रपती शिवाजी महाराज - छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर आधारित प्रेरणादायी स्फूर्ती गीतांचा कार्यक्रम देखील होणार आहे. मागील १८ वर्षे सर्वसामान्य जनतेच्या अडी-अडचणी सोडवत त्यांच्या न्याय-हक्कासाठी लढणारी संभाजी आरमार १८ वर्षांची होत आहे. संघटनेला शुभेच्छा-आर्शिर्वाद देण्यासाठी तसेच शिव-शंभूंच्या विचारांचा जागर अनुभवण्यासाठी शिवप्रेमी जनतेसह सोलापूरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे, कार्याध्यक्ष नगरसेवक शिवाजी वाघमोडे यांनी केले आहे.

## अवंती नगरात श्रीमद् भागवत कथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

**सोलापूर, दि. २० मे-**

जुना पुना नाका भागातील अवंती नगर येथील श्री गणेश-विठ्ठल मंदिर सांस्कृतिक मंडळाच्यावतीने अधिक मासानिमित्त २४ ते ३१ मे या कालावधीत श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरीचा पारायण सोहळा आयोजिल्याची माहिती मंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष सुनील रसाळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या सप्ताहात दररोज पहाटे काकडा आरती, सकाळी ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी महिला भजनी मंडळांचे भजन, सायंकाळी हरिपाठ आणि रात्री भजन-कीर्तन असे विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. प्रसिद्ध कथाकार हभप धर्माचार्य ॲड. शंकर महाराज शेवाळे यांच्या अमृतवाणीतून भागवत कथा सांगण्यात येणार आहे. या सोहळ्याचा समारोप ३१ मे रोजी ग्रंथ दिंडीने होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक कार्यक्रमात विविध भजनी मंडळे, सेवाभावी संस्था आणि भाविक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.भाविकांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही रसाळे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस राजेश जवंजाळ, नंदकुमार चव्हाण, जगदीश घाटे, नंदकुमार पवार, अण्णाराव पाटील, श्रीकांत रंगदळ आदी उपस्थित होते.



## कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचा शनिवारी जिल्हा मेळावा

**सोलापूर, दि. २० मे-**

कास्ट्राईब कर्मचारी महासंघातर्फे शनिवार, दिनांक २३ मे रोजी सकाळी साडेअकरा वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात रोजी जिल्हा मेळावा घेण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाध्यक्ष मनीष सुरवसे यांनी पत्रकार परिषदेत दिली. कास्ट्राईब संघटनेमध्ये अनुसूचित जाती-जमाती, भटक्या विमुक्त जाती जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील कर्मचारी हे सभासद आहेत. अलीकडच्या काळात शासनाच्या बदलत्या सरकारी धोरणांचा कर्मचाऱ्यांच्या भवितव्यावर काय परिणाम होणार याची चर्चा करुन सार्वमत घेऊन पुढील धोरण ठरविण्यासाठी आणि भविष्यात येऊ घातलेल्या धोक्याची घंटा समजून घेण्यासाठी व त्यावर मात करण्यासाठी तसेच संघटन वाढीसाठी सभासद नोंदणी अभियान राबविण्यासाठी सदरचा जिल्हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. मेळाव्याचे उद्घाटन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेन यांच्या हस्ते होणार असून प्रमुख वक्ते म्हणून प्रा.डी.डी. मस्के (बार्शी) उपस्थित राहणार आहेत. याशिवाय राज्याचे कार्याध्यक्ष गणेश मडावी, महासचिव सुरेश तांबे, वरीष्ठ उपाध्यक्ष सुमित भुईगळ, उपाध्यक्ष गिरीश जाधव आदी राज्य पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या पत्रकार परिषदेला सरचिटणीस अरविंद जेटीथोर, कार्याध्यक्ष कल्याण श्रावस्ती आदी उपस्थित होते.

# हुतात्मा मध्यरात्री आली तर सिद्धेश्वर एक्सप्रेसला एक तास उशीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

हुतात्मा एक्सप्रेस ही गाडी रात्री ९.३० वाजता सोलापुरात पोहोचत असल्याने आणि वेळापत्रक कोलमडल्याने महिला, लहान मुले आणि वृद्ध प्रवाशांचे प्रचंड हाल झाले आहेत. प्रवाशांना आपापल्या निश्चित स्थळी जाण्यासाठी एसटी बस किंवा इतर वाहने सहज उपलब्ध होतात. मात्र ही गाडी पहाटे ४ वाजता पोहोचल्याने ग्रामीण भागात जाणाऱ्या प्रवाशांचे मोठे हाल झाले.

दौंड मनमाड रेल्वे मार्गावर सुरू असलेल्या दुहेरीकरणाच्या कामामुळे रेल्वे गाड्यांच्या वेळापत्रकाचा बोजवारा उडाला आहे. पुण्यावरून सोलापूरकडे येणारी हुतात्मा एक्सप्रेस रात्री पुणे स्टेशनवरून ६. ४५ मिनिटांनी निघणारी ही गाडी, सोमवारी रात्री तब्बल चार तास उशिरा म्हणजेच १२.०५ मिनिटांनी निघाली तर सोलापूर रेल्वे स्थानकावरती पहाटे ४ वाजून २० मिनिटांनी पोहोचली आहे तर मंगळवारी मुंबई वरून येणारी सिद्धेश्वर एक्सप्रेस सकाळी ६.४५ ऐवजी ७.५० वाजता एक तास उशिराने सोलापूर रेल्वे स्थानकावर पोहोचली. सलग दोन दिवस गाड्यांना उशीर होत असल्याने याचा फटका प्रवाशांना बसत आहे.

दौंड मनमाड मार्गाचे दुहेरीकरणाचे काम सुरू असल्याने गाड्यांचा वेग मंदावला आहे. इतर सर्व गाड्या नियमित धावत आहेत. हुतात्मा एक्सप्रेस व मंगळवारी सिद्धेश्वर एक्सप्रेसला ही काही उशीर झाला. मात्र येत्या २२ मे पर्यंत ही कामे मार्गी लागतील अशी माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे.

# वेळापूर-सांगोला रस्त्यावर गतिरोधक बसवण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २० मे-**

वेळापूर-सांगोला रस्त्याचे रखडलेले रुंदीकरण आणि डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले. यामुळे या मार्गावरून वाहनांची मोठी वर्दळ सुरू झाली आहे. रस्ता गुळगुळीत झाल्याने वाहनधारकांसाठी तो सोयीचा ठरत असला, तरी स्थानिक नागरिकांसाठी मात्र हा रस्ता मृत्युचा सापळा बनला आहे. या मार्गावर अत्यंत आवश्यक असलेल्या ठिकाणी गतिरोधक नसल्यामुळे वाहने सुसाट आणि भन्नाट वेगाने धावत आहेत. या रस्त्यावर गतिरोधक बसविण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

या रस्त्यावर गतिरोधकांअभावी गेल्या काही दिवसांत येथे अपघातांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत, तर काही जणांना कायमचे अपंगत्व आले आहे. चार ते पाच दिवसांपूर्वी झालेल्या भीषण अपघातात माने-देशमुख दाम्पत्याचा हकनाक बळी गेल्यानंतर आता वेळापूर येथील स्थानिक ग्रामस्थांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

वेळापूर-सांगोला रस्त्यावरील अत्यंत गजबजलेली आणि संवेदनशील ठिकाणे आहेत. चव्हाणवाडी, शेंडेचिंच रस्ता, गणेश पेट्रोलपंप समोर, जि. प. शाळा गायकवाडवस्ती, चव्हाणवाडी रोड, वेळापूर प्राथमिक आरोग्य केंद्र, वेळापूर ग्रामपंचायतकडे जाणारा रस्ता, निमगाव रस्ता या संपूर्ण परिसरात शाळा, आरोग्य केंद्र आणि शासकीय कार्यालये आहेत. यामुळे लहान मुले रुग्ण आणि वृद्धांची सतत वर्दळ असते.

मात्र, या एकाही ठिकाणी गतिरोधक किंवा गतिरोधक दर्शक फलक लावण्यात आलेले नाहीत. त्यामुळे हा संपूर्ण परिसर आणि त्यापुढील रस्ता अत्यंत धोकादायक बनला आहे.



अपघातांची मालिका रोखण्यासाठी सर्व प्रमुख चौकांत तातडीने शास्त्रीय पद्धतीचे गतिरोधक बसवावेत. वाहनचालकांना पूर्वकल्पना मिळण्यासाठी गतिरोधक दर्शक लावावेत, शाळा आणि प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरात झेब्रा क्रॉसिंग आणि पांढरे पट्टे मारण्यात यावेत, अन्यथा वेळापूर–सांगोला रस्त्यावरच तीव्र चक्काजाम आंदोलन छेडण्यात येईल.

**मदनसिंह माने–देशमुख,**
भाजप नेते

# सराफ दुकानातून लाखांचे दागिने लंपास

## ग्राहक बनून आलेल्या महिला व पुरुषाने केला हातसाफ



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० मे-**

हळद गल्ली परिसरातील रामचंद्र भगवंत बुडुख या सराफ दुकानातून ग्राहक आलेल्या एका अनोळखी महिला आणि तिच्यासोबत असलेल्या पुरुषाने तब्बल एक लाख पाच हजार रुपये किमतीचे सोन्याचे टॉप्स चोरुन नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी ऋषिकेश भरत बुडुख (वय ४५, रा. तुळशीराम रोड, बार्शी) यांचे हळद गल्लीत सराफ दुकान आहे. रविवार, दि.१७ मे रोजी दुपारी सव्वा चार वाजण्याच्या सुमारास ऋषिकेश बुडुख हे कामानिमित्त गावाबाहेर गेले होते. दरम्यान दुकानात मॅनेजर आनंद दत्तात्रय कानगुडे आणि कामगार रेवती जमदाडे हे हजर असताना एक अनोळखी महिला व एक पुरुष दागिने खरेदी करण्याच्या बहाण्याने दुकानात आले.

त्या महिला ग्राहकाने कानातील सोन्याचे टॉप्स दाखवण्याची विनंती केली. कामगार रेवती जमदाडे यांनी ट्रेमधील सोन्याचे टॉप्स त्यांना दाखवले. दोघांनी काही वेळ दागिने हातात घेऊन पाहिले. त्यानंतर, माझ्याकडे सध्या ४० हजार रुपयेच आहेत, मी बँकेतून उर्वरित पैसे घेऊन येते, असे सांगून ते दोघेही दुकानातून निघून गेले. ते दोघे निघून गेल्यानंतर कामगार रेवती यांनी ट्रेमधील दागिने मोजले असता, त्यातील एक जोड कमी असल्याचे त्यांच्या लक्षात आले. दुकानात व आजूबाजूला शोध घेऊनही दागिने मिळून आले नाहीत. त्यांनी याबाबत पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस तपास करत आहेत.



# राखीव प्रवर्गाचा निर्णय रद्द करा, अन्यथा महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन

## भीमशक्ति संघटनेचा तीव्र इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० मे-**

महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने नुकताच राखीव प्रवर्गातील गुणवंत उमेदवाराला खुल्या प्रवर्गामध्ये निवड अपात्र ठरविणारा निर्णय घेतला असून हा निर्णय म्हणजे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी भारताला दिलेल्या संविधान विरोधी आहे तो तो निर्णय ताबडतोब रद्द करावा अन्यथा भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन करणार असल्याचे लेखी निवेदन सोलापूर जिल्हाधिकारी यांचे तहसील अधिकाऱ्यांना देण्यात आले.

तसेच नांदेड जिल्हा धर्माबाद. तालुक्यात मस्ती. यागावी. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती पहिल्यांदाच करण्यात आली म्हणून. तेथील जातीय वादी. मनुच्या अवलादने मस्ती येथील भीम नगर. वर सशस्त्र हल्ला करून. अनेक लोकांना जखमी केले तसेच येतील उच्चंयशिक्षित बौध्दावरपोसको सारखे खोटे गुन्हे दाखल करण्यात आले. या घटनेचा सुद्धा निषेध भीम शक्तीच्या वतीने नुवेदना मार्फत करण्यात आला आहे वास्तविक पाहता खुल्या प्रवर्गात गुणवंत मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या निवडीबाबत अनेक वेळा सुप्रीम कोर्टाने दिलेले संविधानिक निर्णय म्हणजे गुणवत्तेला न्याय आणि सामाजिक सामाजिक न्यायला संरक्षण या दोन्ही मूल्यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न आहे त्यामुळे खुदा प्रवर्गाचा प्रश्न हा केवळ प्रशासकीय धोरणाचा विषय नसून भारतीय राज्यघटना तत्त्वाशी संबंधित असा मूलभूत प्रस्तबंद आहे पाठीमागे १९९२-२०१०-२०२० मार्च २०२६ या चारी वेळी सुप्रीम कोर्टाने कोर्टाने दिलेली निर्णय हे राज्यघटनेला आधारित आणि संविधानिक तत्त्वावर दिलेले निर्णय आहेत त्यामुळे महाराष्ट्र शासनाने घेतलेले निर्णय म्हणजे घटनाविरोधी संविधान विरोधी असून ते ताबडतोब निर्णय रद्द करण्यात यावा अशी मागणी निवेदनामध्ये करण्यात आली आली आहे. यावेळी भीमशक्ती सामाजिक संघटनेचे सुबोध वाघमोडे, नागेश बंगाळे , राजाभाऊ कदम, मेजर सुखदेव साबळे, सलीम मुल्ला, प्रेमलता वाघमारे, इब्राहिम शेख, संदीप ससाने, समीर मुजावर, शशिकांत बिरजू, नागेश गायकवाड, के. एम. कांबळे, कीर्ती शिवशरण, रविराज चंद्रकर, विजय कोल्लू, नरसिंह सानेपागुल, बागुल, शोभा बॉम्बे उपस्थित होते.

# शिष्यवृत्ती परीक्षेत श्री मल्लिकार्जुन हायस्कूलचे सुयश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

हत्तुरे नगर येथील श्री मल्लिकार्जुन हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत सुयश संपादन केले.

या परीक्षेत इ.५ वी चे पाच विद्यार्थी समृद्धी माने(१६६),सचिता जाधव(१५०),मुसाअली मुल्ला (१६०), गायत्री स्वामी(१२२),पर्णश्री माळवदकर(१३०)व इ.८ वी चे दोन विद्यार्थी वेदांत बगले(२०४), संदेशकुमार चव्हाण(१४०) हे विद्यार्थी पात्र झाले आहेत.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे संस्थापक मा.श्री आप्पासाहेब हत्तुरे सर,अध्यक्ष श्री सिद्धप्पा वरनाळ,मा.माजी प्राचार्य श्री वैजिनाथ हत्तुरे सर,मार्गदर्शक श्री धरेप्पा हत्तुरे सर, श्री विनायक हत्तुरे सर,प्र.मुख्याध्यापक रमेश दिंडोरे व प्रशालेतील शिक्षकांनी अभिनंदन व कौतुक केले.

# उळे येथे वारकऱ्यांसाठी कायमस्वरूपी शेड उभारा

## जिल्हा परिषद सभेत नेताजी खंडागळे यांनी व्यापार संकुलासह विकासाचे मुद्देही मांडले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० मे-**

जिल्हा परिषद यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडलेली सर्वसाधारण सभा विविध विकासात्मक विषयांमुळे गाजली. या सभेत बोरामणी जिल्हा परिषद गटाचे सदस्य नेताजी खंडागळे यांनी आपल्या गटातील शिक्षण, वारकरी सुविधा, आर्थिक उत्पन्नवाढ आणि मूलभूत सेवांशी संबंधित अनेक महत्त्वाचे प्रश्न प्रभावीपणे मांडत प्रशासनाचे लक्ष वेधले.

सभेदरम्यान खंडागळे यांनी बोरामणी गटातील बहुतांश तांड्यांवरील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची मोठ्या प्रमाणावर कमतरता असल्याचा गंभीर मुद्दा उपस्थित केला. अनेक गावांमध्ये शाळा इमारती उपलब्ध असतानाही शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी रिक्त पदांवर तातडीने शिक्षक नियुक्त करावेत, अशी ठाम मागणी त्यांनी केली.

यावेळी त्यांनी संत गजानन महाराज पालखी सोहळ्याचाही मुद्दा सभागृहात मांडला. पालखीचे सोलापूर जिल्ह्यात आगमन झाल्यानंतर उळे येथे पहिला मुक्काम होत असल्याने दरवर्षी हजारो वारकरी येथे थांबत असतात.

मात्र, वारकऱ्यांसाठी पुरेशा सुविधा उपलब्ध नसल्याचे सांगत उळे येथे भव्य आणि कायम स्वरूपी शेड उभारण्यात यावे, अशी आग्रही मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली.

जिल्हा परिषदेच्या आर्थिक बळकटीसाठीही त्यांनी महत्त्वपूर्ण सूचना मांडली. जिल्हा परिषद आवारातील उपलब्ध जागेचा योग्य वापर करून तेथे आधुनिक व्यापार संकुल उभारण्यात यावे, त्यामुळे जिल्हा परिषदेच्या उत्पन्नात वाढ होऊन आर्थिक स्रोत मजबूत होतील, असे त्यांनी नमूद केले. याशिवाय कृषी, पशुसंवर्धन, आरोग्य आणि महावितरण विभागाशी संबंधित स्थानिक समस्यांवरही त्यांनी सविस्तर चर्चा केली.

विविध विभागांच्या कामकाजातील अडचणी आणि नागरिकांच्या तक्रारी सभागृहासमोर मांडत प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली. स्थानिक प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करणारे लोकप्रतिनिधी म्हणून नेताजी खंडागळे यांच्या मांडणीची सभागृहात दखल घेण्यात आली. त्यांच्या विविध विकासाभिमुख मागण्यांमुळे सभेतील चर्चेला वेगळेच महत्त्व प्राप्त झाले.

# दोन दुचाकींच्या धडकेत महिला जखमी; दुचाकी स्वारावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

समोरील दुचाकीला धडक देऊन एका रुग्ण महिलेला जखमी केल्याप्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात एका दुचाकी स्वारावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साहिल अकिल शेख (रा. माहित नाही) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असूनही याबाबत मल्लिनाथ शिवपुत्रा दड्डे ( वय ४६ वर्षे, रा. १७, साई नगर, आर टी ओ ऑफिस रोड, सोलापूर ) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी व त्यांची आई हे डॉ. पाटील यांच्याकडे तपासणी करुन दि. १८ मे रोजी दुपारी तीन वा चे सुमारास कंबर तलावजवळून दुचाकी वरुन घरी जात असताना आरोपी दुचाकी स्वाराने त्याची दुचाकी (क्रं. एम एच १३ डी पी २३३३ ) ही हयगयीने, बेदरकारपणे चालवून फिर्यादीची दुचाकी (क्रं. एम एच १३ ई आर ४२२६ ) ला मागुन धडक दिली. त्यात फिर्यादीची आई रोडवर पडल्याने डोक्याला मार लागून गंभीर जखमी झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार ईनामदार हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## माळशिरस शहरातील सर्व औषध दुकाने दिवसभर बंद




**माळशिरस, दि. २० मे-**
अखिल भारतीय औषधी संघटनेने विविध मागण्यासाठी पुकारलेल्या एक दिवस औषध दुकान बंदला शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शहरातील सर्व औषध दुकाने आज दिवसभर बंद होती. माळशिरस शहरात ८० औषध दुकाने आहेत. अखिल भारतीय औषधी संघटनेने ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर औषधांची बेधडक विक्री होत आहे, बोगस व नकली औषधांमुळे रुग्णांच्या जीवाला धोका होत आहे, घरपोच डिलिव्हरीमुळे औषध विक्रीचे नियम धोक्यात येत आहेत या मागण्यासाठी संघटनेने आज संपूर्ण देशात एक दिवस औषध दुकाने बंद ठेवण्याचे आवाहन केले होते. त्यामुळे शहरातील सर्व औषध दुकाने आज बंद होती.



## महत्त्वाचे...



### शासनास जमत नसल्यास विष्णूपद बंधाऱ्याचे आम्ही रक्षण करु : अंकुशराव

**पंढरपूर, दि. २० मे-**
पंढरपूरमध्ये वाळु माफियांनी चक्क चंद्रभागेचे पाणी वाहून जावे आणि उघड्या पडलेल्या वाळवंटातील वाळु चोरी करता यावी यासाठी विष्णुपद बंधाऱ्याचे दरवाजे काढून टाकले आहेत. वाळुमाफियांचे हे खुप मोठे धाडस असुन त्यांनी प्रशासनालाच आव्हान दिले आहे. वाळुमाफियांवर आवर घालणे प्रशासनाला जमत नसेल तर विष्णुपद बंधाऱ्याच्या दरवाजांचे संरक्षण कररण्याची शासनाने जबाबदारी आमच्यावर सोपवावी, असे आवाहन येथील महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी केले आहे. गणेश अंकुशराव यांनी विष्णुपदावरील बंधाऱ्याची पाहणी केली असता येथील दरवाजे वाळुमाफियांनी काढून फेकले असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. सध्या अधिक मास सुरू असून त्यानिमित्त पंढरपुरात दर्शनासाठी दररोज लाखोंच्या संख्येने भाविक येत आहेत, परंतू बंधाऱ्याचे गेट काढल्याने नदीपात्रात साठलेले पाणी वाहून जात आहे. वारकरी, भाविकांच्या स्नानाची गैरसोय होऊ शकते. त्यामुळे शासनाने तातडीने यावर उपाय योजना करावी. यातील आरोपींचा शोध घेऊन त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी असे आवाहनही अंकुशराव यांनी केले आहे.



### कोंडी गावात जनगणना सहसंचालक रमेश भोसले यांची अचानक पाहणी

**सोलापूर, दि. २० मे-**
देशभरात १६ मे ते १५ जून दरम्यान सुरू असलेल्या जनगणनेच्या पहिल्या टप्प्यातील घर यादी गणनेच्या कामाची पाहणी करण्यासाठी जनगणना कार्यालय मुंबईचे सहसंचालक रमेश भोसले यांनी रविवारी दुपारी कोंडी गावाला अचानक भेट दिली. यावेळी सांख्यिकी अधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी अजित भांड हेही उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी प्रगणकांना वाटप केलेल्या भागांची पाहणी केली. तसेच घरांवर क्रमांक टाकण्याची प्रक्रिया आणि जनगणना मोबाईल ॲपची माहिती प्रत्यक्ष तपासली. त्यांनी काही घरांना भेट देत प्रगणकांना आवश्यक मार्गदर्शनही केले. यावेळी सहसंचालक रमेश भोसले यांनी जनगणनेसाठी वापरण्यात येणारे 'एचएलओ' मोबाईल पुढील दोन दिवसांत अपडेट होणार आहे. त्यामध्ये स्वगणना केलेल्या नागरिकांची माहितीही उपलब्ध होईल, असे सांगितले. उत्तर सोलापूर तालुक्याचे तहसीलदार तथा जनगणना चार्ज अधिकारी निलेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात १४५ प्रगणक आणि २४ पर्यवेक्षक जनगणनेचे काम करत आहेत. यावेळी तज्ज्ञ मार्गदर्शक लतिफ तांबोळी, शिवाजी भोसले, कोंडी गावचे प्रगणक ज्ञानेश्वर लांबतुरे, दीपक मोरे, अळगी, पुष्पा कांबळे आणि शिंदे उपस्थित होते. उदय कोढारे यांनी आभार मानले.

### भाजयुमो बार्शी शहराध्यक्षपदी अमोल डिसले यांची निवड

**बार्शी, दि.२० मे-**



भाजयुमो बार्शी शहराध्यक्षपदी अमोल डिसले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्तीचे पत्र भाजयुमो प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्याहस्ते व जिल्हाध्यक्ष रणवीर राऊत यांच्या उपस्थितीत झालेल्या युवा मेळाव्यात देण्यात आले. यावेळी भाजप शहराध्यक्ष महावीर कदम, तालुकाध्यक्ष गडदे उपस्थित होते. अमोल डिसले हे प्रतिष्ठित शेतकरी कुटूंबातील उच्च शिक्षित तरुण कार्यकर्ते आहेत. वीस वर्षांपासून माजी आमदार राजेंद्र राऊत यांचे एकनिष्ठ सहकारी आहेत. डिसले कुटूंबाला खूप राजकीय वारसा असून अमोल यांचे वडील सुधाकर डिसले हे एक कार्यक्षम निवृत्त एक्साईज इन्स्पेक्टर आहेत. शैक्षणिक पदवीनंतर अमोल यांनी बार्शीसारख्या ठिकाणी प्रथमच डिजीटल व्यवसायात जम बसवला होता. त्यानंतर रिअल इस्टेट डेव्हलपर्स म्हणून लौकिक मिळवला आहे. अशा व्यवसायाबरोबरच त्यांनी समाज कार्यातही स्वतःला सक्रीय ठेवलेले आहे. त्यांच्या सुस्वभावामुळे त्यांना मोठया प्रमाणावर मित्र परिवार आहे. त्यांना समाजकारण व राजकारणाची विशेष आवड आहे. त्यामुळे डिसले यांच्या नियुक्तीचा भाजपला निश्चितच फायदा होईल, असा विश्वास व्यक्त होत आहे. माजी आमदार राजेंद्र राऊत, माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, विजय राऊत, हळदुगेचे सरपंच मेजर जगताप, धामणगावचे सरपंच एस. के. पाटील, उपसरपंच महेश बोधले आदींनी अभिनंदन केले आहे.

## अक्कलकोट नगरपरिषदेत दर गुरुवारी 'नो व्हेईकल डे'

### नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांचा संयुक्त निर्णय



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० मे-**
अक्कलकोट नगरपरिषदेच्या वतीने एक चांगला निर्णय आज घेण्यात आला असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचतीच्या आवाहनाला अक्कलकोट नगरपरिषदेकडून सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी व मुख्याधिकारी यांनी संयुक्तपणे नगरपरिषदेत दर गुरुवारी 'नो व्हेईकल डे' पाळण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांनी याबाबत माहिती दिली. येत्या गुरुवारपासून नगराध्यक्ष, नगरसेवक आणि कर्मचारी यांच्यासाठी प्रत्येक गुरुवारी पेट्रोल व डिझेलवर चालणारी वाहने आणता येणार नाहीत, अशी सुचना दिली आहे. इंधनाची बचत करणे हा 'नो व्हेईकल डे' चा मुख्य उद्देश असला तरी त्याला अनेक महत्त्वाचे! ऽऽआणि उपयुक्त असे कारणे लागू होतात. याचा विचार करून येत्या गुरुवार दि. २१ मेपासून अक्कलकोट नगरपालिकेचे नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, सर्व ऽ नगरसेवक, मुख्याधिकारी आणि नगरपरिषदेचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी हा निर्णय लागू केला आहे. निर्णयाचा लाभ जरी मर्यादित क्षेत्रासाठी असला तरी तो दीर्घकालीन असल्याने त्याचे चांगले फायदे येत्या काळात पहावयास मिळणार आहेत.

'नो व्हेईकल डे' चा मुख्य उद्देश इंधन बचत असला तरी त्यामुळे वायू प्रदूषण कमी होते. देशाच्या इंधन साठ्यावर ताण कमी होतो,वाहतूक कोंडी कमी होते आदी कारणांसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाचे सकारात्मक पालन करून एक जागरूक नागरिक म्हणून खारीचा वाटा उचलण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे नगराध्यक्ष किलन कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

> **दूरगामी परिणाम करणारा निर्णय**
>
> अक्कलकोट नगरपरिषदेने घेतलेला ' नो व्हेईकल डे' चा निर्णय केवळ एक दिवस पाळण्यासाठी नाही. स्वच्छ पर्यावरण, चांगले आरोग्य आणि सुरक्षित भविष्यासाठी महत्त्वाची सामाजिक चळवळ आहे.शहरवासियांनी दर गुरुवारी या मोहिमेत आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी शक्य त्यांनी या अडचणीच्या काळात सहभागी होऊन सहकार्य करावे.
>
> **मिलन कल्याणशेट्टी,** नगराध्यक्ष नगरपरिषद अक्कलकोट

## श्रीपूरमध्ये विद्युत रोहित्राला आग; मात्र दुर्घटना टळली

### डॉ. सुहास बनसोडे यांचे प्रसंगावधान



**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर दि. २० मे-**
श्रीपूरमध्ये आज सकाळी सात ते अकरा पर्यंत लोडशेडींग ठेवण्यात आले होते. सव्वा अकराच्या दरम्यान वीज पुरवठा सुरू झाला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाशेजारी असलेल्या महावितरणच्या विद्युत रोहित्राला अचानक आग लागली. रस्ता रहदारीचा व लगतच दवाखाना असल्याने एकच गोंधळ व पळापळ सुरू झाली.त्याच वेळी दवाखान्यात हजर असलेले डॉ . सुहास बनसोडे यांनी त्यांच्या दवाखान्यातील अग्नी शामक यंत्र बाहेर आणून सदर आग नियंत्रणात आणली.

आग नियंत्रणात आणल्यानंतर महावितरण कंपनीच्या कार्यालयात फोन करून घटनेची माहिती दिली. त्यानंतर त्वरित वीज पुरवठा खंडित करण्यात आला. डॉ. बनसोडे यांनी प्रसंगावधान दाखवल्यामुळे मोठी दुर्घटना टळली आहे. तसेच विद्युत रोहित्राचेही मोठे नुकसान टळले. त्या नंतर श्रीपूरमध्ये काही भागात सकाळी सव्वा अकरापासून संध्याकाळी साडे पाच वाजेपर्यंत वीज पुरवठा सुरळीत झाला नव्हता. दिड वर्षांपूर्वी याच ठिकाणी रात्री साडे नऊ वाजता विद्युत रोहित्राला आग लागली होती. हे धोकादायक विद्युत रोहित्र अन्यत्र हटवण्यासाठी कार्यकारी अभियंता महावितरण अकलूज विभाग यांना निवेदन दिले होते. परंतु संबंधित अधिकाऱ्यांनी दखल घेतली नाही.

विद्युत रोहित्रालगत खाजगी दवाखाना तसेच समोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक आहे. परिणामी हा धोकादायक विद्युत रोहित्र अन्यत्र हटवून संभाव्य धोका टाळावा अशी मागणी रहिवाशांनी केली आहे.

## भोयरे येथील कारखान्यातून ११ लाखांच्या सोलर केबलची चोरी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० मे-**
तालुक्यातील भोयरे येथील वैष्णवी ॲग्रो प्रोडक्ट कारखान्यातून चोरट्यांनी सोलर प्लॅन्टमधील तब्बल १० लाख ६९ हजार ५०० रुपयांचा कॉपर केबल व इतर साहित्य चोरुन नेले.

अविनाश बागमार यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. बागमार यांच्या वडिलांच्या नावावर भोयरे येथे वैष्णवी ॲग्रो प्रोडक्ट हा कारखाना आहे. कारखान्याच्या परिसरात २०२२ मध्ये सौर ऊर्जेवर आधारित ८०० केव्ही क्षमतेचा सोलर प्लॅन्ट उभारला होता. प्लॅन्टमध्ये सुमारे १५०० सोलर पॅनल बसवले आहेत. प्लॅन्टच्या सुरक्षेसाठी दोन सुरक्षा रक्षक होते. १७ मे रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास कारखान्याचे व्यवस्थापक पोपट दहीहंडे यांना रीडिंग घेत असताना प्लॅन्टमधील कॉपर केबल आणि सोलर पॅनलचे कनेक्टर चोरी झाल्याचे दिसून आले. त्यांनी अविनाश बागमार यांना माहिती दिली.

अविनाश बागमार यांनी तत्काळ पोलिसांत तक्रार दाखल केली. चोरीस गेलेल्या साहित्यामध्ये सुमारे २५ हजार मीटर कॉपर केबल, सोलर पॅनल कनेक्टर, कम्युनिकेशन केबल तसेच लाईटनिंग अरेस्टर केबलचा समावेश असून एकूण चोरीचा मुद्देमाल अंदाजे १० लाख ६९ हजार ५०० रुपयांचा असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल झाला असून पोलिस तपास करत आहेत.

## माळशिरस नगरपंचायत नगराध्यक्षपदी रघुनाथ चव्हाण



**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. २० मे-**
माळशिरस नगर पंचायतीच्या नगराध्यक्षपदी रघुनाथ चव्हाण यांची आज बिनविरोध निवड झाली. माळशिरस नगरपंचायतीवर आप्पासाहेब देशमुख व तुकाराम देशमुख गटाची सत्ता आहे. आप्पासाहेब देशमुख गटाच्या प्राजक्ता ओहोळ यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर झालेल्या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी रघुनाथ चव्हाण यांचा एकमेव अर्ज दाखला झाला. परिणामी निवडणूक निर्णय अधिकारी तथा सांगोला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सुधीर गवळी यांनी चव्हाण यांची नगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले.

यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून माळशिरस नगरपंचायतीचे मुख्याधिकारी सुमीत जाधव यांनी काम पाहिले. निवडीनंतर नूतन नगराध्यक्ष चव्हाण यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी तुकाराम देशमुख, महादेव देशमुख, अशोक देशमुख, अजिनाथ वळकुंदे, शिवाजीराव देशमुख उपस्थित होते.

> **प्रथमच रामोशी समाजाला संधी**
>
> माळशिरस ग्रामपंचायतीत १९२२ पासून आजपर्यंत रामोशी समाजाला गावाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली नव्हती. त्यानंतर माळशिरस ग्रामपंचायतीची नगर पंचायत झाली. तरीही या समाजाला नेतृत्वाची संधी नव्हती. प्रथमच आज रघुनाथ चव्हाण यांच्या माध्यमातून रामोशी समाजाला संधी मिळाली आहे.



## भांडेगावात एकता महिला मंचतर्फे महिलांसाठी कार्यक्रम

### एएसआय सविता जाधव, डॉ. सुरभी कासार यांचे मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २० मे-**
ग्रामीण भागातील महिला आणि मुलींना कायदेविषयक हक्क व आरोग्याची काळजी घेण्याबाबत माहिती मिळावी, यासाठी एकता महिला मंचतर्फे भांडेगाव (ता.बार्शी) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत महिला कायदेविषयक व सुरक्षा जनजागृती भव्य मार्गदर्शन मेळावा पार पडला. तसेच समर्थ डेंटल क्लिनिक, वैराग यांच्यातर्फे मोफत दंत आरोग्य शिबिर झाले.

प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर एकता महिला मंचतर्फे पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. व्यासपीठावर सविता जाधव सपोनि वैराग पोलीस स्टेशन, डॉ. सुरभी कासार (समर्थ डेंटल क्लिनिक-वैराग, प्रभाकर क्षीरसागर, कमल शिंदे सरपंच भांडेगाव यांची उपस्थिती होती.

समर्थ डेंटल क्लिनिक येथील डॉ. शितल बोराडे यांच्या माध्यमातून महिला व मुलींची दंत आरोग्याची मोफत तपासणी करण्यात आली. त्याला महिलांकडून उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला. महिलांना मोफत टूथपेस्टचे वाटपही करण्यात आले. डॉ. सुरभी कासार यांनी दातांच्या निगेविषयी मार्गदर्शन केले. एएसआय सविता जाधव यांनी पॉक्सो, महिलांवर अत्याचार आणि घरगुती हिंसाचार याविरोधात कायद्यांची माहिती दिली. एकता महिला मंचचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर यांनी कार्यक्रमाचा उद्देश सांगितला.

सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक स्वाती शिंदे यांनी केले. आभार उषा जाधव यांनी मानले. यावेळी एकता महिला मंच भांडेगावच्या प्रमुख स्वाती शिंदे, उषा जाधव, पूजा मंडलिक, आशा मंडलिक, रेश्मा मंडलिक, दामिनी मंडलिक, स्वाती मंडलिक, सुरेखा जाधव यांच्यासह महिलावर्ग उपस्थित होता.

## अकलूजमध्ये बंद १०० टक्के यशस्वी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २० मे-**
संपूर्ण देशभर पुकारण्यात आलेला औषधे विक्री दुकानांचा संप १००% यशस्वी झाला असल्याची माहिती माळशिरस तालुका केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष विठ्ठल गायकवाड व उपाध्यक्ष योगेश गायकवाड गांधी यांनी दिली याबाबत अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले सध्या ऑनलाईन पद्धतीने औषधे खरेदी विक्री सुरू असून यामध्ये




अनेक जीवघातक औषधेही विकली जात आहे त्यामुळे ऑनलाईन विक्री बंद व्हावी व इतरविविध मागण्यासाठी हा देशभर संपर्क करण्यात आलं होत माळशिरस तालुक्यात ७५० मेडिकल दुकाने असून सर्वच्या सर्व दुकाने बंद होती. असोसिएशनच्या वतीने खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांना निवेदन देण्यात आले त्यांनीही याबाबत केंद्र शासनाच्या संबंधित विभागाकडे आपले मागणे मांडू असे सांगितले.



## 'रायगड'मधील डोंगरची काळी मैना सांगोल्यात दाखल

### आरोग्यवर्धक रानमेवा खरेदीसाठी गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२० मे-**
कडक उन्हाळ्यात सांगोला बाजारपेठेत रानमेवा म्हणून ओळखली जाणारी डोंगरची काळी मैना म्हणजेच करवंदे आणि जांभळे विक्रीसाठी दाखल झाली आहेत. आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर असलेल्या या फळांना खरेदी करताना नागरिक दिसत आहेत. विक्रेते: मुख्य बाजारपेठा, मेन रोड, चौका चौकात गाड्यांवर व टोपल्यांमध्ये हा रानमेवा सजवून विक्री करताना दिसत आहेत.

करवंद हे भारतातील विशेषतः महाराष्ट्रातील डोंगरकपारीत आणि कोकण भागात आढळणारे एक अत्यंत लोकप्रिय व गुणकारी रानमेवा देणारे काटेरी झुडूप आहे. करवंदामध्ये व्हिटॅमिन सी आणि लोह भरपूर प्रमाणात असते.

रोगप्रतिकारक शक्ती वाढवणे, पचनक्रिया सुधारणे, रक्त वाढवणे तसेच उन्हाळ्यात शरीराला थंडावा देण्यासाठी हे फळ उत्तम कार्य करते. तसेच अन्यही अनेक आयुर्वेदीक फायदे असलेले हे फळ रत्नागिरी जिल्ह्यातून सांगोला बाजारपेठेत आले आहे.

> **८ ते १० दिवस बाजारात उपलब्धता**
>
> 
>
> काळी मैना याची खरेदी रायगड जिल्ह्यातील तसेच जांभळाची खरेदी स्थानिक शेतकऱ्यांकडून होत आहे. सध्या जांभूळ २०० रुपये किलो तर करवंदे पण २०० रुपये किलो या दराने विकली जात आहेत. दुपारी चांगलेच ऊन पडत असल्यामुळे नागरिकांचा अल्प प्रतिसाद मिळत आहे परंतु नागरिक हा रानमेवा आवडीने खरेदी करत आहेत. तसेच पुढील ८ ते १० दिवस करवंदे विक्रीस राहील.
>
> **दत्ता माने,** करवंद व जांभूळ यांचे व्यापारी, सांगोला.